
शनिवार
२१ जुलै १९७९
७५ पैसे

# माणूस



सत्तेचा हा खेळ बेभानपणे खेळला जात आहे.
सत्ता यांना एकत्र ठेवील असे वाटले होते; पण सत्तेनेच यांना फोडले.
सिंहासनावर कोणाला बसवायचे म्हणजे सूत्रधार आपण राहू
याच कोड्याचे उत्तर सोडवण्यात सारे गर्क आहेत.

## विद्रोही सरदार । अधांतरी दरबार

मुखपृष्ठ....२

# या अंधारयात्रेचे फलित काय ?

राजधानी दिल्ली परत एकदा सुस्तपणा झटकून प्रचंड गतिशील झालेली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच घटनांनी आकस्मिक वेग घेतला आणि परिणामत: श्री. मोरारजी देसाई यांच्या पंतप्रधानपदाची आहुती पडली. हा राजकीय रस्सीखेचीतील पहिला महत्त्वाचा टप्पा लेख लिहिण्याच्या वेळी नुकताच पार पडलेला आहे. पुढचे चित्र अजूनही संदिग्धच आहे.

पण नक्की यातून काय साधणार ? ' समान विचारांच्या लोकांचे ध्रुवीकरण ' हे सध्याचे चलनी नाणे झालेले आहे. केवळ संख्यात्मक फेरबदलांनी गुणात्मक बदल घडून येत नाहीत हे राजकारणाचे वैशिष्टच आहे. राजकीय फेरजुळणीला या घटनांमुळे चालना मिळेल असे ठामपणे त्यामुळेच म्हणता येत नाही. फार तर सत्तावाटपाच्या देवाण-घेवाणीला चालना मिळेल; पण त्यामुळे राष्ट्रीय जीवनाला स्थैर्य कसे प्राप्त होणार ?

घटकवार विचार करता, ' जनता ' सरकारचे म्हणून जे जे धोरण मान्य झाले, ते ते आपला पूर्वीचा अभिनिवेश बाजूला ठेवून पूर्वाश्रमीच्या जनसंघीयांनी राबवले. उदा. परराष्ट्रीय धोरणात अलिप्तता हा महत्त्वाचा घटक आहे, हे जनसंघीयांना कधीच मंजूर नव्हते; पण अटलबिहारींनी ते धोरण मान्य केले. अर्थात या मागचे त्यांचे हेतू विदितच आहेत ! साप साप म्हणून भुई धोपटणे ही समाजवाद्यांची जुनी सवय आहे. अनिश्चितता, एकमताचा पूर्ण अभाव आणि वैचारिक गोंधळाचा कळस ही त्यांच्या खास लक्षणांपैकी काही लक्षणे. गुरुवारी जनता पक्षाच्या बाजूने जोरदार भाषण करणाऱ्या जॉर्ज फर्नांडिसना दोन दिवसांत मंत्रिमंडळात रहाणे अनैतिक का वाटावे ? फर्नांडिसांनी आणि धारियांनी राजनारायणांप्रमाणेच मोरारजी ही व्यक्ती लक्ष्य करण्यात काय मिळवले ? हा धोकादायक प्रवाह आहे. इंदिरा गांधींचे व्यक्तिमत्त्व आणि मोरारजींचे व्यक्तिमत्त्व यात महदंतर आहे. इंदिरा गांधींना सुद्धा अन्यायाला जबाबदार अशी एकमेव व्यक्ती असे म्हणणे जर आजही जड होत आहे, तर एकटचा मोरारजींना जबाबदार कसे धरता येईल ? जनसंघावर हा प्रच्छन्न हल्ला आहे हे उघड आहे; पण पुढच्या पुनर्रचनेसाठी या संघटित गटाला डावलून चालणारच नाही हे काय समाजवाद्यांच्या लक्षात आलेच नसेल ? जनता खासदारांनी मतदान घेऊन नेतेपदावर अविश्वास व्यक्त केल्याखेरीज मोरारजींनी राजिनामा देणे उचित नव्हते. त्यांनी तो प्रयत्नही केला. दोघा-चौघा असंतुष्टांनी निषेध नोंदवला म्हणून पंतप्रधान जर राजिनामा देऊ लागला तर लोकसभेची शान राहूच शकणार नाही आणि तीच आता धोक्यात आलेली आहे. हा गंभीर व विचार करायला लावणारा महत्त्वाचा प्रश्न याच्या मुळाशी आहे.

एका अविश्वास ठरावाने मधू लिमयांना जनता पक्ष फुटणे ही ऐतिहासिक गरज वाटू लागली. केवळ पक्ष फुटल्याने व पुन्हा नव्या नावाखाली तेच लोक गोळा झाल्याने धोरणात काही फरक पडत नाही हे आजवर आपण पहात


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : आठवा
२१ जुलै १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुण ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

आलेलो आहोत.

चरणसिंगांनी परत एकदा आपल्या नेतृत्वाच्या मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. 'राजनारायणांशी संबंध तोडले म्हणून दिशाभूल करण्यात आणि नंतरच्या अस्थैर्याला हातभार लावण्यात सिंहाचा वाटा कोणाचा आहे हे पहायला दूर जायला नको. इंदिरा गांधींनी बंगलोरमध्ये आमचा पक्ष कोणत्याही संमिश्र सरकारमध्ये सामील होणार नाही असे सांगितले आणि सद्यःस्थितीतील त्यांची दिशा पहाता ते खरेही ठरण्याचा संभव आहे. मग चरणसिंगांचे एके काळचे उजवे हात असलेले राजनारायण, यांच्या वल्गनांना काय अर्थ रहातो? यशवंतराव चव्हाणांच्या काँग्रेसचा पाठिंबा चरणसिंगांना मिळेल याची शक्यता फार कमी दिसते. जनसंघ, संघटनाकाँग्रेसचा तर या संदर्भात विचारही करायला नको. मग व्यक्तिगत हेव्यादाव्यांतून राजकीय अस्थैर्य निर्माण करणे याखेरीज चरणसिंगांनी काय साधले?

यशवंतराव चव्हाण परत एकदा महत्त्वाच्या जागेवर आलेले आहेत. स्वर्णसिंगांनी 'प्रागतिक व समविचारी' पक्षाला आपला पक्ष पाठिंबा देईल असे जाहीर केले आहे. चरणसिंग आणि जगजीवनराम यांच्या द्वंद्वात काँग्रेस जगजीवनरामांच्याच बाजूने गेली तर जाईल; पण त्यासाठी काँग्रेस किंमत कोणती मागेल हे पहायचे. इंदिरा गांधी आणि जनसंघ वगळून सरकार स्थापणे शक्य आहे काय? अरस यांच्याबरोबर जेवढे खासदार बाहेर पडले, तेवढे सोडता उरलेले निश्चितपणे इंदिरा गांधींबरोबर आहेत. जनसंघ हा दुसरा निश्चितपणे बांधलेला गट. त्यांनी बाहेरून पाठिंबा देण्याइतकी तयारी दाखवली तरच जगजीवनराम सत्तारूढ होऊ शकतात.

हा सत्तेचा खेळ बेभानपणे खेळला जात आहे. प्रत्येक क्षणाला परिस्थिती नवी कलाटणी घेते आहे. सामान्य माणसाचा लोकशाहीवरील विश्वास हा लोकशाही आत्मा आहे. ह्या विश्वासाला तडे जायला सुरुवात झाली होतीच, आता ती प्रक्रिया अधिक वेगाने होणार अशी साधार भीती वाटू लागलेली आहे. येणारे सरकार अस्थिर व अधिक गुंतागुंतीचे तणाव घेऊनच जन्माला येणार, मध्यावधी निवडणुका हा घटनात्मक पर्याय. राजकीयदृष्टचा या निवडणुका कोणत्याच पक्षाला परवडणार नाहीत. जनतेसमोर कोणत्या तोंडाने परत मते मागायला जाणार? प्रत्येक पक्षातही अंतर्गत मतभेदांना ऊत आलेला आहेच. मध्यावधी निवडणुका आता नकोत एवढ्या एकाच मुद्द्यावर सर्वांचे एकमत होऊ शकेल. कारण जरी निवडणुका झाल्या, तरी नव्या संसदेत तीच जुनी गणिते मांडण्यात येणार. कोणत्याच पक्षाला निश्चित कौल मिळणे दोनाहून अधिक उमेदवार उभे असल्यास नेहमीच कठीण जाते. म्हणजे त्यानेही प्रश्न सुटेल असे नाही; उलट अधिक खर्चाचा प्रचंड बोजा मात्र पडेल.

सत्ता यांना एकत्र ठेवील असे वाटले होते; पण सत्तेनेच यांना फोडले आहे. पोलिसांचा असंतोष, जातीय दंग्यांचे प्रमाण वाढले नसताही त्याचे केले जाणारे राजकीय भांडवल यामुळे आधीच परिस्थिती चिघळली आहे. दुबळ्या केंद्राचा परिणाम संपूर्ण देश हतबल होण्यात होतो. समर्थ केन्द्र म्हणजे एक व्यक्ती असे समीकरण मात्र यातून रूढ होऊ नये एवढीच किमान अपेक्षा आहे. कारण सूज्ञास पुरेसा होईल होईल एवढा चटका आणीबाणीच्या दरम्यान आपल्याला बसलेला आहे. राजकीय नेतृत्व मात्र शहाणे झालेले दिसत नाही. उथळ नेतृत्वाकडे देशाचे सुकाणू गेल्यास अधिक विकट परिस्थिती ओढवेल.

त्यातल्या त्यात प्रतिष्ठा राखून व शांतपणे 'योग्य वेळी योग्य निर्णय' घेणाऱ्या जगजीवनरामांकडे नजर वळल्यास आश्चर्य नाही; पण प्रत्येक महत्त्वाकांक्षी माणसाला चाचणी पद्धतीवर राज्य करू देण्याची चैन यापुढे परवडणार नाही. वेळ फार थोडा आहे. ज्यांच्या संयमाच्या जोरावर हा खेळ चालू आहे, त्यांच्याच संयमाच्या व सहनशीलतेचा अंत झाला तर अराजक माजेल. जगजीवनरामांना लष्कराच्या सहाय्याने पंतप्रधान होण्याविषयी प्रश्न पत्रकारपरिषदेत विचारण्यात आला ही धोक्याची सूचना आहे.

दुर्दैवाने कोणीच शांतपणे विचार करण्याच्या मनःस्थितीत नाही. सिंहासनावर कोणाला बसवायचे म्हणजे सूत्रधार आपण राहू या कोड्याचे उत्तर सोडवण्यातच सगळे गर्क आहेत.

दरम्यान जयप्रकाशांचे जग पुन्हा एकदा त्यांच्याभोवती छिन्नविच्छिन्न होऊन पडले आहे. या अंधारयात्रेचे फलित काय हा प्रत्येक विचारी माणसाला अंतर्मुख करणारा प्रश्न आहे.

**—चंद्रशेखर पुरंदरे**

१६–७–७९

संध्याकाळचे पुणे । दि. बा. मोकाशी

# भज गोविन्दं, भज गोविन्दम्

कुणाच्या लक्षात आले असेल, नसेल. श्रीद्वारका शारदापीठ शंकराचार्य सध्या चातुर्मासानिमित्त पुण्यात आहेत. रविवारपेठ कापडगंजमधील अग्रसेनभवनात श्रींची आशीर्वाद प्रवचने होत असतात. आषाढी पौर्णिमेला सायंकाळी सात वाजता झालेल्या त्यांच्या प्रवचनाला आम्ही उपस्थित राहिलो.

आषाढी पौर्णिमेलाच गुरुपौर्णिमा म्हणतात. या दिवशी ज्याने त्याने आपापल्या गुरूची किंवा आईवडिलांची पूजा करावी असे आहे. तो दिवस व्यासपूजेचाही असतो. श्रीव्यासांनी शंकराचार्यांचा अवतार घेतला अशी श्रद्धा असल्याने संन्यासी लोक या दिवशी व्यासपूजा म्हणून शंकराचार्यांची पूजा करतात.

अग्रसेन भवनात सकाळी व्यासपूजा झाली व सायंकाळी श्रीशंकराचार्यांचे आशीर्वाद प्रवचन झाले. या प्रवचनात त्यांनी शिक्षण वगैरेसारखे अनेक वर्तमानकालीन विषय काढले. त्यात स्कायलॅबबद्दलही बोलले. 'उपग्रह हा उपद्रव आहे.' असे सांगून ते म्हणाले, 'स्कायलॅब कोसळणार या भयाने चिंताग्रस्त होण्यापेक्षा परमेश्वराची प्रार्थना करा. स्कायलॅबच्या आपत्तीपासून फक्त परमेश्वरच वाचवू शकेल. यासाठी सर्वांनी एक आठवडाभर भाषणबाजी बंद करून, गायत्रीमंत्र, विष्णुसहस्रनाम, रामनाम वगैरेचा जप करावा.'

गायत्रीमंत्र वगैरेने डोक्यावर पडणारी स्कायलॅब पुढे जाईल हे शंकराचार्यांचे सांगणे शास्त्रीयदृष्ट्या हास्यास्पद वाटेल; पण स्कायलॅब आपल्यावर पडणार या धास्तीने यच्चयावत् स्त्री-पुरुषांचा थरकाप उडाला असताना शंकराचार्यांनी सुचविलेला रामनाम वगैरेचा उपाय श्रोत्यांचे सांत्वन करून गेला असेल. ज्या दिवशी स्कायलॅब पडणार होती त्या दिवशी सकाळी आम्हाला, स्कायलॅब पडेल म्हणून घाबरलेली एक डबे-बाटल्या विकणारी बाई भेटली. एकीकडे तिला चार पैसे मिळाले तर हवे होते, तर दुसरीकडे घराची ओढ लागली होती. 'घरी जाते-घरी जाते' असं ती सारखी म्हणत होती. त्या वेळी रामनामाचा उपाय आमच्या डोक्यात आला नाही; पण आम्ही तिला समजावलं की, 'पुण्यावर स्कायलॅब पडण्याची जवळजवळ धास्ती नाही. तू आपला धंदा निश्चित कर!' पण 'मरावयाचे तर घरचे सगळे एकत्र मरू' हा मंत्र तिने सोडला नाही. या अडाणी बाईचेच काय, पण काही दुकानदारांनीही दुकाने लौकर बंद केली व 'सगळे एकत्र मरू' म्हणून ते घरी गेले. असे म्हणतात की, एस्. टी. गाड्या रिकाम्या जात होत्या, बाजार ओस होते आणि काही खेड्यांत वरून विमान जाताच स्कायलॅब आले म्हणून लोक बेशुद्ध पडले.

आपल्यासारखीच घाबरगुंडी अमेरिका व ऑस्ट्रेलिया इकडे उडाली. तिथे स्कायलॅब-विमे निघाले व असंख्यांनी ते उतरवले. भयाने किती लोकांनी झोपेच्या गोळ्या घेतल्या किंवा अफू-भांग ओढली हे आपणास कळण्यास मार्ग नाही. पूर्वी एकदा या लोकांची अशीच भयाने धावपळ झाली. तेव्हा एच. जी. वेल्स या लेखकाचे 'मंगळावरची स्वारी' हे नभोनाट्य चालू होते. तेव्हा मंगळावरचे लोक खरोखरीच पृथ्वीवर हल्ला करावयास आले असे वाटून अमेरिकेत पळापळ झाली होती. तसेच गेल्या अष्टग्रहीच्या वेळी प्रलय होणार या भविष्याला भिऊन फ्रान्समधील लोक टेकड्यांवर जाऊन बसून राहिले राहिले होते.

आताचे हे स्कायलॅबचे संकट प्रलयाहूनही भयंकर होते. यात काल्पनिक काही नव्हते. वरून शेकडो टन पदार्थ कुठे तरी नक्की पडणार होते. कुठे पळून जाऊन ते टळणार नव्हते. तुम्ही पृथ्वीवर कुठेही असा, स्कायलॅब डोक्यावर पडली तर मरण 'गॅरेंटीड' होते आणि प्रत्येकाला वाटत होते, स्कायलॅब आपल्यावर पडली तर! गावातून रोज एक माणूस व गाडाभर अन्न बकासुराला द्यावे लागे त्याहूनही हे भयंकर होते. आपण शास्त्रात अमेरिकेएवढे प्रगत असतो तर स्कायलॅब समुद्रात पाडण्यास आपण अमेरिकेला मदत केली असती; पण आता या संकटाला धीराने सामोरे जाणे एवढाच एक मार्ग आपल्याला होता. या प्रसंगी जगातील कोणत्या राष्ट्रातील लोक जास्त धैर्याने वागले याची पहाणी कुणी केली तर भारतातील लोक जास्त धैर्याने वागले असा निष्कर्ष निघाला असता; पण दुर्दैव हे की, शंकराचार्यांनी अग्रसेन भवनातून जो रामनामाचा संदेश दिला त्याला हवी तेवढी प्रसिद्धी मिळाली नाही. अग्रसेन भवनात आलेल्या शे-सव्वाशे श्रोत्यांपलीकडे तो गेलाही नाही. ◻

शंकराचार्यांच्या प्रवचनाला शंभरसव्वाशे स्त्रीपुरुष होते हे सांगितलेच. आद्य शंकराचार्य गेल्यापासून शंकराचार्यांचे श्रोते एकूण कमीच होत आले. आद्य शंकराचार्यांचे सर्वच निराळे होते. त्यांना वंदन आहे. वयाच्या बत्तिसाव्या वर्षी त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. एवढ्या अल्पावधीत त्यांनी प्रचंड ज्ञानसंग्रह करून मोठमोठ्या पंडितांचा वादात पराभव केला व अद्वैतमताची ध्वजा फडकवली. त्यांनी काय काय केले हे कळण्यास शांकर-दिग्विजय हा ग्रंथ वाचावा. दलित लेखकांनी तर तो अवश्य पहावा. त्यात एक अशी कथा आहे की, गंगेवरून शंकराचार्य स्नान करून येत असता त्यांना चांडालाचा स्पर्श झाला. तेव्हा ते परत स्नान करून आले तेव्हा चांडाल म्हणाला, 'तू मोठा विद्वान दिसतोस; पण माणसामाणसात अंतर नसते हे तुला कसे कळत नाही? अरे! तुझ्या अंगात जसे रक्त, मांस, हाडे आहेत तशीच माझ्या अंगात आहेत. तुला वाचा आहे मला आहे. तुला दृष्टी आहे मला आहे. असे सर्व तेच असता आणि परमेश्वराने आपल्यात काही भेद केलेला नसता तू असा कोण शहाणा की, हा भेद करतोस?' चांडालाचे बोलणे ऐकून शंकराचार्यांनी त्याची क्षमा मागितली व यापुढे असा भेद करणार नाही म्हटले.

वैदिकधर्माची पुनः प्रतिष्ठापना करीत आद्य शंकराचार्यांनी आसेतुहिमालय पदयात्रा केल्या. चार ठिकाणी त्यांनी पीठे स्थापली. भारतात ज्या महापुरुषांनी पायी हिंडून धर्मतत्त्वांचा प्रसार केला अशा पदयात्रिकांत बुद्धानंतर शंकराचार्य येतात. बुद्धाने बनारस-पासून राजगृहापर्यंत आयुष्यभर चालत राहून जगभर धर्मप्रसारास शिष्य धाडले, तर शंकराचार्यांनी पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर असा सर्व भारत अनेकदा पायांखाली घातला. असे पायी जात असता गावात कुठे उतरावे, कुठे भिक्षा मागावी, बरोबर काय बाळगावे, चोरांपासून कसे सावध रहावे हे त्यांनी शिष्यांस सांगून ठेवले आहे. त्यांच्या भज गोविन्दं काव्यात 'अग्रे वन्हिः, पृष्ठे भानु' किंवा 'सुरमन्दिरतरुमूलनिवास' या श्लोकां-

वरून त्यांनी अनुभवलेले पदयात्रिकाचे जीवन कळते. ते श्लोक वाचावे.

आद्य शंकराचार्यांच्या पायी चालण्याबद्दल एवढ्या विस्ताराने सांगण्याचे कारण त्यांच्या आयुष्यातील हा महत्त्वाचा भाग आजचे शंकराचार्य विसरलेले वाटतात. हा लेख त्यांच्या वाचनात आला तर आद्य शंकराचार्य पायी जात होते याची त्यांना आठवण येईल. मग आपले आद्य आचार्य पायी का गेले याचा विचार ते करतील. पदयात्रेने जास्त जनसंपर्क साधता येतो हे आद्य शंकराचार्यांना ठाऊक होते. आज शंकराचार्यांच्या पुण्यासारख्या नगरीतील प्रवचनांना फक्त शंभर श्रोता येतो यावरून त्यांना जनतासंपर्काची अत्यंत आवश्यकता आहे असे मला वाटते.

◘

शंकराचार्यांची व माझी आयुष्यात फक्त दोन वेळा भेट झाली आहे, हे काही विशेष नाही हे मी मान्य करतो; पण असंख्य लोकांनी त्यांना एकदाही पाहिलेले नाही त्यापेक्षा हे बरे. आमचे गाव मुंबई–पुणे रस्त्यावर आहे. केव्हा तरी जातायेताना शंकराचार्य आमच्या गावी थांबले होते. माझे वडील तेव्हा पेन्शन घेऊन गावी रहाण्यास आले होते. गावकऱ्यांनी गावाचे इनामदार म्हणून त्यांच्या हस्ते श्रीमद्‌शंकराचार्यांची पाद्यपूजा करविली. त्या वेळी माझ्या वडिलांनी व आईने पूजा केल्यावर शंकराचार्यांना एक चांदीचे भांडे दिले.

त्यानंतर अनेक वर्षांनी मी पुण्यात खुन्या मुरलीधराच्या मंदिरासमोर त्यांची मोटार पाहिली; पण शंकराचार्य पहाण्यास गेलो नाही. पुढे शृंगेरीला जाण्याचा योग आला. शृंगेरी स्थान मला फार आवडले. गावाला लागून नदी झुळझुळ वाहात असते. लता–पल्लवांनी शृंगारलेल्या होडीतून पलीकडे गेले की, श्रीशंकराचार्यांच्या मठाची इमारत आहे. हे घर एक मजली आहे. या घराच्या पोर्चमध्ये शंकराचार्यांनी आम्हाला दर्शन दिले. पोर्चमधे उभे राहूनच आम्ही बोललो. त्यांनी (आम्ही पुण्याचे म्हणून) पं. वसंतराव गाडगीळ यांचे क्षेम विचारले, आम्हीही त्यांना त्यांचे पुण्यातले वास्तव्य सुखाचे झाले की नाही अशी पृच्छा केली. मधूनच आमच्यासारखी जी दुसरी दर्शनोत्सुक कन्नड-मंडळी आली होती, त्यांच्याशी ते कानडीत बोलत होते. नंतर आम्ही नदी ओलांडून मठाच्या वसतिगृहात आलो. तिथे जेवणाची उत्तम सोय होती.

मला शंकराचार्यांचे असे दोन वेळा दर्शन झाले. असे भाग्य थोड्यांचे ! शंकराचार्य जर पायी चालत गेले तर हे भाग्य अनेकांच्या वाटचाला येईल. शंकराचार्यांनी पायी जाणे आजच्या काळात अनेकांना हास्यास्पद व प्रतिगामी वाटेल; पण आता पायी चालत जाणे हे आधुनिक झाले आहे. आपल्याकडे म. गांधी व विनोबा भावे यांनी पदयात्रा केल्या. एवढेच काय माणसो मोटार असलेल्या अमेरिकेत मार्टिन ल्यूथर किंग यानेही पदयात्रेचाच मार्ग अनुसरला. जगात अनेक ठिकाणी आता पदयात्रा निघू लागल्या आहेत. आरोग्यासाठी डॉक्टर पदयात्रा करायला सांगू लागले आहेत. आपण पायी गेलो तर जुनाट ठरू असे शंकराचार्यांना वाटत असेल तर ते त्यांनी मनातून काढून टाकावे. गुरुपौर्णिमेच्या त्या दिवशीच्या प्रवचनांत अधूनमधून अस्खलित इंग्रजी बोलत होते. त्यांनी स्कायलॅबचा उल्लेख केला. तसेच हल्लीचे शिक्षण हे नास्तिक निर्माण करण्याचे अड्डे आहेत असेही ते म्हणाले. त्यावरून आजच्या प्रश्नांवर बोलून ते आपल्या प्रवचनात आधुनिकता आणण्याच्या यत्नात आहेत हे कळत होते. पायी जाऊन या यत्नाना आणखीन जोर येईल. त्या त्या शंकराचार्यांनी आपापल्या पीठाच्या क्षेत्रात आठ महिने पायी हिंडून धर्मप्रसार करावा असे मी सुचवितो. इतकी वर्षे त्यांनी स्वतःभोवती उभा केलेला तट पाडावा. भगवा ध्वज, धर्मदंड वगैरे घेऊन पीत वस्त्रांतले शिष्य पुढे चालत आहेत, मागे भगव्या वस्त्रातील शंकराचार्य, डोक्यावरचा पदर पुन्हा पुन्हा वर ओढीत शिष्य व भक्तगण यांच्याबरोबर तत्त्वज्ञानाच्या चर्चा करित चालले आहेत हा देखावा पहायला मला फार आवडेल. आधुनिक गोष्टींबद्दल बोलताना प्रथम प्रथम त्यांच्या चुका होतील. काही वेळा ते प्रतिगामी वाटतील; पण लौकरच जनतासंपर्काने विचारांची देवघेव होऊन त्यांना वेगळी जाण येईल.

शंकराचार्यांनी पदयात्रा काढाव्यात हे मी मनापासून सांगत आहे. सर्व जगात धर्माची पीछेहाट होत आहे. चर्च रिकामी पडत आहेत. मशिदीतही फारशी गर्दी नाही. ती वेळ आपल्या देशावरही येत आहे, याची कल्पना शंकराचार्यांना असेलच. मागच्या पिढीतील आमच्या धर्मसुधारकांनी देवधर्माची चिकित्सा करून शंकराचार्यांची धार्मिक सत्ता काढून आपल्याकडे घेतली. पाद्यपूजा करून घेण्याशिवाय शंकराचार्यांच्या हाती आता काही राहिलेले नाही. आज शंकराचार्यांहूनही जास्त विद्वान मंडळी आहेत. आद्यशंकराचार्यांनी मंडनमिश्राला वादात हरविले. या विद्वानांशी वाद घेण्याची पाळी आली तर मंडनमिश्रावर आद्य शंकराचार्यांचा शिष्य होण्याची पाळी आली तशी आजच्या शंकराचार्यांवर येईल. शंकराचार्यांनी आपली भूमिका नीट वठवली नाही म्हणून त्यांच्यावर ही पाळी आली आहे. आज शंकराचार्य गावांत आले केव्हा व गेले केव्हा हेही कळत नाही. ही दुरवस्था गेली नाही तर संस्थानिक गेले तसे शंकराचार्य जातील. आद्य शंकराचार्यांचा वारसा जाण्यापूर्वीच त्यांनी लोकांत पायी हिंडण्यास व आधुनिक जगाबरोबर जगण्यास शिकावे. मी आणखी एक सुचवितो की चारी मठांतर्फे त्यांनी एखादे तत्त्वचिंतनात्मक मासिक चौदा भाषांतून काढावे. त्यात सर्व धर्मांचा, सर्व तत्त्वज्ञानांचा, सर्व माणसांचा, ईश्वराचा मोकळेपणाने विचार करावा. त्यांत आधुनिक शास्त्रे व धर्मचिंतन यांतील दरी कमी करण्याचा प्रयत्न व्हावा.

◘

साधारण आठला प्रवचन संपले. आरतीची वेळ झाली. शंकराचार्य प्रवचन करताना प्रवेशद्वाराच्या समोरच्या भिंतीशी बसले होते. हॉलमधले नेहमीचे व्यासपीठ उजव्या हातास उंचावर होते. तेथे देवघर केले होते. ते शंकराचार्यांनी बरोबर आणलेले देव असावेत. व्यासपीठावर एक चांदीने मढवलेले सिंहासन होते. प्रवचन संपल्यावर शंकराचार्य त्या सिंहासनावर जाऊन बसले.

प्रवचन चालू असता शंकराचार्यांचा एक शिष्य देवपूजा करीत होता. तो व त्याचा सहकारी दोघे उंच, सडसडीत व बांधेसूद होते. त्यांच्या हालचाली चांगल्या वाटत होत्या. दोघांनी मुंडण करून आडवे गंध लावले होते. पूजेच्या शेवटी शिष्याने घंटा वाजवली. आम्ही उभे होतो त्या कोपऱ्यात एक पडघम होता. तिसऱ्या शिष्याने येऊन दोन काठ्यांनी हा पडघम वाजवण्यास सुरुवात केली. आरती सुरू झाली.

गुजराथी लोकांत आपल्याप्रमाणे सर्वजण आरती म्हणत नाहीत. फक्त प्रमुख माणूस आरती इथे म्हणतो. एकटे शंकराचार्य आरती म्हणत होते. पडघमच्या आवाजामुळे शब्दही ऐकू येत नव्हता. मागून कळले की, आरती शंकराची होती. आरती संपताच देवे झाले. मग स्पीकरवर सांगण्यात आले की, दारात प्रसाद घेऊन कार्यकर्ते उभे आहेत. जाताना सर्वांनी प्रसाद घेऊन जावे.

आम्ही प्रसाद घेऊन बाहेर पडलो. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता. काळोखही होता. दोन दिवसांनी पडणाऱ्या स्कायलॅबचो मला आठवण झाली. या पावसाची ढगांच्या वरच्या काळ्या आकाशात ते फिरत आहे. आम्ही उभे आहोत इथेच ते पडले तर ! या कल्पनेनं दचकून 'भज गोविन्दं, भज गोपालं' म्हणत अग्रसेनभवनातून झपाट्याने बाहेर आलो. ☐

# परस्पर संशयावर आधारित असा SALT-2

## सिनेटपुढचा सध्याचा प्रश्न; कार्टरची नवी अडचण

अमेरिका आणि रशिया दोन्ही राष्ट्रांना एकमेकांविषयी कायमच भीती वाटत आलेली आहे. ' Workers of the world unite ' अशी हाक देणाऱ्या लेनिनचा रशिया आता जगात सरळ सरळ साम्राज्यवादीच झालेला आहे. अमेरिकेची जागतिक राजकारणावरील पकड दिवसानुदिवस कमी होत चाललेला आहे हे जगाच्या राजकीय नकाशाकडे नजर टाकता सहज लक्षात येईल. जे अमेरिकेच्या गोटात परवापर्यंत होते, ते एक तर स्वतंत्र (अलिप्त) म्हणून तरी जगू इच्छितात, किंवा रशियाच्या तरी प्रभावाखाली जात आहेय. एवढेच नव्हे, तर अफगाणिस्तानसारखे आधी अलिप्त असणारे देशही आता झपाट्याने रशियन वर्चस्वाखाली गेलेले आहेत. त्यामुळे रशियावर कुरघोडी करण्याचा कोणताही प्रयत्न अमेरिका सोडत नाही. काही नाही तर निदान रशियाच्या अवाढव्य शस्त्र सामर्थ्याला तरी आळा घालावा अशी अमेरिकेची धडपड निक्सनच्या काळात सुरू झाली होती. त्यासाठी निक्सनच्या परराष्ट्रीय धोरणाच्या प्रमुख वैशिष्ट्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. लाल चीनशी एवढी जवळीक साधल्यानंतर रशिया हाच प्रमुख शत्रू अमेरिकेला शिल्लक राहिला होता. त्यामुळे निक्सनच्या कारकीर्दीत SALT-1 (स्ट्रॅटेजिक आर्म्स लिमिटेशन ट्रीटि) पार पडला. व्लाडिवोस्टॉक येथे नंतरचा अध्यक्ष फोर्ड यानेही त्याच धोरणाच्या अनुषंगाने बोलणी चालू ठेवली आणि आता कार्टरनेही विएन्नाला ब्रेझनेवची भेट घेऊन SLTA-2 वर शिक्कामोर्तब केले.

कार्टरची ब्रेझनेवभेटीच्या आधी फारच तारांबळ उडाली होती. अत्यंत नर्व्हसनेस येऊन त्याने आधीचे राष्ट्राध्यक्ष आणि ब्रेझनेव यांच्या भेटींच्या फिल्म्स पाहिल्या, ब्रेझनेवविषयी बारीकसारीक बरीच माहितीही गोळा केली तरीही ब्रेझनेवला भेटताना तो अतिशय टेन्शन खालीच होता ! एकूण बोलण्याचे निष्पन्नही अमेरिकेला फायदेशीर झालेच नाही. तसेच ' जागतिक शांततेसाठी ' या नावाखाली सॉल्टचा जो जयजयकार करण्यात येत आहे, त्यामानाने त्याच्यात फारसा दमही नाही.

नऊ जुलैला अमेरिकेच्या सेक्रेटरी ऑफ स्टेटने, व्हान्सने सिनेटपुढे सॉल्टविषयी भाषण केले. त्या भाषणावरूनही अमेरिका अजूनही जागतिक शक्ती म्हणून एके काळी असलेले स्थान टिकविण्यासाठी किती धडपड करत आहे, हेच लक्षात येते.

अमेरिकेच्या शासनव्यवस्थेत अध्यक्षाला प्रचंड अधिकार दिलेले असले तरीही कायद्याच्या तरतुदींप्रमाणे अशा प्रकारच्या करारांची अंमलबजावणी सिनेटने दोनतृतीयांश मतांनी तो करार मान्य केल्याखेरीज होऊ शकत नाही. या आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या करारावर १८ जुलैला व्हिएन्नामध्ये जरी सह्या झाल्या तरी शेवटी अमेरिकेला सिनेटच त्या कराराचा मसुदा, त्यातला कोणता भाग प्रत्यक्षात आणायचा इ. ठरवणार. हा करार आता सिनेटपुढे आलेला आहे. म्हणून या विषयाची दखल या सदरात मी आता घेत आहे. वस्तुतः करार तीन आठवड्यांपूर्वीच पार पडला आहे; पण त्याचे भवितव्य आताच ठरत आहे. व्हिएन्नाला जायच्या आधीपासूनच कार्टरने घेतलेली भूमिकाच कशी योग्य आहे याचा भांडवलशाही प्रचारयंत्रणेच्या सहाय्याने अमेरिकन सरकारने बराच गाजावाजा केलेला होता; परंतु सिनेटच्या काही वजनदार सिनेटर्सचे प्रथमपासूनच असे मत आहे की, हा सर्व प्रकार रशियापुढे लोटांगण घालण्याचाच आहे. अमेरिका स्वतःच्या संरक्षणव्यवस्थेवर बंधने घालून घेत आहे. मात्र रशियाच्या अत्याधुनिक अशा आर्थिक शस्त्रांमध्ये अमर्याद वाढ सतत होतेच आहे तिला आळा घालण्याची ताकद अमेरिकेकडे नाही, या करारानेही ते साध्य होत नाही, तेव्हा या कराराला काहीही अर्थ नाही.

काही सिनेटर्सची ही भूमिका आधीपासूनच असल्याचे SALT-2 प्रत्यक्षात अवतरण्याविषयी कार्टर साशंक आहे. आधीच लोकप्रियता ढासळत ढासळत किमान पातळीला पोचलेली, त्यात ऊर्जा प्रश्नाने सरकार खिळखिळे झालेले, अशा परिस्थितीत त्याने ज्या करारावर संरक्षणसचिव ब्राउन आणि परराष्ट्रसचिव व्हान्स यांच्या सल्ल्याने सह्या केल्या आहेत, ते सिनेटने नामंजूर करणे, अगर त्यात मूलभूत स्वरूपाच्या दुरुस्त्या सुचवणे, हे अंतर्गत राजकारणाच्या दृष्टीने तर कार्टरला जड जाईलच; पण आंतरराष्ट्रीय राजकारणातही त्याची छीःथू होईल !

व्हान्सने सिनेटच्या फॉरेन रिलेशन्स कमिटीपुढे जे भाषण दिले आहे, त्यातील काही मुद्दे लक्षणीय आहेत. सगळ्यात प्रथम महत्त्व कोणत्या गोष्टीला द्यायचे असेल, तर ती म्हणजे आपल्यात आणि रशियामध्ये एक स्थिर लष्करी संतुलन राखले गेले पाहिजे असा पहिला मुद्दा आहे. आता स्थिर लष्करी संतुलन म्हणजे काय ? संतुलन स्थिर कसे असेल ? रस्सीखेच चालू आहे, त्यात रशियाने आपला जोर वाढवला असे दिसताच, अमेरिकाही आपल्याकडून अधिक ताकद लावणार हे अभिप्रेत आहे, की दोघांनीही शस्त्रकपात करणे अपेक्षित आहे ? SALT च्या तत्त्वानुसार दुसराच (शस्त्रकपातीचाच) पर्याय संभवतो; पण व्हान्सच्या भाषणात पुढे खालील वाक्य आहे. It ( SALT Treaty ) will permit, and in fact aid, the necessary modernization of our strategic forces. आता याचा अर्थ काय लावणार ?

तसेच त्यानंतरही व्हान्सने म्हटले आहे की, अमेरिका तंत्रज्ञानात रशियाहून आघाडीवर असल्याने कराराच्या कालमर्यादेत रशियापेक्षा अमेरिकेलाच जास्तीत जास्त फायदा उठवता येईल, म्हणजे शस्त्रे मिळवता येतील !

ही दोन ठळक उदाहरणे अशासाठी दिली की, उभय राष्ट्रांचा ' जागतिक शांततेसाठी प्रयत्न ' हा दावा आहे हे सिद्ध व्हावे.

अमेरिकेच्या सिनेटपुढे भाषण करताना व्हान्सना आपण मुत्सद्दीगिरीने अमेरिकेचाच फायदा किती करून देत आहोत, हे विशद करणे भाग आहे. कारण त्यांना करार संमत करून घ्यायचा आहे; पण त्याचबरोबर या कराराचे स्वरूप केवळ द्विपक्षीय रहाणार हे यावरून स्पष्ट होते.

एखादा करार द्विपक्षीय असायलाही

मलपृष्ठ १ वर

# झारखंडासारख्या फुटीर चळवळी का फोफावतात?

गीता साने

जानेवारी १९७९. धनबादच्या शेजारचा संताळ परगणा जिल्हा. वारंवार वृत्तपत्रांतून प्रक्षोभक, अनेकदा खऱ्यादेखील न वाटणाऱ्या वार्ता देत होता. नित्य नवीन खेडे... सगळीच नावे... बेलडिहा, आमगाछी, सामपूर इत्यादि. वार्ताही साऱ्या एकसारख्या, एकाच साच्यातून ओतून काढलेल्या. नाव नि आकडे बदलले की नवीन वार्ता तयार.

सर्वच खेडी संताळांची. शेतातील भाताची कापणी चालू होती. 'संताळ जमावाने येऊन आमच्या शेतातील भात कापून नेतात. पोलिसदल नुसते पहात रहाते' ह्या तक्रारी सगळीकडून येत होत्या. मग पोलीस एकदम जागे झाले असावेत. त्यांचे अभिधान एका विशिष्ट प्रकाराने चालू झाले. मध्यरात्रीच्या प्रगाढ अंधारात एखादे खेडे घेरून, खेडचात प्रवेश करायचा. कधी दारे ठाठावून तर कधी दारे फोडून घरात प्रवेश मिळवायचा. दहशत बसवण्यासाठी खेडुतांना मारहाण, बायकांवर बलात्कार, क्वचित गोळीबार व त्यात हत्या आणि आपले 'काम' संपवताना काही माणसे पकडून न्यावयाची. हाच रिपोर्ट प्रत्येक घटनेबद्दल येई. प्रथम तर 'हे सगळे खोटे' असल्याचे सरकारने सांगितले. सुदैवाने इंदिरा राजवटीची एकसंध, एकमुखी निर्विरोध सत्ता जनता सरकारला उपलब्ध नसल्याने 'जनशक्ती' ह्या साप्ताहिकाने बेलडिहा खेडचातील घटनांचा वृत्तान्त मृतांच्या छायाचित्रांसह प्रसिद्ध केला. मग उरल्या हवेतल्या वावडचा व पांढरपेशांची अविश्वासाची वृत्ती. 'रिपोर्ट खोटे आहेत. पोलीस कायदा मोडून अपरात्री कशाला खेडचात जाईल? संताळ लवाड आहेत, शेतामधली पिके कापून नेतात नि मग आपणच तक्रारी करतात. जुलूम झाल्याच्या वार्ता खोटचा आहेत, अतिरंजित आहेत' इत्यादि.

सारखे वाटत होते, एकदा स्वतःच पाहून यावे; पण संताळ परगण्यात दळणवळणाची साधने थोडी. रेल्वे ह्या जिल्ह्याला केवळ स्पर्श करून जाते. स्टेट ट्रान्स्पोर्टच्या बसेस मागणीच्या मानाने फार थोडचा–असून नसल्यासारख्या. धनबाद–दुमका अंतर ११० मैल म्हणून टॅक्सीचा खर्च सामान्य माणसाला न झेपणारा. दिवस थंडीचे व म्हणून लहान. त्यामुळे कार्यक्रम निदान एक आठवडचाचा आखणे जरूर. अशा विविध अडचणींमुळे ह्या भागात जाणे जमेना; पण एका पहाटे अचानक दुमक्याला जाण्याची संधी घरी चालून आली. एक परिचित आपल्या कामासाठी दुमक्यावरून पुढे जात होते. एप्रिलच्या दोन तारखेला त्यांनी मला दुपारी दुमक्याला सोडले व ते पुढे गेले.

दुमका हे संताळ परगण्याचे जिल्ह्याचे ठाणे. मोठेसे खेडे किंवा लहानसे गाव. येथे कुठलेही उद्योग विकासलेले नाहीत. लोकांची गुजराण शेती व जंगलावर होते. पिके निघाल्याने शेते वैराण होती व लांबलेल्या हिवाळ्यामुळे बऱ्याच ठिकाणी झाडांचेही खराटे उभे राहून, वैराणपणा वाढवीत होते. आपण १८ व्या शतकात शिरत आहोत, असा आभास हा प्रदेश निर्माण करीत होता.

स्टॅन्शिला हेमब्रम, ॲडव्होकेट, ह्या बाईंची मदत मला दुमक्याला मिळाली. तिशीच्या आतली, काळीसावळी आणि स्मार्ट. पांढरी धोब्याची साडी, गळचात ॲडव्होकेटच्या पट्टचा. माझी ओळख मी त्यांना दिली. माझ्या येण्याचा हेतू सांगितला व मी कोणाबरोबर आले तेही सांगितले.

'पोलिसांचे अत्याचार झालेल्या जागा पहावयाच्या आहेत का वृत्तपत्रांतील रिपोर्टच्या खरेखोटेपणाची शहानिशा करावयाची आहे का?' त्यांचा प्रश्न. कोणत्याही विशिष्ट घटनेचा खरेखोटेपणा पडताळण्याचे मला कारण नव्हते, तर अशा घटना वास्तवात घडत आहेत का एवढीच माझी जिज्ञासा होती. तेव्हा वृत्तपत्रात न झळकलेल्या अशा जवळच्याच एका खेडचात तीन तारखेला सकाळी जावयाचे आम्ही ठरवले. १९७२ च्या बिहार असेंब्लीच्या निवडणुकीसाठी स्टॅन्शिलांना इंदिराजींनी तिकिट दिलेले होते. निवडणूक ३०० मतांनी त्या हरल्या होत्या, तरी प्रचाराच्या निमित्ताने मतदारसंघातील प्रत्येक खेडे व त्यातील महत्त्वाची माणसे त्यांच्या परिचयाची झालेली होती. आम्ही निवडलेले खेडे कुकुरतोपा त्या मतदारसंघामध्ये होते. कुकुरतोपा दुमक्यापासून पाच मैलांवर तर बेलडिहा वगैरे खेडी चाळीस–पन्नास मैल दूर होती. तेव्हा प्रथम कुकुरतोपा पाहून नंतर जरूर वाटल्यास इतरत्र जावे, ही स्टॅन्शिलांची सूचना मला सहज पटली.

तीन तारखेला बाईंना कोर्टात खुनाची एक केस होती. ती पुढे ढकलून घ्यावयास त्यांनी आपल्या ज्युनियरला सांगितले व 'आम्ही सकाळी येत आहोत, घरी रहा!' असा निरोप कुकुरतोपालाही पाठवला.

मंगळवारी तीन तारखेला आम्ही दोघी बसने कुकुरतोपाजवळ उतरलो, तो जेमतेम सात वाजत होते. गाव मुख्य डांबरी रस्त्याने पाच मैल असेल–नसेल. उतरलो तेथून गाव पाऊलवाटेने २००–२५० यार्ड होते. काही झोपडचा ओलांडून त्या वळणाच्या वाटेने आम्ही एका अंगणात पोचलो. झोपडचा परस्परांपासून थोडे अंतर ठेवून बांधलेल्या, कुडाच्या व मातीच्या. अंगणासकट सर्व घरांचे सारवण सकाळीच केलेले होते व त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत सुरेख थंडगार वाटत होते.

आम्हाला पहाताच तीन–चार माणसे पुढे आली. बसण्यासाठी दोन खाटा आणून घातल्या गेल्या व सर्व लोकांना येण्यासाठी हाकारे झाले. ३५–४० पुरुष दहा मिनिटांत तेथे गोळा झाले. स्त्रिया घरातील चौकात गोळा होत होत्या.

### नवीन सेटलमेंट

कुकुरतोपाची वस्ती ४०–५० उंबरठ्यांची. एक लोहाराचे व अशीच तीन–चार घरे सोडता, बाकी वस्ती संथाळांची. सारे लहान शेतकरी. सध्या ह्या भागात सेटलमेंट सर्व्हेचे काम चालू आहे. पूर्वीचे रेकॉर्ड अपुरे व अविश्वसनीय असल्याने, वस्तुस्थिती आहे तशी न नोंदता, तिच्यात बदल करवून घेण्यास भरपूर वाव आहे. त्यामुळे सर्वत्र तक्रारी व संघर्षाच्या ठिणग्या पडत आहेत. १९६५–६६ मध्ये जुन्या जमीनदारांची कुळे व पोटकुळे ह्यांची कच्ची माहिती गोळा करताना–त्याला बिहारमध्ये बुझारत म्हणतात–अशाच ठिणग्या पडू लागल्यावर तत्कालीन सरकारने बुझारत रद्द करून आजचे मरण उद्यावर ढकलले होते. आजही लोकांचे म्हणणे असे आहे की, ‘सावकार सेटलमेंटच्या अधिकाऱ्यांना पैसे चारून, जमीन गुपचूप आपल्या नावावर करून घेत आहेत. ही जमीन आम्ही पिढ्यान्‌पिढ्या कशीत आलो आहोत व त्या जमिनीवरची पिके आजही आमचीच आहेत. ती आम्ही कापून आणली, त्यामुळे सावकारांशी आमचे भांडण चालू आहे.’

कुकुरतोपाचे सावकार गोराई, किशोरी व गोवर्धन साहू हे बंगाली तर मोहेंदर कानसिंग हा पश्चिम बिहारचा. ह्या चारांपैकी दोघे रसिकपूर येथे तर दोघे चापुडियाला रहातात. ही दोन्ही खेडी कुकुरतोपाजवळच आहेत. त्यांपैकी दोघे सरकारी नोकर आहेत. त्यामुळे त्यांना हवे तसे कागदपत्र सुलभतेने करून घेता येतात. आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ गावाच्या मुखियाने मला एक पर्चा दाखवला. त्या पर्चाप्रमाणे एका शेताचे खरेदीखत १८७२ चे दिसले. ‘एका शतकापूर्वी येथे जमीनदारी होती व ही सावकारकुटुंबे तेव्हा येथे नव्हतीच, तेव्हा हे खरेदीखत खोटे आहे,’ असे त्याचे म्हणणे.

मला त्या म्हणण्यात तथ्य दिसले. शेतकऱ्यांनी भात स्वतःचेच कापून नेले तेव्हा मालकी हक्क प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात असलेले सावकार चिडले व त्यांनी पोलिसांच्या मदतीने ‘आमच्या खेड्यावर धाड घातली.’

घटना १३ डिसेंबर १९७८ ची. मध्यरात्री सारे गाव गाढ झोपेत होते. सेंट्रल रिझर्व पोलिसांनी खेड्याला वेढा दिला. वर उल्लेखिलेले चार सावकार त्यांच्याबरोबर पोलिस गणवेशात होते. पोलिसांनी, कुठे दारे ठोठावून तर कुठे दारे फोडून घरात प्रवेश मिळवला. उठणारे लोक, काय झाले हे न समजल्याने भयभीत होत होते. पुष्कळसे तर मागच्या अंगणाच्या भिंतीवरुन उड्या मारून भोवतालच्या झाडा–झुडुपांत पसार झाले.

छोटो हांडा, बुधन मुरमू, मुन्शी व सिधो मुरम् ही चार, न घाबरता बोलणारी खेड्यातील महत्त्वाची माणसे पोलिसांनी प्रथम पकडली. नंतर त्यांनी खेड्यात नंगा नाच घातला. काही लोकांना मारहाण झाली तर चार स्त्रियांवर बलात्कार झाले. पकडलेल्यांना बरोबर घेऊन पोलिस काही तासानंतर बाहेर पडले. चौदा तारखेला सायंकाळी चार वाजेपर्यंत, पकडलेल्यांना पोलिसठाण्यात अन्नावाचून ठेवलेले होते. कारण त्यांच्या अन्नाचा भत्ता पोलिसांना मिळालेला नव्हता.

चौदा तारखेला दुपारी पोलिसांनी अकराच्या सुमाराला गावावर पुन्हा चढाई केली. डांबरी रस्त्यांजवळचे एक झाड बुधन राना हा वृद्ध, राजा सोरेन ह्या तरुणाच्या मदतीने तोडीत होता. पोलिसांनी त्यांना निर्दयपणे मारावयास आरंभ केला. रात्रीच्या घटनेने खेडुत चिडलेले व सावध होते. धनुष्यबाण घेऊन त्यांनी पोलिसपार्टीला घेराव घातला. संताळांचा नेम अचूक. त्यांच्या धनुष्यबाणाचे भय सर्वांनाच वाटते. पोलीसही बहुधा घाबरले. काही असो, त्यांनी लोकांवर गोळीबार केला व त्यात एक माणूस मृत्युमुखी पडला. त्यानंतर मांझी किस्कू आणि सुरेंदर राणा नावाचा एक पाहुणा–ह्यांना पकडून पोलिस त्यांना घेऊन परत गेले. रात्री पकडलेले चार व हे दोन अशी सहा माणसे सायंकाळी चार वाजता मॅजिस्ट्रेटसमोर उभी करून त्यांना जेलात पाठवण्यात आले. त्यांपैकी पाचजण २७ दिवसानंतर व एकजण दोन महिन्यांनंतर सुटून आले.

ह्या घटनेला वृत्तपत्रांत प्रसिद्धी मिळाली तर ‘रात्री आम्ही खेड्यात गेलोच नाही व खेडुतांनी सडकेवर पोलिसांवर अचानक हल्ला केल्यामुळे आम्हाला गोळीबार करावा लागला आणि माणसे पकडावी लागली’ असे म्हणून आपली, कायदा धाब्यावर बसवून घातलेली रेड लपवण्याची सारी तयारी पोलिसांनी केलेली होती; पण कुकुरतोपाची घटना आरंभीच्या घटनांपैकी होती. त्यामुळे वृत्तपत्रांनाही काय खरे काय खोटे हे समजत नव्हते. त्यामुळे ही घटना दबली व लोक सुटून आले.

### आतल्या चौकात

पुरुषांकडून घटनेचा वृत्तांत ऐकून आम्ही दोघी आतल्या चौकात उठून गेलो आणि बायकांच्या शेजारी जमिनीवर जाऊन बसलो. तीस ते पस्तीस बायका जमलेल्या होत्या. सगळ्यांची शरीरे कष्टाची. बांधा ठेंगणा पण चवळीच्या शेंगेसारखाच लवचिक. पीळदार स्नायू, अंगावर चिमुटभर अधिकीची चरबी नाही की अस्तव्यस्त वाढलेले भाग नाहीत. एक–एक पुढे सरकून बोलू लागली. त्यांची संताळ भाषा स्टॅन्शिला मला समजावीत होत्या. मी प्रश्न विचारून, उत्तरे ऐकत होते.

एका घरामधली बाई गरोदर होती. बलात्कार झाल्यावर तिचा गर्भपात झाला. आज साडेतीन महिन्यांनंतर ती दुखणाईत दिसत होती. घरात शिरून बलात्कार करण्यात आलेल्या आणखी दोन स्त्रिया नंतर पाहिल्या. ह्या तरुण, विशीमधल्या. त्यांनी झालेला अपमान मुकाट गिळलेला होता. त्यानंतर चवथीशी आम्ही बोललो. ती पस्तिशीची असावी; गुडघ्यात मान घालून बसलेली होती. स्टॅन्शिलाच्या प्रश्नाचे उत्तर देताना त्या बाईंनी एकदाच मान उचलून माझ्याकडे दृष्टिक्षेप केला. त्या नजरेत अपार असहायता भरलेली होती. झालेला अपमान बाईंना असह्य झाला असावा व त्याचे उत्तर त्यांच्याजवळ नसल्याने, त्यांना एक दीनवाणेपणा आलेला होता. त्या बाईंच्या नजरेला नजर देण्याचे धैर्य माझ्याजवळ नव्हते. मी चटकन हातामधल्या वहीकडे दृष्टी वळवली.

" तुम्ही त्या लोकांना प्रतिकार केला नाहीत ?"

" नाही बाई " अगदी हळू व केविलवाण्या स्वरात उत्तर आले.

" का नाही केलात ?" माझ्या आवाजाला धार होती. शेवटच्या स्त्रीशी दृष्टादृष्ट झाल्याने ती धार आलेली आहे, हे मला समजत होते; माझी चूकही मला समजत होती; पण माझ्या पोटातली कालवाकालव मला आवरत नव्हती.

" केस ओढा, डोळे फोडा, भाजी कापायची सुरी जवळ असेल तर तिने भोसका; पण बायांनो सोसून नका ग घेऊ !"

एक म्हणाली " बाहेर आणखी धटिंगण उभे होते बाई, पाच-पाच सहा-सहा." त्यांची भीती माझ्यासमोर मूर्तिमंत होऊन माझ्या अंगावर काटा उभा राहिला.

" तुम्ही प्रतिकार कराल तर तुमची धडगत नाही हे मला समजतंय् ग. पण केव्हा तरी भांडावे लागणारच आहे. मरायच्या तयारीने प्रतिकार करा. दहा-पाच जणी बळी जातील अन् मग त्यांनाही थोडी अक्कल येईल. मरू या पण मारीत मरुया ! "

प्रतिकार करण्याची कल्पना त्यांना अगदी नवीन दिसली... शून्य मनाने मी तेथून उठून बाहेर आले. पुरुषमंडळी बाहेर बसलेली होतीच. मी आतून-आतून उठून आले होते.

', बायकांवर बलात्कार झाले तेव्हा तुम्ही कुठे होतात ?

" आई, बाहेरची गडबड ऐकून आम्ही पळून गेलो होतो." मी त्यांनाही एक व्याख्यानाचा डोस पाजला. पुन्हा एक चूक. केवळ वृद्ध स्त्री-आई, म्हणूनच लोकांनी ऐकून घेतले. नंतर माणूस मारला गेला ती जागा पाहिली; भर रस्त्यावरची !


पोलिसमध्ये गुन्हा नोंदवलेला ( FIR ) नव्हता; कारण भयाने सारे गाव भोवतालच्या झाड-झाडोऱ्यात लपून होते. पोरे-बाळेही अन्नापाण्यावाचून होती. गावातले पुढारी जेलात गेल्यावर व पोलिस गांवाच्या आसपास हिंडत असताना, F. I. R. करायला जाण्याचे धाडस करणार कोण ?

गोळीबाराला बळी पडलेल्या माणसाची बायको शहरात कामाला गेलेली होती; मुले मात्र घरी होती. मोठा बारा-तेराचा मुलगा. हातापायाच्या मोळ्या करून एका खाटेवर पडून होता, त्याला बहुधा क्षय असून दुखणे अखेरच्या अवस्थेवर गेलेले दिसत होते. " त्याला दवाखान्यात न्या, तेथे त्याची व्यवस्था करवते " असे सांगून आम्ही तेथून निघालो. त्यानंतर एका घरी चहा व थोडा नाश्ता घेतला व मुख्य रस्त्यावर आलो तो वाजले होते साडेदहा !

रस्ता चांगला वाहता होता. तीन-चार बसेस आमच्यासमोरून गेल्या; पण त्या गच्च भरून. पुष्कळ लोक टपावर बसलेले. ट्रकसही दुमक्याकडे जात होत्या. बैलगाड्या तुरळक होत्याच. बसमध्ये जागा मिळण्याची शक्यता काहीच दिसेना. अखेर एका ट्रकने आम्हाला लिफ्ट दिला व आम्ही साडेअकराच्या सुमाराला माझ्या निवासस्थानी पोचलो. कुकुरतोपाला एक माणूस मेला, चार स्त्रियांवर बलात्कार झाले हे मला पटले. त्याबद्दलची अधिकाऱ्यांची निवेदने वस्तुस्थिती सांगणारी नव्हती, ह्याची मला खात्री पटली.

सायंकाळी मी व स्टॅन्बिला जिल्हाधिकाऱ्यांना भेटावयास गेलो. मला पडलेले अनेक प्रश्न मी त्यांच्यासमोर टाकले. रात्रीच्या अंधारात पोलिस खेड्यात कुठल्या कायद्यानुसार धाडी घालतात ? दारे फोडून


# एक विचार करण्यासारखी गोष्ट




बँकेच्या बचत योजनांसाठी आमच्या कोणत्याही शाखेस भेट द्या.

आपल्या उत्कर्षातील साथीदार

**दि सांगली बँक लि.**

रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली

चेअरमन : एस. आर. रणदिवे

Parkarson 7920

घरात शिरण्याचा अधिकार पोलिसांना कोणी दिला ? त्यांच्याबरोबर सावकार गणवेशात कसे व का जातात ? ... हे जिल्हाधिकारी नुकतेच धनबादहून बदलून आलेले असल्याने, त्यांना माझी थोडी माहिती असावी. माझे प्रश्न त्यांनी शांतपणे ऐकून घेतले. पोलिस-सुपरिटेंडंट ( S. P. ) तेथेच हजर होते. त्यांचे लक्ष जिल्हाधिकाऱ्यांनी माझ्या प्रश्नाकडे वेधले. एस. पीं. नी माझ्या एकाच प्रश्नाचे उत्तर दिले. ' बरोबर गेलेली माणसे सावकार म्हणून नव्हे तर इन्फॉर्मर्स म्हणून गेलेली होती व त्यांनी गणवेशात जावे असा नियमच आहे '. रात्रीच्या धाडी व बलात्कार ह्यांच्याबद्दल मी त्यांना पुन्हा विचारले, ' शिपायांना येवढी सुसंधी लाभल्यावर, त्यांच्यापैकी सर्वजण, स्त्रियांना स्पर्शही न करण्याएवढे धर्मराज निघतील, हे आपल्या भारतीय परंपरेमध्ये तुम्हाला शक्य तरी वाटते का ? ' माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले नाही.

त्या रात्री अचानक आलेल्या संताळांचे पुढारी शिबू सोरेन ह्यांची गाठ पडली. ते अत्यंत निराश व उदास होते. ' बताइये माँ जी, हम क्या करें ? ' अशी ढासळलेल्या स्वरात त्यांनी सुरुवात केली. त्यांनी दिलेली माहिती आजच्या तरुण पिढीला खरी देखील वाटणार नाही; पण ब्रिटिश राजवटीत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी पोलिसांनी अवलंबिलेल्या कारवायांचा मला अनुभव असल्याने, त्यांची कहाणी खरी आहे, ह्याबद्दल मला शंका येण्याचे कारण नव्हते–नाहीही. ते म्हणाले, " पोलिस व सावकार ह्यांची हातमिळवणी झालेली आहे. ' संताळ जाळ-पोळ करण्याच्या धमक्या देत आहेत ', ' दरवडे घालण्याच्या योजना संताळ आखीत आहेत ', ' ते मारामाऱ्या करणार आहेत ' असे खोटे F. I. R. होत असून, त्यांत आम्हा सर्व कार्यकर्त्यांची नावे गोवलेली आहेत. त्यांनी आपलाच गाव जाळून, त्याचा आरोप आमच्यावर केलेला आहे. कशी चळवळ करावी आम्ही ? सांगा ! "

## सरकारी दिरंगाई

मी ४ एप्रिलला उदास मनाने घरी परतले. १९७९ मध्ये असे अनेक कुकुरतोपा ह्या जिल्ह्यात घडले असून, त्याबाबत बिहार असेंब्ली व लोकसभा दोन्ही ठिकाणी प्रश्न विचारण्यात आले आहेत व ' आमच्या कानी सात खडे रे बाबा ! ' स्वरूपाची सरकारी उत्तरे मिळालेली आहेत. तेव्हा वृत्तपत्रांकडे धाव घेण्यात अर्थ नव्हता. मी एक लहानसा रिपोर्ट लिहून तो श्रीमती मृणाल गोरे व धनबादचे क्र. के. रॉय ह्या दोन संसद-सदस्यांना पाठविला.

वरील घटनेची चौकशी करण्याची मागणी स्त्री आमदारांनी केल्याच्या वार्ता आकाशवाणीच्या मराठी–हिंदी–इंग्रजी वार्तापत्रांत येऊन गेल्या. त्यानंतर ह्या आघाडीवर सर्व सामसूम आहे.

बिहार सरकारचे एक परिपत्रक त्यानंतर माझ्या पहाण्यात आले आहे. त्या पत्रकाप्रमाणे १९७८ च्या ऑक्टोबर महिन्यात, बिहार सरकारने अत्याचाराला बळी पडलेल्यांना मदत देण्यासाठी दोन लाख रुपये वेगळे काढले असून, अत्याचारांचे स्वरूप व मदतीची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

(१) हत्या (२) कायमची अपंगता (३) घर जाळणे ह्यासाठी प्रत्येकी रुपये २०००–००, बलात्कारासाठी रुपये १०००–००. बलात्काराच्या गुन्ह्याला आवर घालण्यास सरकार असमर्थ असल्याची ही एक प्रकारे कबुलीच आहे. ' प्रथम स्त्रीशरीराची विटंबना करून, नंतर त्यांना रु. १०००–०० ची लाच देणे, हे त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखेच आहे. हे पत्रक रद्द करवून घेणे मला अगत्याचे वाटते ' असल्याचे मी श्री. रॉय ह्यांना कळविले आहे.

आपद्ग्रस्तांना ह्या निधीतून तावडतोब मदत देण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असून, नंतर त्यांनी हिशोब सरकारला द्यावयाचा आहे; पण मदत देण्यापूर्वी ' गुन्हा घडला ' हे जिल्हाधिकाऱ्यांना मान्य करावे लागेल. म्हणजे पुन्हा साक्षी-पुरावा, कोर्ट-चौकशा हे तंत्र व त्यांत होणारा अमर्याद विलंब आलाच. त्यामुळे इतक्या घटना घडूनही ह्या निधीतून संताळ परगण्यात तरी कोणालाही मदत मिळालेली नाही; पण हजार रुपयांच्या लालचीने स्त्रिया बलात्काराच्या खोट्या तक्रारी करीत आहेत, असा बीभत्स प्रचारमात्र काही जबाबदार मंडळीसुद्धा करीत आहेत.

## संघर्षाच्या ठिणग्या

वर वर्णन केलेल्या संघर्षाच्या ठिणग्या, संताळ परगण्यातच नव्हे तर सर्व ग्रामीण भागात कमीअधिक प्रमाणात पडत आहेत. ह्या विझतील का भडकतील हे सांगणे कठीण आहे. अशा संघर्षाच्या ठिणग्या गेले दीड शतक वारंवार पडलेल्या आहेत. कारण सामाजिक परिवर्तनाच्या त्या अविभाज्य अंग आहेत. आजवर सधन शेतकऱ्याने व सावकारांनी शासनाच्या सहाय्याने संघर्ष दडपून टाकण्यात यश मिळविले. तथापि अशा घटना, पाठीमागे काही गंभीर परिणाम सोडीत असतात. लहान शेतकऱ्यांची जमीन आज सधन सावकारांच्या हातात निर्विघ्नपणे पडू लागल्यास, लहान शेतकरी कुटुंबे भूमिहीन मजूर होतील; त्याचप्रमाणे अंगमेहनतीने शेती न करता, शेतजमीन ' लावून काढणाऱ्या ' मोठ्या शेतकऱ्यांची संख्या वाढेल. मोठे शेतकरी, किमान मजुरी परवडत नाही ह्या सबबीखाली मजुरांना कमी मजुरीवर राबवतात व शेतमजुरांच्या संघटनामुळे किंवा शासनाने कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थित करावयास सुरुवात केल्यामुळे किमान मजुरी देण्याचा प्रसंग आला तर, आपली शेती यंत्रांच्या सहाय्याने करू लागतात. बिहारच्या आरा जिल्ह्यातील एका सधन शेतकऱ्याने ' आमची शेती आता ट्रॅक्टर, थ्रेशर वगैरे मशीनवर अवलंबून आहे ' असे एकदा मला सांगितले. खेड्यातील रोजगार संपला म्हणजे भूमिहीन मजूर पुन्हा शहरात पोटापाठी धावणार. पुन्हा अस्ताव्यस्त वाढणारी शहरे, त्यांच्या सफाई–प्रदूषण वाहतूक अशा अनंत समस्या व झोपडपट्ट्या ! !

संघर्षाच्या ठिणग्या आता सुलभतेने विझणेही कठीण होत आहे. ' ज्याने त्याने आपली पायरी सांभाळण्याची ' भाषा आता एक शतकाहून जुनी झालेली आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीत व नंतर निवडणुकांच्या संदर्भात समतेचा भरपूर प्रचार खेडोपाडी झालेला असून, ह्या प्रचाराने लोकांच्या मनांत काही अपेक्षा, काही आकांक्षा निर्माण झालेल्या आहेत. नोकरशाही मोठ्या प्रमाणात सधन शेतकऱ्यांची पाठ राखून,लहान शेतकऱ्यांविरुद्ध साम-दाम-दंड-भेद असे सर्व उपाय वापरीत आहे. तरी त्याचा उपयोग म्हणण्याजोगा अजून तरी झालेला नाही. राजकीय पातळीवर, स्वतंत्र झारखंडाच्या मागणीला व चळवळीला जोर चढत आहे, तो ह्या अपयशाचेच द्योतक आहे. आजचा संघर्ष हळूहळू कदाचित मऊ पडेलही; पण तो पुन्हा कोठे कोणत्या स्वरूपात डोके वर काढील हे सांगणे कठिण आहे. येथला प्रस्थापित वर्ग पूर्वीच्या जनसंघाचा असून, त्याची प्रतिक्रिया सामान्य माणूस इंदिरावादी होण्यात झालेली आहे. ह्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत उद्याचे भविष्य वर्तविणारा राजकीय ज्योतिषी कुठे मिळणार ? ☐

बिंदुकथा

# निर्वाह

बिंदुसार

मॅनेजरसाहेब केबिनमध्ये येऊन थोडाच वेळ झाला होता. ते नित्याप्रमाणे महत्त्वाचे टपाल चाळत होते. बरेचसे अर्ज–काही–तक्रारी–थोडी सभाबैठकांची निमंत्रणे–मुख्य कार्यालयाकडून आलेल्या काही तंटे-तगादे! सरावाने साहेब कागदावर भराभर सूचना लिहीत होते.

त्यांनी घड्याळाकडे पाहिलं. जेमतेम अर्धा तास झाला होता येऊन–तरी साहेबांना थकवा जाणवू लागला होता. समोरचा कागदांचा ढीग पाहून त्यांच्या मनावर दडपण येत होते. हा ढीग रोज उपसायचा तरी किती? आणि किती दिवस? दिवसेंदिवस कामाचा पसारा आणि गुंतागुंत वाढतच होती. या पसाऱ्याकडे पाहताना अलीकडे–अलीकडे मनात येणारा विचार साहेबांना पुन्हा जाणवला.

सरळ निवृत्त व्हावे का? खूप वर्षे काम केले. निवृत्तीचे सर्व फायदे पूर्ण मिळण्याइतकी त्यांची नोकरी झाली होतीच. या विचाराच्या तंद्रीत साहेबांचे काम एकीकडे चालूच होतेच.

एका किचकट प्रकरणाबाबतचे भलेमोठे पत्र वाचत असता, त्यातील नानाविध गुंते पाहून साहेबांना, आपण व्यवहाराच्या वेगाच्या बाहेर फेकले जात असल्याची तीव्र जाणीव होत होती. ते पत्र वाचून होता होता शिपायाने येऊन सांगितले की त्यांना भेटण्यास कोणी गृहस्थ आले आहेत.

साहेबांच्या कपाळावर सूक्ष्म आठी उमटली. टपाल पहात असताना कोणी आलेले त्यांना आवडत नसे. बोलण्यात गुंतले की एखाद्या महत्त्वाच्या पत्राकडे दुर्लक्ष होण्याची भीती त्यांना वाटे; पण भेटण्यास आलेल्यांना भेटणं त्यांचं कामच होतं.

वर न पाहताच त्यांनी होकारार्थी मान हलवली.

समोर कोणी तरी उभे आहे याची चाहूल लागल्यावर त्यांनी मान वर केली. एक गृहस्थ हात जोडून उभे होते. जुळलेल्या हातात त्यांनी काठी, अधांतरी उभी धरली होती.

'माझं नाव खेडकर! अनंत शिवराम खेडकर' ते गृहस्थ म्हणाले. त्यांचे शब्द कापरे व बोबडे येत होते. ते साहेबांकडे न बघता कोपऱ्यात कुठे तरी बघत होते. जस्ती काड्यांच्या चष्म्याला एका भिंगाऐवजी काळे गोल कातडे लावले होते.

'बसा ना आपण!' साहेब म्हणाले. हाताने चाचपडत खेडकर बसले. केव्हाही ते तटकन उभे राहतील असे वाटावे इतके अलगद बसले. कोटाचे खिसे चाचपत त्यांनी घड्या केलेला एक कागद काढला व थरथरत्या हातांनी साहेबांपुढे केला.

कागद उलगडून साहेब वाचू लागले. कर्जमागणीचा तो अर्ज होता. सरदिशी त्याच्यावरून नजर फिरवून साहेब अस्वस्थपणे समोरच्या भिंतीकडे बघू लागले. काय बोलावे ते त्यांना कळेना. काही क्षण साहेब गप्प राहिलेले पाहून खेडकर बोलू लागले.

'प्राथमिक शिक्षक म्हणून मी वीस वर्षांपूर्वी निवृत्त झालो. पस्तीस वर्षे नोकरी केली. मी एसेस्सी–म्हणजे मॅट्रिक बेकार आहे. मला सुशिक्षित बेकार योजनेखाली तीनशे रुपये कर्ज मिळावे अशी प्रार्थना आहे!'

साहेब अर्जाकडे पहात होते. वळणदार, मोडी धाटणीच्या त्या अक्षरांकडे, शून्यपणे बघत त्यांनी विचारले,

'आपले वय का?"

'त्र्याहत्तर' खेडकर माफक अभिमानाने म्हणाले. घसा खाकरून ते पुढे सांगू लागले 'या वयात धावाधाव होत नाही. दिसत नाही, म्हणून मी शेळ्या पाळणार आहे. बराच विचार करून मी हा व्यवसाय निवडला आहे.'

'खेडकरसाहेब, त्याचं काय आहे' पुढे काय बोलावे याची जुळवाजुळव करण्यासाठी साहेब थांबले. खेडकर कानोसा घेतल्यासारखे कानावर हात ठेवीत बोलले 'तुम्ही विचाराल की या धंद्यात मला किफायत किती? दोन शेळ्या पाळल्या तर वर्षभरात किती नफा होईल याचा सर्व आराखडा मी या कागदावर मांडला आहे; आपण बघा आणि मग आपण बोलू.'

कागद हातात घेत साहेब ओठींवर बोट फिरवीत फिरवीत म्हणाले 'तसं नाही. मला असं विचारायचंय की या वयात आपण ही दगदग कशासाठी करता? घरी कोण कोण आहे?'

खेडकरांना खोकल्याची उबळ आली. खिशातल्या फडक्याने तोंड दाबून धरून ते काही क्षण अस्वस्थपणे स्वस्थ राहिले.

'साहेब, मला दोन कमावती मुलं आहेत. त्यांच्या परीनं ती संसार करताहेत. मला जेवूंखाऊं घालतात; पण त्यांच्यावर सगळा भार टाकणं जिवावर येतं माझ्या! शिवाय रोख पैसा खिशात अजिबात नसणं म्हणजे हात मोडल्यासारखं वाटतं.'

'मग शिकवण्या का नाही करीत?'

हे संभाषण निरर्थक आहे याच्या जाणिवेनं साहेबांनी पडक्या आवाजात विचारले.

'करीत होतो! पण आता अभ्यासक्रम फार बदलले. डोळ्यांनी दिसत नाही. लाचार आहे. साहेब, मला एकवार संधि द्या–तुमचे पैसे बुडविणार नाही. अनुभव घेऊन बघा!'

साहेबांनी चष्मा काढून टेबलावर ठेवला. त्यांची चर्या अलिप्त झाली. समजावणीच्या सुरात ते म्हणाले.

'तुमच्या अडचणींची मला कल्पना आली; पण तुम्हाला सुशिक्षित बेकार समजता येणार नाही. त्या स्कीममध्ये तुम्ही बसत नाही!'

खेडकरांनी उठल्यासारखे करीत टेबलाच्या कडेला हात जोडले व दीनवाणा चेहरा करून ते उभे राहिले.

'ठीक आहे. आपण आता जा. बघतो मी काय करायचं ते' साहेबांनी इतके बोलून कागद समोर ओढले. फोनची घंटा वाजू लागली. फोनवर बोलण्यात साहेब गुंतले. पंचवीस हजार, तीस हजार–पन्नास टक्के ताळेबंद वगैरे शब्दांची फैर झडू लागली. बावरल्यासारखे थोडा वेळ उभे राहून खेडकर थबकत थबकत चेंबरच्या बाहेर गेले.

फोन ठेवून साहेबांनी कॉलबेल वाजवली व असिस्टंटला बोलावण्यास शिपायाला सांगितले.

हातात पेन धरूनच असिस्टंट आले. नम्रपणे उभे राहिले.

"हं बघा लाटे, हा अर्ज हेड ऑफिसला पाठवून द्या. नियमात बसत नाही सबब नामंजूर करा म्हणावं.'

मान हलवीत कागद घेऊन असिस्टंट निघून गेले.

मॅनेजरसाहेब डोक्यामागे हात गुंफवून मागे रेलले. एका विचित्र केसचा योग्य निकाल लावल्याचे समाधान त्यांच्या चर्येवर दिसू लागले. पण या समाधानात अगतिकता आणि सुटकेची भावनाही होती. टेबलावरची आपल्या नावाची पाटी त्यांनी नकळत सरळ करून ठेवली. □

कुरुक्षेत्र केरळ । लेखांक सहावा

विनय हर्डीकर । सतीश कामत

# केरळात संघ असा आला, असा वाढतो आहे....

केरळमध्ये मार्क्सवादी पक्षाचं काम कसं सुरू झालं, वाढलं याचा धावता आढावा मागील लेखात घेतला, त्यांच्या काही गफलती निदर्शनास आल्या, त्याही व्यक्त केल्या. एळवा आणि दलितसमाज यांच्या वेगळ्या अस्मितेची निर्मिती व वाढ कशी झाली, काही काळ मार्क्सवाद्यांना ती उपयुक्त कशी ठरली तेही पाहिलं आणि आता केरळातला हा बहुजन समाज फार मोठ्या प्रमाणावर रा. स्व. संघाकडे का वळला ते पहायचं आहे. संघाच्या सर्व पातळींवरच्या कार्यकर्त्यांना आम्ही भेटलो हे पूर्वी सांगितलंच. सनत्कुमार हा कन्नोरचा जिल्हाप्रचारक तर तीन दिवस तेलीचरी आणि आसपासच्या प्रदेशात आमच्याबरोबर हिंडतच होता. ब्राह्मणसमाजतला हा युवक चांगल्यापैकी इंग्रजीमध्ये आमच्याशी संवाद साधू शकत होता. चांगल्या विनोदांना दाद देत होता आणि स्वतःदेखील अधूनमधून कोटचा विनोद करून आमची मनं रिझवत होता. महाराष्ट्रातही असे प्रचारक थोडे-फार आहेत, त्यांच्या संख्येत वाढ होईल तो सुदिन ! सनत्कुमार बी. एस्सी. नंतर प्रचारक म्हणून बाहेर पडला आहे आणि तेलीचेरीमध्ये बचावफळी संघटित करणं, मृतांच्या आप्तांना धीर देणं, अधूनमधून त्यांच्या घरी जाणं, प्रत्यक्ष मदत गोळा करणं आणि तिचा योग्य विनियोग करणं अशी सर्व कामं त्याच्याकडे असतात. पंचविशीचं वय आणि गौरवर्णी चेहरा, सावध नजर व हसतमुख मुद्रा. प्रचारकाची सगळी पेटंट तंत्र त्यानं आत्मसात केलेली दिसली. कुणाच्या खांद्यावर हात ठेव, पाठीत गुद्दा मार, हात हातात धरून चार पावलं चालून जा किंवा एखाद्याशी तो इतक्या हळू आवाजात बोलायचा की त्या स्वयंसेवकाला वाटावं की फार महत्त्वाचं, गोपनीय काम आपल्याकडे मुद्दाम सोपवलं जातं आहे. आमच्याशी बोलताना तो प्रथम सावध होता; पण काही तासांच्या सहवासानंतर मात्र त्याची कळी खुलली आणि तिसऱ्या दिवशी तर एकीकडे आमची कालिकतला परत जाण्याची घाई तर दुसरीकडे त्याची माहिती सांगण्याची उत्कटता अशी स्पर्धाच लागली. शेवटी आम्हीच त्याला थोडी माहिती तुझ्याजवळ शिल्लक राहू दे, असं सांगून त्याचा निरोप घेतला.

सनत्कुमारला मल्याळी सनलकुमार म्हणत, सनलन हे अधिक लोकप्रिय नाव. प्रत्येक घरात त्याचं फार मनापासून स्वागत होत असे. घरचा माणूस यावा तसं रवींद्रनच्या पत्नीला आणि सासूला आम्ही भेटायला गेलो तिथे वाटेत एका थिय्या कुटुंबाच्या घरी थांबलो होतो. त्या घरी फक्त आई आणि तिची मुलगी घरात होती. स्वयंसेवक असलेला मुलगा आम्ही तिकडे असताना पुण्यात कुठल्या तरी टायरवर्क्समध्ये कामासाठी आला होता. सनत्कुमार दिसताच माहेरचा माणूस घरी यावा तशी तिची धावपळ सुरू झाली. आम्ही रवींद्रच्या घरी जाऊन येईपर्यंत तिनं खास स्वैपाक केला, आम्हाला महाराष्ट्रात जे मिळणार नाही असं जेवण करून ते ते पदार्थ आग्रहानं वाढले, गरज पडली असती तर त्या बाईनं आमच्यासाठी माडाच्या झाडावर चढून नारळही काढले असते. ती सारखी मृत चंद्रशेखरची आठवण काढत होती आणि 'आता सगळं पीकपाणी चांगलं असताना तो बिचारा नाही. एरवी तोच मला धीर द्यायचा !' असं म्हणून हळहळत होती. थोड्या-फार फरकानं हेच सगळ्या घरी घडत होतं. एका अगदी अनोळखी कोकणी कुटुंबानं केवळ सनत्‌बरोबर आलो म्हणून आम्हाला फार आग्रहानं जेवू-खाऊ घातलं; पण जेवण असं तिखट की घास घेताच डोळ्यात पाणी यावं ! केरळच्या कामात हा प्रचारक फार पुढे जाणार आहे हे आताच दिसतं आहे ! केरळमधल्या सर्वच प्रचारकांच्या बाबतीत आणखी एक महत्त्वाची गोष्ट जाणवली. महाराष्ट्रात मार्क्सवाद, यांची चर्चा सुरू झाली की संघकार्यकर्ते फार काळ टिकू शकत नाहीत असा अनुभव येतो. ते धर्म-परंपरा-भारतीय संस्कृती वगैरे विषय शॉक ॲबसॉर्बरसारखे पुढे करतात. केरळमधले कार्यकर्ते मार्क्सवादाशी झगडूनच वाढताहेत. त्यामुळे सनत्कुमार व इतरही अनेकजण त्याही विषयांवर मोकळेपणानं मतं मांडीत. मार्क्स धर्माला प्रस्थापिताचा एक महत्त्वाचा भाग मानत असे, म्हणून त्यानं धर्माला अफूची गोळी म्हटलं आणि म्हणूनच धर्माच्या नावाखाली समाज संघटित करू पाहणारा संघ त्याच्या अनुयायांना शत्रूसमान वाटतो, हे सनत्कुमारला चांगलं कळलेलं दिसलं. आम्ही धर्माचा उपयोग शत्रुत्वाऐवजी मैत्री निर्माण करण्यासाठीच करतो, त्यावर कम्युनिस्टांनी रागवण्यासारखं काय आहे असं तो म्हणाला. त्याच्या वाक्याचा बोलविता धनी (प्रांतप्रचारक श्री. भास्करराव) आम्हाला नंतर भेटला. त्यांनी त्या तत्त्वाचं विवरण केलं.

संभाषण अधिकाधिक मित्रत्वाचं झाल्यावर आम्ही त्याला एक फार महत्त्वाचा प्रश्न विचारला. अमुक एका व्यक्तीवर तो केवळ मार्क्सवादी आहे म्हणून हल्ला करायचा असं तुम्ही ठरवता का ? कदाचित तो मार्क्सवादी असला तरी सज्जनही असेल असं तुमच्या मनात येत नाही का ? या प्रश्नावर हा जिल्हाप्रचारक चिडला नाही. गंभीर झाला, अंतर्मुख झाला. तेलीचेरीच्या गल्लीबोळातल्या अंधारात आमची चर्चा सुरू होती. तो म्हणाला 'खरं आहे तुमचं म्हणणं; पण आमचं काम मुख्यत: प्रतिकारात्मकच आहे. कोणत्याही निरुपद्रवी

मार्क्सवाद्याला एकटा-दुकटा गाठून आमचे लोक हल्ला करत नाहीत. तो व्यसनी, दुष्ट आणि आमच्यावर हल्ला करणारांपैकी असला तरच चकमक होते. चंद्रशेखरचा खून पाडणारा राधाकृष्णन असा अचानक एका गटाच्या तावडीत सापडला आणि मेला. एरवी मात्र आम्ही सतत जागरूक असतो. कारण गोरगरीब सज्जनांवर हल्ले करून आम्हाला जनतेची सहानुभूती गमवायची नाही. तथापी वातावरण इतकं तापलेलं आहे की एखाद्या वेळी आमच्या लोकांनाही संताप आवरत नाही व चूक होतेही!' त्याचं हे गंभीर, प्रामाणिक उत्तर फार महत्त्वाचं आहे. विशेषतः कुणावरही वर्गशत्रू, प्रतिक्रियावादी वगैरे शिक्के मारून खून पाडणारांशी लढताना असा विवेक पाळला जात असेल तर त्याचं स्वागत केलं पाहिजे. सामाजिक कार्ये व संस्था ताब्यात घ्यायच्या, आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी चळवळी उभ्या करायच्या, दलितसमाजाशी एकरूप व्हायचं हे काम संघानं केलं पाहिजे ही जाणीव सनत्कुमारच्या बोलण्यात सतत होती.

## प्रसन्न कार्यालये, प्रसन्न कार्यकर्ते

तेलीचेरीतलं काम संपवलं आणि ॲड. नायर व सनत्कुमार यांचा निरोप घेऊन आम्ही कालिकतकडे परत निघालो. आमच्याबरोबर त्या विभागाचे प्रचारक श्री. सेतुमाधवन् हे होते. तेही जवळजवळ वीस वर्षे प्रचारक म्हणून काम करत आहेत. चाळिशीचे सेतुमाधवन् प्रकृतीने दणदणीत आहेत आणि पाहताक्षणी समोरच्या माणसावर ते छाप पाडू शकतात व आदरही निर्माण करू शकतात. हा कार्यकर्ता अधिक बुद्धिमान आणि मार्मिक वाटला. तुमचं बोलणं जास्त वेळ ऐकणारा आणि नंतर एखादीच मार्मिक प्रतिक्रिया व्यक्त करणारा. कालिकत, कन्नोर आणि मल्लापुरम, वायनाड या भागाचे ते प्रचारक आहेत. राजकारणापासून तें चांगली थिएटर्स कुठे आहेत इथपर्यंत सर्व विषयांवर ते बोलत होते— आम्ही वायनाडच्या डोंगराळ प्रदेशात निदान एक दिवस जाऊन यावं, तिथं आदिवासींसाठी विश्व हिंदू परिषद, आदिवासी कल्याण समाज या संघपरिवारातल्या संस्थांनी चालवलेली कामं पाहावी असं त्यांनी सुचवलं. श्री. चंद्रशेखरन् या आदिवासी विभाग प्रचारकाची गाठ घालून देण्याचं ठरलं. 'चंद्रशेखरन्ना इंग्रजी येतं का?' असं आम्ही लगेच विचारलं. कारण भाषेची अडचण 'अहो येता, जाता, उठता, बसता' दाणादाण उडवून देत होती. आमच्या प्रश्नावर ते नुसते छद्मी हसले आणि म्हणाले, 'तो आदिवासी विभाग प्रचारक आहे, स्वतः आदिवासी नाही.' आणि आमची वेव्हलेंग्थ लगेच जुळल्यासारखी झाली. मात्र सेतुमाधवनचा फारसा सहवास आम्हाला मिळाला नाही. ते कालिकतला आम्हाला सोडून लगेच तोरावूर या आलेप्पी जिल्ह्यातल्या OTC ला जाणार होते. तोरावूरलाही त्यांची एकदाच ओझरती गाठ पडली.

कालिकतचं संघाचं कार्यालय फार छान आहे. एका छोटया बंगलेवजा घरात आहे. अर्नाकुलमचं कार्यालय तर भव्यच आहे आणि नागपूर कार्यालयासारखंच बांधलं आहे. शिवाय अर्नाकुलमच्या कार्यालयाला स्वतःची अशी ५ एकर शेतीही आहे. मंगलोरचं कार्यालयही खूप मोठं, प्रशस्त आहे. या सगळ्या कार्यालयांमधून पुण्याच्या पत्रकारांचं फार स्वागत होत असे. शिवाजीचं पुणं, टिळकांचं पुणं, सावरकरांचं पुणं आणि एके काळी दर वर्षाला शंभर—शंभर प्रचारक धाडणारं पुणं! तिथं आता काय चालतं, ते बिचाऱ्यांना माहीत नव्हतं म्हणून ते आमच्यावर फार प्रेम करीत असत. आम्हीही त्यांच्या अज्ञानाचा भरपूर फायदा उठवत होतो. कार्यालयं स्वच्छ, टापटिपीची असत. आंघोळीची उत्तम सोय असे. नेहमी राहणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी जेवणघर—स्वैपाकी ठेवलेला असे. सकाळचं प्रातःस्मरण सोडलं तर कोणत्याही कर्मकांडाचा आग्रह धरला जात नसे. अर्नाकुलमचे काही मिश्कील तरुण तर म्हणायचे की, प्रातःस्मरण संपलं की आम्ही परत झोपायला मोकळे होतो. बहुतेक ठिकाणी ग्रंथालय होती. मात्र ग्रंथ वाचणारा मनुष्य फारसा दिसला नाही. सतरंज्या, चटया, पांघरुणं असत, गाद्या क्वचितच असायच्या. भिंती भगव्या रंगाच्या निरनिराळ्या छटा वापरून रंगवलेल्या असत. सर्व कार्यालयांमधून कै. हेडगेवार, कै. गोळवलकरगुरुजी, श्री बाळासाहेब देवरस, शिवाजीमहाराज, राणा प्रताप आणि श्री. नारायणगुरु यांचे फोटो असतच! अर्नाकुलमच्या कार्यालयात डॉ. हेडगेवार यांचा एक सुंदर अर्धपुतळा होता. तो हॉल फारच स्वच्छ असे. रोज सकाळी तिथे एक उदबत्ती लावली जाई. तेवढीच विभूतिपूजा!

कार्यालयातलं वातावरण फार खेळीमेळीचं असे. कधी कुणी कुणावर आवाज चढवलेला ऐकू आला नाही. सकाळची न्याहारी उरकताच प्रत्येकजण आपापल्या कामाला निघून जाई. शाखा, वर्तमानपत्रं, निधिसंकलनं, कोर्ट-कचेऱ्या, कार्यकर्त्यांच्या बैठकी अशा नाना कामांची वाटणी केलेली होती. ज्यांच्याकडे विशिष्ट जबाबदारी नव्हती आणि जे विश्रांतीला वगैरे आलेले होते ते इकडेतिकडे करत वेळ घालवत. अशा तरुणांकडूनही आम्हाला मोडक्यातोडक्या भाषेत खूप माहिती मिळाली. ध्यानात घेण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे कुठेही अनावश्यक श्रीमंती नव्हती, तसंच सक्तीचं दारिद्र्यही दिसलं नाही. प्रचारक सुस्थितीत होते, आमच्याबरोबर फिरताना आतिथ्यशील होते. तत्परतेनं पैसे खर्च करण्यासाठी धडपडत होते. त्याचा मात्र आम्ही गैरफायदा घेतला नाही हे ओळखीच्या मित्रांसाठी नमूद केलं पाहिजे. मात्र संघाकडे जमा होणाऱ्या गुरुदक्षिणेचं होतं काय, असा प्रश्न अनेकांना भेडसावतो म्हणून ही सर्व माहिती दिली आहे. केवळ केरळात असे १३० प्रचारक आहेत व प्रत्येकावर निदान ५०० रुपये महिना खर्च होत असावा असा अंदाज आहे. या प्रमाणात अखिल भारतीय जमाखर्च काढला तर केवळ प्रचारकांसाठीच काही कोटी रुपये लागत असतील. केरळात तर कोर्ट-कचेऱ्या, पुनर्वसन, वकिलांची फी असे इतर नैमित्तिक खर्चात भर टाकणारे जास्तीचे खर्च आहेतच.

## मुक्काम कालिकत

कालिकतमध्ये तिथल्या 'केसरी' साप्ताहिकाचे सध्याचे संपादक श्री. ए. व्ही. कृष्णन यांची भेट झाली. प्रकृतीने तोळामासा असलेले कृष्णनही पूर्वी प्रचारकच होते; परंतु आधीचे संपादक श्री. पी. परमेश्वरन दिल्लीच्या दीनदयाळ शोध संस्थानच्या कामात गेल्यामुळे त्यांच्याकडे 'केसरी'ची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. रोडकी अंगकाठी, जाड चष्मा, बसके गाल, उलटे फिरवलेले केस व सावळा वर्ण या सगळ्यामुळे ते चिं. त्र्यं. खानोलकरांसारखे वाटले, मात्र खानोलकरांपेक्षा खूपच उजळ आणि कमी लहरी दिसले! त्यांच्याशीही खूप हास्यविनोद झाला. अनेक मृतांचो छायाचित्रं मिळाली' इतर उपक्रमांचीही मिळाली त्यांच्या साप्ताहिकाचीही माहिती

मिळाली. त्यांच्यामुळेच कालिकतचे एक मराठी व्यापारी श्री. श्रीराम गुर्जर यांच्या घरी खास मराठी वातावरणात मराठी पद्धतीचं जेवण मिळालं. त्यामुळे कालिकतच्या बकालपणाला आणि उकाड्याला वैतागलेले आम्ही दुसऱ्या दिवशी आदिवासी भाग पाहायला निघालो तेव्हा फार खुशीत होतो. आधी पोटोबा...वगैरे !

आदिवासी नसलेले चंद्रशेखरन शास्त्राचे पदवीधर आहेत व पंधरा वर्षे प्रचारक आहेत. गेल्या वर्षापासून त्यांच्याकडे हे काम सोपवण्यात आलं आहे आणि एकूण भारतभर सुमारे शंभर प्रचारक या कार्यासाठी वेगळे काढण्यात आले आहेत. कालिकत समुद्रसपाटीवर, तर वायनाड भाग२८००फूट उंचीवर आहे. आपल्या रायगड किंवा माथेरानसारखा. केरळात आपल्या कोकणाप्रमाणे मधेमधे उभे–आडवे सुटे डोंगर नाहीत, रांगाही नाहीत, म्हणूनच तिथं किनारपट्टीच्या रेल्वेचं काम सहज झालं आणि लौकरही झालं व आपली कोकणरेल्वे अजून नुसत्या धापाच टाकते आहे. कालिकत ते वायनाड हा रस्ता फार सुंदर आहे. ७–८ मैलांचा घाट तर फारच छान आहे. रबर आणि सागवानाच्या वृक्षराजींनी भरलेला आहे. असंच या पठारावरून पुढे उटीकडे जाता येतं. उटी फक्त ऐंशी मैल आहे. मात्र रस्ता असा वेडाकाकडा की ५–६ तासांपेक्षा जास्त वेळ जायला लागावा. कालिकतनंतर वायनाडच्या पठारावर आल्यावर एखाद्या वातानुकूल सभागृहात शिरल्यागत वाटलं. हवा कोरडी, थंड, निसर्ग हिरवागार, माणसं मात्र रंग गेला तर पैसे परत अशी !

## निसर्गातलं कार्य

वायनाड भागातल्या कामाचं आणि संघर्षाचं स्वरूप हे तेलीचेरीतल्या संघर्षाच्या अगदी उलट आहे. तेलीचेरीत ' शठं प्रतिशाठ्यं ' असा प्रकार आहे. वायनाडभाग डोंगराळ आणि जंगलानी व्यापलेला आहे. वाघ, अस्वलं, जंगली बोकड, हरणं भरपूर आहेत. लोकवस्ती अगदीच कमी आहे. पुण्यातल्या काही मार्क्सवाद्यांना वायनाडभागात क्यूबाप्रमाणे गनिमी काव्याचा उठाव होणार आणि त्यातून केरळात क्रांति घडणार असं वाटत असतं. नक्षलवाद्यांनी या भागात काही खून केलेदेखील; परंतु ते एकटे पडले, नामशेष झाले. वायनाडभाग नायर आणि ख्रिश्चन श्रीमंत मळेवाल्यांनी, जमीनदारांनी भरलेला आहे. कोणतीही सत्ता त्यांचं काही वाकडं करू शकणार नाही इतके हे चहाचे, कॉफीचे मळेवाले लोक श्रीमंत आहेत; बिनधास्त आहेत ! मिशनरी संस्थांतर्फे अनेक हॉस्पिटल्स या भागात आहेत, चर्चेसही खूप आहेत. प्रवास करताना दर दोन-पाच मिनिटाला एखादा तरी क्रूस दिसतोच. अशा भागातल्या गरीब आदिवासींना, हरिजनांना आणि एळवांना मिशनरी मदत करतात ती मुख्यतः वैद्यकीय, आर्थिक स्वरूपाची असते आणि त्यांच्या मुलांना मिशनच्या शाळांमधून शिक्षण व पुढे नोकऱ्या देण्याचं धोरण असतं. इतक्या प्रलोभनांना बळी पडून धर्मांतर करण्याची प्रवृत्तीही सहज निर्माण होते. या भागातल्या हिंदू श्रीमंत नायरवर्गाने मात्र नायर सर्व्हिस सोसायटीतर्फे शाळा, हॉस्पिटल्स काढून आपल्या जातीपुरती सोय पाहिली आहे. म्हणूनच संघ, विश्व हिंदू परिषद, आदिवासी कल्याण आश्रम यांनी एकत्र येऊन मिशनऱ्यांच्या तावडीतून आदिवासी व हिंदू दलितांना मुक्त करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

तेव्हा ' घटासी आणावा घट ' चा इथे उपयोग नाही. जो जो भेटतसे नर। महार, धेड, चांभार। राखावे तयाचे अंतर। या नाव धर्म ॥ ही या भागातली घोषणा आहे. या भागात सध्या एक गावठी हॉस्पिटल आहे आणि तिथे डॉ. कृष्णन् हे पूर्ण वेळ काम करतात. सरकारी नोकरीतून निवृत्त झालेल्या एक परिचारिकाबाईदेखील स्वतःचे घरदार सोडून तिथे आडरानात येऊन राहिल्या आहेत. या रुग्णालयासाठी दोन एकर जमीनही देणगी म्हणून मिळालेली आहे, व तिथे पुढे-मागे कॉफीची लागवड करून तो पैसा हॉस्पिटलसाठी वापरावा अशी कल्पना आहे. सध्या दहा कॉट्स् असून प्रसूतीची सोय उपलब्ध आहे. डॉ. कृष्णन् आणि त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नांमुळे आदिवासींना नियमितपणे डॉक्टरकडे यायची सवय हळूहळू लागत आहे. रोग्यांच्यासाठी जवळपासच्या सामाजिक संस्था आणि डॉक्टर यांच्याकडून औषधं गोळा केली जातात. खरूज, निःसत्त्व आहार, रक्तक्षय हे या भागातले प्रमुख विकार आहेत. मात्र हॉस्पिटलकडे स्वतःचे वाहन नसल्यामुळे फार दूरवरच्या रोग्यांपर्यंत पोचणं किंवा स्वतः तिथे जाणं अजून शक्य होत नाही. मुख्य अडचणी रोगी मंडळींनी योग्य वेळी डॉक्टरकडे येणं, जादूटोण्याच्या नादी न लागणं, औषधं सांगितलेल्या वेळेला व सांगितलेल्या प्रमाणातच घेणं, आपले केसपेपर्स न हरवणं अशाच आहेत. महाराष्ट्रात व इतर प्रांतांतदेखील प्राथमिक आरोग्यकेंद्रांवरचे डॉक्टर्स या अडचणींमुळेच वैतागलेले असतात. डॉ. कृष्णन् हा माणूस मात्र फारच भोळाभाबडा वाटला. त्या मानाने चंद्रशेखरन् अधिक गंभीर प्रकृतीचे आणि वस्ताद होते. काही महिन्यांपूर्वी याच हॉस्पिटलमध्ये काम करणारी एक नर्स मरण पावली, तिच्या मुलीला हॉस्पिटलने दत्तक घेतलं आहे.

या छोटेखानी हॉस्पिटलशिवाय या भागातील दुसरं काम म्हणजे शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणं. शासनातर्फे आदिवासींसाठी वेगळ्या शाळा काढल्या जातात; परंतु चंद्रशेखरन् यांचा अनुभव असा की, वेगळ्या शाळांत शिकल्यामुळे आदिवासी मुलांचा 'ट्रायबल कॉम्प्लेक्स ' कायमच राहतो. शिवाय त्यांची इतर मुलांशी स्पर्धा न झाल्यामुळे प्रगतीही बेताची होते. म्हणून सर्वसामान्य शाळांतच या मुलांना पाठवून त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. या दृष्टीने या भागात तेरा बालवाड्या आणि पंधरा प्रौढ शिक्षणवर्ग सुरू केलेले आहेत. हेही काम अतिशय प्राथमिक स्वरूपाचं आहे. बालवाडी म्हटल्यावर लगेच झोपाळे, खेळणी, नाच करणाऱ्या शिक्षिका, पेटीच्या सुरावर गाणी वगैरे जे आपल्या डोळ्यांपुढे उभं राहील, ते तिथं काही नाही ! खोल्या आहेत, बाकडी आहेत, डोक्यावर छप्पर आहे, खेळायला अंगण आहे एवढंच. इतर साधनं मिळाल्याशिवाय या शाळांकडे जास्त मुलं वळणार नाहीत. त्याला पैसा हवा, तो मात्र मिशनऱ्यांकडे प्रचंड आहे. नायरांच्याकडेही आहे. अशा एका जुजबी बालवाडीच्या समोरच त्या भागातली एक नायर सर्व्हिस सोसायटीची निवासी शाळा आपल्याकडल्या पाचगणीच्या फॅशनेबल शाळांच्या दिमाखात उभी होती.

आदिवासी प्रचारकांनी आम्हाला एका आदिवासी वस्तीमध्येही नेलं. मोटाररस्त्यापासून ही वस्ती दोन मैल आत होती आणि अत्यंत झाडीच्या भागात होती. त्या भागातल्या पाणवठ्यातनं एक कॅथॉलिक मिशनरी पांढरेशुभ्र कपडे घालून धर्मप्रसार करीत हिंडताना दिसला.

आमच्याबरोबरच्या प्रचारकांचा झगडा त्यांच्याशी आहे. मिशनऱ्यांचे उत्तम गुण अंगी बाणवल्याशिवाय विश्व हिंदू परिषदेला तरणोपाय नाही, याची जाणीव चंद्रशेखरन्‌ला होती. मिशनऱ्यांचा डामडौल बाजूला ठेवून त्यांच्याइतक्याच प्रेमाने हा प्रचारक त्यांच्यामध्ये फिरत होता. त्या वस्तीतून दोघा गुणी विद्यार्थ्यांना हायस्कूलच्या जवळच्या गावामध्ये ठेवायचं होतं, त्याविषयी त्यांची चर्चा चालली होती. उतरणीवर पक्के ओटे करून त्यावर सुरेख सारवलेली गवताळू घरं, मध्येच एखादं मंगलोरी कौलांचं घर आणि वस्तीच्या मध्यभागी एक देवळासारखं, सगळ्यांना जमता येईल असं रिकामं घर अशी या वस्तीची रचना होती. हे लोक अजूनही तीरकमठ्याच्या मदतीनंच ,शिकार करतात. जनावराला पोलादी बाणानं मारतात, तर पाखराला लाकडी टोक असलेल्या बाणानं. आमच्या करमणुकीसाठी त्यांनी धनुर्विद्येची थोडी-फार प्रात्यक्षिकंही दाखवली. एकूणच वायनाडच्या वातावरणाचा आणि चालू असलेल्या कामाचा फार खोल ठसा मनावर उमटतो. तिथून कालिकतला परत येणं अगदी जिवावर आलं होतं; परंतु आलेप्पीला जाऊन तिथल्या ओ. टी सी. मध्ये प्रांतप्रचारक श्री. के. भास्करराव यांना भेटणं अत्यावश्यक होतं. हा कोणी तरी मल्याळम् मातृभाषा असलेला प्रौढ, गंभीर मार्तंड मनुष्य असणार; तो आपल्याशी बोलेल का, प्रश्नांना उत्तरं देईल का, दिल्यास ती सरळ असतील का, अशा अनेक शंका मनात येत होत्या. कारण या बाबतीत महाराष्ट्रात वेळोवेळी फार ' सुरस ' अनुभव आलेले होते.

खरं म्हणजे पुण्याहून आम्हाला संघाच्या मोतीबाग या कार्यालयातून जे पत्र देण्यात आलं होतं ते श्री. भास्कररावांनाच लिहिलेलं होतं आणि भास्करराव साधारणत: संघाच्या कोचीन येथील ' माधव निवास ' या कार्यालयात असतात. त्यामुळे केरळात उतरल्याबरोबर आम्ही याच कार्यालयाचा पत्ता शोधत तिथे हजर झालो होतो; पण भास्करराव तिथे नव्हते. ते त्या वेळी पालघाटला ओ. टी. सी. साठी गेलेले होते; पण त्यांच्या नावाचे पत्र दाखवल्यावर आमची सर्व सोय झाली. अर्थात त्या वेळी भास्करराव भेटले नाहीत, हे एका अर्थानं बरंच झालं, असं आता वाटत होतं. कारण केरळात सात-आठ दिवस फिरल्यानंतर, अनेकांच्या भेटी-गाठी घेतल्यानंतर आणि अनेक ठिकाणं पाहिल्यानंतर सबंध संघर्षाचा जो एक perspective आला होता त्याचा भास्कररावांशी चर्चा करताना फार उपयोग होणार होता आणि तसा तो झालाही !

तोरावूर हे आलेप्पी-शेरतले या भागातलं एक लहानसं गाव. एके काळी हा सबंध परिसर केरळचं मास्को समजलं जात असे. याच भागातल्या श्रीमती गौरी या मार्क्सवादी पक्षाच्या फार मोठ्या कार्यकर्त्या. नंबुद्रिपाद यांच्या मंत्रिमंडळातही त्या होत्या. आता मात्र त्या वृद्ध झाल्यामुळे दैनंदिन राजकारणातला त्यांचा सहभाग व प्रभाव कमी झाला आहे. आता या मास्कोमध्येच संघाच्या सुमारे सातशे स्वयंसेवकांचा ओ. टी. सी. चालू होता. परिस्थिती बदलत चालल्याचंच ते निदर्शक होतं.

आम्ही तोरावूरला पोचलो तेव्हा सकाळचे साधारणपणे नऊ वाजले असतील. थोड्याशा ढगाळ हवेमुळं उन्हाचा त्रास तितकासा जाणवत नव्हता. मुख्य रस्त्यापासून गावाकडे यायचं म्हणजे मैल-दीडमैल चालावं लागणार होतं. थोडीशी भूकही जाणवायला लागली होती; पण वाटेत एकही हॉटेल नव्हतं. नाही म्हणायला एके ठिकाणी केळी मात्र मिळाली. केरळमध्ये हिंडत असताना या केळ्यांनी चांगलाच हात दिला. उकड्या भातापेक्षा ती निश्चितच चांगली होती आणि शिवाय भरपूर मोठीही !

गाव जवळ आलं तसं एक मोठं देऊळ दिसलं. देऊळ बरंच जुनं असावं, असं त्याच्या एकूण बांधणीवरून वाटलं. देवळाबाहेरच उजव्या हाताला एक हत्ती झुलत होता आणि त्याला दोन अतिशय सुंदर, पांढरे शुभ्र सुळे होते. आपल्याकडे हत्ती हा प्राणीच आधी फारसा पहायला मिळत नाही आणि मिळालाच तर त्याचे सुळे बहुतेक वेळा काढून विकलेले असतात. केरळातील बऱ्याच देवस्थानांचे स्वत:च्या मालकीचे हत्ती आहेत. कारण अजूनही ते ऐश्वर्याचं लक्षण मानलं जातं. तेलीचेरीला संघाच्या केरळ प्रांत संघचालकांच्या घराजवळही एक देऊळ होतं आणि त्या देवळाबाहेरही नुकतंच विकत आणलेलं एक हत्तीचं पिल्लू होतं. त्या पिल्लाची किंमत होती पंधरा हजार रुपये ! हे पैसे त्या भागातल्या संघकार्यकर्त्यांनीच जमवून दिले होते. तोरावूरचा हा भला मोठा प्राणी पाहिला आणि त्या लहानशा, गोंडस जिवाची पुन्हा आठवण झाली !

## प्रांतप्रचारकांची भेट

देऊळ मागं टाकून आम्ही पुढे जाऊ लागलो तर एकदम बरेचसे संघस्वयंसेवक हातांमध्ये थाळी आणि वाटी घेऊन जाताना दिसले. त्यावरूनच कँप जवळ आल्याचं आम्ही ताडलं. कँपमध्ये पोचलो तेव्हा कालिकतला भेटलेले संघाचे विभागप्रचारक श्री. सेतुमाधवन तिथे होतेच. तेवढ्यात श्री. भास्कररावही आले. परस्पर परिचय झाला. भास्कररावांनी तो सबंध दिवस आम्हाला द्यायचं मान्य केलं; पण चर्चेला बसण्यापूर्वी न्याहारी करण्याचा आग्रह केला. आम्ही त्याचीच वाट पाहत होतो. खास केरळी पद्धतीचा उत्तपा एका थाळीत वाढण्यात आला. ' खास केरळी पद्धतीचा ' अशासाठी की, केरळच्या इडलीला किंवा डोसा-उत्तप्पाला एक सुंदर, आंबट स्वाद असतो जो आपल्याकडे क्वचितच अनुभवाला येतो. आमच्याबरोबर भास्कररावही न्याहारी करणार असतील असं वाटल्यामुळे आम्ही थोडेसे थांबलो. ते लक्षात आल्यावर भास्करराव म्हणाले, ' घ्या ना ! आमची न्याहारी मगाशीच झालीय !' आम्ही दोघेही सपशेल उडालो. बऱ्याच दिवसानंतर मराठी कानावर पडत होतं आणि तेही केरळच्या प्रांतप्रचारकाकडून ! अतिशय अनपेक्षित, सुखद असा धक्का होता तो. परप्रदेशात आपली भाषा बोलणारा कोणी भेटला की काय आनंद होतो, याचा अनुभव आम्ही प्रत्यक्ष घेत होतो. नंतर असा उलगडा झाला की, भास्करराव मूळचे कारवार जिल्ह्यातले; पण मुंबईला राहिल्यामुळे मराठी ही मातृभाषाच झाली होती; पण गेली तीस-पस्तीस वर्षं ते केरळातळं संघाचं काम पहात होते. आता गोष्टी अधिकच सुकर झाल्या. कारण कोणाशीही सविस्तर बोलायचं म्हटल्यावर इतर कोणत्याही भाषेपेक्षा, मग भले तुमचं तिच्यावर किती का प्रभुत्व असेना, मातृभाषाच अधिक सोईची वाटते. परस्परांमधलं अंतर कसं एकदम कमी झाल्यासारखं, संपल्यासारखंच वाटू लागतं !

'केरळमधला राष्ट्रीय स्वयंसेवक सर्वसामान्य लोकांसमोर जरी गेल्या पाच-दहा वर्षांतरच येऊ लागला असला तरी त्याचा पाया स्वातंत्र्यपूर्व काळातच घातला गेला होता.' भास्करराव सांगू लागले– '१९४२ साली दत्तोपंत ठेंगडी व मधुकर ओक हे संघाचे दोन प्रचारक केरळमध्ये आले आणि त्यांनी काम सुरू केलं. दत्तोपंत कोचीन आणि कालिकत या दोन ठिकाणी लक्ष देत होते तर मधुकरराव त्रिवेंद्रमला तळ ठोकून होते. १९४३ साली संघाचे चार–पाच विस्तारक केरळमध्ये आले आणि ते केरळच्या इतर जिल्ह्यांमध्ये पसरले. या कामात कालिकतच्या झामोरिन राजाचे जे तेव्हाचे वंशज होते त्यांनी दत्तोपंतांना फार महत्त्वाची मदत केली. अर्थात त्यामुळेच नंतर संघावर सरंजामशाही, साम्राज्यवादी वगैरे आरोप करणं कम्युनिस्टांना सोपं गेलं. दत्तोपंतांनी दोन वर्षांतच कालिकतमध्ये चांगले पाय रोवले. आजचे केरळातील बहुतेक सर्व जुने आणि चांगले प्रचारक त्या काळी त्यांच्याच तालमीत तयार झालेले आहेत. १९४४ साली दत्तोपंत महाराष्ट्रात परत गेले व त्यांची जागा शंकर शास्त्री आणि मनोहर देव यांनी घेतली. संघाचं केरळातलं काम हळूहळू वाढू लागलं. कोचीन, आलवी, कालडी, त्रिचूर, कॅननोर, पालघाट, तेलीचेरी या ठिकाणी संघाच्या शाखा सुरू झाल्या. १९४६ साली केरळात सुमारे दहा–पंधरा शाखा होत्या. त्याच वर्षी कै. गुरुजींनी मला केरळात काम करण्यासाठी धाडलं.

'दरम्यान कालिकतहून नागपूरला वर्गासाठी गेलेले तरुण स्वयंसेवक १९४७ साली परत आले आणि ते आता केरळच्या अंतर्भागात जाऊ लागले. याआधी हे शक्य नव्हतं. कारण भाषेची अडचण होती. आता ती अडचण दूर झाली होती. १९४८ मध्ये गांधींच्या खुनानंतर संघावर भारतभर बंदी आली. त्या बंदीचा केरळातल्या संघावर विपरीत परिणाम झाला. कारण इथलं काम नुकतंच उभं राहू लागलं होतं, ते एकदम तुटलं; पण काम लहान, म्हणून फार धरपकड झाली नाही. १९४८ च्याच जानेवारीमध्ये गोळवलकरगुरुजींनी केरळला भेट दिली. कालिकत, कोचीन आणि त्रिवेंद्रम या तीन ठिकाणी त्यांचे कार्यक्रमही झाले. बंदीकाळात संघाला मलबार भागात थोडा त्रास सहन करावा लागला. संघाच्या कार्यालयांमध्ये मुस्लिम व कम्युनिस्ट यांनी घुसून हल्ले करण्याचेही प्रकार घडले; पण इकडे कोचीन–त्रिवेंद्रम भागात फारसा त्रास झाला नाही. कारण त्या वेळी ते संस्थान होतं आणि तिथला राजा हिंदू होता. त्यामुळं त्याला संघाबद्दल सहानुभूती होती. हा राजा फार लोकप्रिय, प्रजाहितदक्ष असा होता.

'बंदी उठल्यावर पुन्हा केरळमध्ये संघाच्या कामाला सुरुवात झाली. त्या काळात मलबारभागात हिंदू माणसाचा, मग तो कोणत्याही पक्षाचा वा पंथाचा असो, मुसलमानांकडून अतिशय अपमान व छळ होत असे. मलबारच्या अंतर्भागात याचं प्रमाण पुष्कळच असायचं. त्या वेळी तरी हा अपमान किंवा छळ मूकपणे सहन करण्यापलीकडे केरळातील हिंदू मनुष्य काहीच करू शकत नव्हता. तेव्हा केरळातील संघाने १९४६ ते १९५५ या काळात या सामाजिक परिस्थितीवर लक्ष केंद्रित करायचं ठरवलं. त्यामध्ये धोका होता, जबाबदारीही होती; पण संघाने हे आव्हान पेलायचं ठरवलं. मुसलमान लोक हिंदूंच्या मुली सर्रास पळवून नेत असत. या मुली एक तर नंबुद्रींच्या असत, नाही तर थिय्यांच्या. थिय्या आणि दलित समाजात कौमार्यभंग न झालेली मुलगी मिळणं जवळपास अशक्य झालं होतं. संघस्वयंसेवकांनी या मुलींना सोडवून आणण्याचं काम करायला सुरुवात केली. दोन–चार वर्षांत संघाचा सर्वत्र बोलबाला होऊ लागला. कुठेही काही हल्ला झाला की, लोक पोलिसस्टेशनावर जाण्याऐवजी आमच्याकडेच येऊ लागले. एक प्रकारची सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करू लागलो. त्या काळात केरळात जातिभेदही भयंकर होता. शूद्रांची छायासुद्धा पापकारक मानणारा हिंदू समाज तेव्हा केरळात मोठ्या प्रमाणावर होता. त्याविरुद्धही आम्ही मोहीम सुरू केली. या काळात केरळातील संघाला बऱ्याच झंझटी सहन कराव्या लागल्या; पण त्यामुळं फायदाही झाला. संघामध्ये शेकडा पंधरा-वीस स्वयंसेवक तरी समाजातील या खालच्या थरामधून येऊ लागले. संघाचं काम धीरे धीरे वाढू लागलं. १९५९ सालापर्यंत केरळात संघाच्या ७०–७५ शाखा सुरू झाल्या होत्या. आमच्याकडे माणसं कमी होती, प्रचारकही फार मोठ्या संख्येनं नव्हते; पण आम्हाला स्वावलंबनाची सवय व्हायला लागली होती. त्यामुळं फारसं कुठं अडतही नव्हतं.

## संघर्षातून उत्कर्ष

'१९५६–५७ ते १९६२–६३ या सहा–सात वर्षांत केरळातील संघाच्या शाखांची संख्या १००–१२५ पर्यंत गेली. १९६४ साली केरळ प्रांत निराळा करण्यात आला. अर्थात श्री. भैयाजी दाणींनी एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन संघकार्याच्या दृष्टीनं तामिळनाडू प्रांताचे १९५८ सालीच दोन विभाग केले होते त्यातील केरळ प्रांताची सर्व सूत्रं त्याच वेळी माझ्या हाती सोपवण्यात आली होती. १९६४ मध्ये केरळ प्रांत तयार झाल्यावर मुस्लिमांची जाचक, अपमानास्पद बंधनं तोडायला आम्ही आणखी जोरदारपणे सुरुवात केली. उदाहरणार्थ, केरळमध्ये अशी एक प्रथा आहे की, कोणीही श्रेष्ठ, आदरणीय व्यक्ती जर आली तर सगळ्यांनी गुडघ्यापर्यंत वर ओढलेल्या लुंग्या झटकन खालपर्यंत सोडून उभं राहायचं. संबंधित व्यक्तीबद्दल आदर दाखवण्याची ती एक पद्धत आहे. त्या काळात केरळात असा दंडक होता की, कोणीही मुसलमान आला तर सर्व हिंदूंनी झटकन लुंग्या खालपर्यंत सोडून उभं राहिलं पाहिजे. कारण मुसलमान माणूस श्रेष्ठ. आम्ही हा दंडक मोडायचं ठरवलं. त्यासाठी मारामाऱ्याही कराव्या लागल्या. कोळ्यांनाही मुसलमानांचा जाच फार असे. शुक्रवारी मासे मारायला जायची बंदी होती. कारण शुक्रवार हा मुसलमानांचा पवित्र वार. समुद्र कुणाचा आणि बंदी कुणाची! आम्ही कोळ्यांना आश्वासन दिलं की, हा अपमानकारक हुकूम आपण मानायचा नाही. तुम्ही खुशाल शुक्रवारी मासेमारीला चला– आम्ही तुमच्या मागे आहोत! कोळी आमचे मित्र झाले. कोळी लोक आमच्या बाजूने उभे राहताहेत असं दिसल्यावर मुसलमानांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकायला सुरुवात केली. तेव्हा आम्ही 'मत्स्य प्रवर्तक संघ' या सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संघटनेची स्थापना केली. फार मोठा कोळीसमाज या संघटनेत येऊ लागला. अंगापिंडाने मजबूत असणारे हे कोळी अतिशय एकनिष्ठपणे काम करू लागले. 'मत्स्य प्रवर्तक संघा'तर्फे त्यांच्या अडीअडचणींचो

सोडवणूक करण्यात येऊ लागली, संकटकाळी त्यांना मदत देण्यात येऊ लागली, आयुष्यात प्रथमच त्यांना स्वाभिमानानं जगायला शिकवण्यात येऊ लागलं. इतरांच्या मते कोळी हे खालच्या थरातले लोक होते; पण आम्हाला त्यांच्या रूपाने आयुष्यात सुरुवातीपासूनच झगडणारी माणसं मिळत गेली– कधी जीवनाशी, कधी निसर्गाशी !

' १९५८ साली इ. एम्. एस्. नंबुद्रीपाद केरळचे पहिले मुख्यमंत्री झाले आणि केरळातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तेव्हापासूनच आघात सुरू झाले. स्वयंसेवक शेतकऱ्यांवर हल्ले होऊ लागले. १९५९-६० साली कोळी लोकांमध्येही मार्क्सवाद्यांनी शिरकाव करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळीही आमच्या त्यांच्याशी लहान प्रमाणावर चकमकी झडल्या. आम्हीही कन्नोर या कम्युनिस्टांच्या बालेकिल्ल्यात घुसायला, आमचं काम पसरवायला सुरुवात केली. १९५८ मध्येच केरळातील कम्युनिस्टांनी केंद्रसरकारविरोधी मोहीम सुरू केली. संघाने याला प्रत्युत्तर द्यायचं ठरवलं. सर्वांना दिलासा दिला. पुन्हा मारामाऱ्या झाल्या. कम्युनिस्टांचा हरताळ पार फसला. संघवाले मार्क्सवाद्यांना यशस्वीपणे तोंड देऊ शकतील, हे चित्र १९५९–६० सालीच दिसू लागलं. आता फक्त त्याची पुनरावृत्ती झाली इतकंच. त्यामुळे १९६४–६५ मध्ये संघाबद्दल केरळातील सामान्य जनतेला अधिक विश्वास वाटू लागला. त्याचबरोबर संघावरील जबाबदाऱ्याही वाढल्या.

## संघाचं शक्तिदर्शन

'१९६७ च्या डिसेंबरमध्ये केरळात जनसंघाचं भव्य अधिवेशन झालं. जनसंघाचे अखिल भारतीय पातळीवरील नेते पं. दीनदयाळ उपाध्याय आणि अन्य सर्व नेते अधिवेशनाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या अधिवेशनाचा फार मोठा प्रभाव केरळातील सामान्य जनतेवर पडला. १९६८ मधील पालघाट इथे झालेल्या संघशिक्षावर्गाला ५५० स्वयंसेवक आले. सर्वांमध्येच उत्साहाचं नवं वारं संचारलं होतं. १९६९ मध्ये केरळातील संघशाखांची संख्या ३५० वर जाऊन पोचली आणि इथेच संघ व मार्क्सवाद्यांमधील पहिल्या संघर्षाची ठिणगी पडली. तेलीचेरी परिसरात जवळजवळ तीन महिने running battle चालू होतं. यातच संघाचा रामकृष्णन हा कार्यकर्ता मारला गेला. त्यामुळे आम्हाला अशी जाणीव होऊ लागली की, केरळमध्ये जर टिकायचं असेल, काम वाढवायचं असेल, तर नुसतं तत्त्वज्ञान उपयोगी पडणार नाही. वेळ आली तर दोन हात करण्याचीही तयारी ठेवली पाहिजे. गोळवलकरगुरुजींशीही याबाबतीत सल्लामसलत केली आणि नंतर पंधरा दिवसांतच तेलीचेरीमधील परिस्थितीवर संघाने पकड घेतली. संघाबद्दल बहुजनसमाजाला वाटणारी सहानुभूती वाढू लागली.'

भास्करराव बोलत होते. आम्ही ऐकत होतो. मध्ये मध्ये प्रश्नही विचारत होतो. कोणत्याही शंकेला किंवा प्रश्नाला बगल न देता भास्करराव मोकळेपणाने व उत्साहाने उत्तर देत होते. संघाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून हा अनुभव नवीन होता. दुपारचा एक वाजून गेला होता. चर्चा रंगायला लागली होती. इतक्यात जेवायची तयारी झाल्याचं सांगायला एक स्वयंसेवक आला. भास्कररावांसमोर येताच त्याने गुडघ्यांपर्यंत वर घेतलेली लुंगी झटकन खाली सोडली. आम्हाला केरळातल्या आदर दाखविण्याच्या प्रथेची आणि तिच्या इतिहासाची पुन्हा एकदा आठवण झाली.

आम्ही ज्या ठिकाणी चर्चा करत बसलो होतो, तिथून भोजनमंडप साधारणतः दहाएक मिनिटांच्या अंतरावर होता. सुमारे दोनतीनशे स्वयंसेवक सहज बसू शकतील असा तो मंडप तट्ट्या आणि नारळीच्या झावळ्यांनी शाकारला होता. मंडपाबाहेरच मोठमोठ्या नावा ठेवल्या होत्या. जवळ गेल्यावर असं लक्षात आलं की, या नावांमध्ये पाणी साठवलेलं होतं. पाण्यात होडीऐवजी, होडीत पाणी ! जेवण झाल्यावर हात धुण्यासाठी तसंच थाळी विसळून टाकण्यासाठी स्वयंसेवक या पाण्याचा उपयोग करत होते. नावांची लांबीही सुमारे २५–३० फूट असल्याने एका वेळी पुष्कळ स्वयंसेवक हात धुऊ शकत होते. व्यवस्थापनातील कल्पकतेचं कौतुक करत आम्ही भोजनमंडपात शिरलो. सर्व स्वयंसेवक जमिनीवर– खरं म्हणजे वाळूतच– बसले होते. समुद्रकिनारा ४–५ मैलांवरच असल्यामुळे या कँपच्या सबंध परिसरात पायाला कुठे जमीन लागतच नव्हती. सर्वत्र पिवळट पांढरी वाळू आणि नारळाची झाडं. आम्ही पाहुणे म्हणून आमच्यासाठी सतरंजीचा एक तुकडा पसरण्यात आला होता. इतर सर्वजण वाळूत बसले असताना आपण एखाद्या टिकोजीरावासारखं सतरंजीवर बसायला अवघडल्यासारखं झालं; पण सतरंजी काढून टाकावीशीही वाटली नाही. आमच्या पांढरपेशेपणाला वाळू लागणं आवडणारं नव्हतं आणि परवडणारंही ! जेवण व्यवस्थित झालं. जेवतानाही भास्करराव विविध गोष्टी सांगत होते. पुण्या–मुंबईच्या जुन्या स्वयंसेवकांच्या आप्पा पेंडसे, मधु देवल, विद्याधर गोखले यांच्या आठवणी निघत होत्या. भास्कररावांनाही बऱ्याच दिवसांनी मातृभाषेत बोलायला मिळाल्याचं समाधान वाटत असावं. जेवण करून आम्ही पुन्हा चर्चेच्या ठिकाणी यायला निघालो. वाळू तापली होती. चपला घातलेल्या असूनही पाय अधूनमधून रुतत होते आणि वाळूचा चटका जाणवत होता. तेलीचेरीला समुद्र-किनारी पायांवर लाटा घेत उभे असताना पायाखालची वाळू सरकणं हा काय प्रकार असतो, याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. आता या वाळूतून चालत असताना नाथांनी वाळवंटातील महाराच्या पोराला कळवळ्यानं उचलून घेतलं म्हणजे नेमकं काय केलं ते जाणवलं.

जेवून परत आलो आणि पुन्हा चर्चेला सुरुवात झाली. भास्कररावांशी बोलताना जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांच्याकडे कथनाची शैली फार चांगली आहे. एकदा ओघ सुरू झाला की, मध्ये कुठे थांबणार नाहीत, अडखळणार नाहीत; पण पाल्हाळही लावणार नाहीत.

'१९७१ साली केरळमध्ये तेलीचेरी भागातच हिंदु-मुस्लिमांचा दंगा झाला. केरळातल्या सरकारचा आणि मार्क्सिस्टांचाही मुसलमानांना पाठिंबा होता. म्हणजेच ही दंगल जातीय नव्हती तर राजकीय सामाजिक स्वरूपाची होती. हिंदूंची स्थिती मात्र अनाथ होती. कोणीही यावं आणि अत्याचार करून जावं, अशी परिस्थिती होती. या दंगलीमध्ये मार्क्सवाद्यांचा काय सहभाग होता, याचं उत्तम उदाहरण म्हणजे दंगलीच्या काळात जी लुटालूट झाली त्यापैकी बराच हिस्सा एका मार्क्सिस्ट कौन्सिलरच्या घरात सापडला. हे पुराव्यानिशी सिद्ध झाल्यावर मार्क्सवादी पक्षाने त्याला disown केलं. अशा तऱ्हेनं त्या पक्षाकडून फसवली गेलेली माणसं संघामध्ये यायला लागली. पक्षाने हाकलून दिलेल्या मार्क्सिस्टांच्या केसेस आम्ही कोर्टात लढवल्या. त्यामुळं संघाची प्रतिमा अधिक उजळली. ही

सबंध घटना केरळातील संघाला महत्त्वाचं वळण देणारी ठरली. कारण यामुळं आमचा मार्क्सवाद्यांच्या बालेकिल्ल्यातील शिरकाव अधिक सुकर झाला. केरळातल्या खेड्यांमधूनही संघाच्या शाखा सुरू झाल्या.

'आणीबाणीच्या काळात तर केरळातील मार्क्सवादी पक्षाचं संपूर्ण नैतिक अधःपतन झालं. आता सांगायला हरकत नाही की; १९७५ च्या नोव्हेंबरमध्ये केरळातील सर्व राजकीय पक्षांची आणीबाणीविरुद्ध लढा देण्यासंबंधी विचार करण्यासाठी एक सभा बोलावली होती; पण मार्क्सवाद्यांनी त्यात विशेष रस दाखवला नाही. एक ज्येष्ठ मार्क्सवादीनेता तर माझ्याजवळ असं स्पष्टपणे म्हणाला की, "आता आमच्याकडे तत्त्वाकरता लढणारी माणसं फारशी शिल्लक राहिली नाहीत. बोनसचा प्रश्न काढलात तर सगळेजण जमतील. मार्क्सवादी पक्ष भारतातील सत्ताभिलाषी राजकारणात भाग घ्यायला लागल्यामुळं ही स्थिती निर्माण झाली आहे. तुम्ही आज जे करता आहात ते आम्ही पूर्वी केलेलं आहे; पण आता ते शक्य नाही!"

## आणीबाणीची देणगी

'आणीबाणीच्या काळात आणीबाणीविरोधी लक्ष देण्यासाठी केरळमध्ये संघानं फार मोठ्या प्रमाणावर केंद्रं उघडली होती. या केंद्रांमार्फत सुमारे पन्नास हजार गुप्त पत्रकं वाटण्यात आली; पण शेवटपर्यंत एकही माणूस सरकारला सापडला नाही! एकही पत्रक सरकारच्या हाती पडलं नाही. आणीबाणीविरुद्ध सत्याग्रह करून संघाची साडेचार-पाच हजार माणसं तुरुंगात गेली. तीनशेसाडेतीनशे लोकांना मिसाखाली डांबण्यात आलं. तेलीचेरीमध्ये सत्याग्रहींच्या पहिल्या तुकड्यांना पोलिसांनी भर चौकात भयंकर मारहाण केली—रक्त सांडलं; पण बघणाऱ्यांची सहानुभूती लगेच मिळू लागली. असंच थोड्या-फार फरकानं सर्व केरळात घडलं. संघस्वयंसेवक शूर असतात अशी प्रतिमा निर्माण झाली. केरळची जनता हे सारं अनुभवत होती. इंदिराजींच्या दडपशाहीशी संघाव्यतिरिक्त दुसरं कुणीही झुंज देत नाही, हे तिच्या सहज लक्षात येत होतं. १९७५ साली केरळात संघाच्या ७५० शाखा होत्या. आणीबाणीनंतर संघावरील बंदी उठल्यावर ही संख्या हजारावर गेली. गेल्या वर्षी केरळात १२०० शाखा चालत होत्या. आज त्यांची संख्या १५०० आहे. हे सबंध चित्र पुरेसं बोलकं आहे.

'आम्ही केरळमध्ये विस्तारक नेमलेले नाहीत. प्रत्येक शाखेची वाढ स्थानिक माणसांनीच केली पाहिजे, या दृष्टिकोनातून आम्ही मंडलपद्धती स्वीकारली. दर चार-पाच मैलांच्या परिसरात आणि साधारणपणे दर पंचायतीमागे एक या प्रमाणात मंडलांची आखणी केली. मंडलांच्या बैठकांमधून चर्चेद्वारा शाखेची वाढ कशी करावी, याची कार्यपद्धती ठरवली जाऊ लागली. केरळमध्ये यापूर्वीही प्रत्येक गावी क्षेत्रसंरक्षणसमिती (Temple Protection Committee) होतीच. आम्ही ती कल्पना उचलून धरली. कारण केरळातील शेकडा नव्वद शाखा देवळांमधून चालतात. तेव्हा जुनी पडकी देवळं मार्क्सवाद्यांच्या तावडीतून सोडवून, ती पाडून न टाकता त्यांचा जीर्णोद्धार केला गेला पाहिजे, असा आम्ही आग्रह धरू लागलो. संघस्वयंसेवक ज्या ठिकाणी जातील त्या ठिकाणची जुनी, पडकी देवळं ते पुन्हा उभारू लागले. या देवळांमधून संघातर्फे भजन, कीर्तन, प्रवचन यांचे कार्यक्रम होऊ लागले. पिंडानं धार्मिक असणाऱ्या केरळ माणसावर या सर्व गोष्टींचा निश्चितच प्रभाव पडू लागला. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखाली तयार होणारी तरुण पिढी देव, धर्म, आई, बाप, परंपरा कुणालाच न जुमानणारी नव्हती. पुढे पुढे श्रीनारायणगुरूंनाही विसर पडत चालला होता. या पार्श्वभूमीवर संघाचा पुनरुज्जीवनवाद केरळी जनतेला आकर्षक वाटला.

'इतर राज्यांमधला संघ, उदाहरणार्थ महाराष्ट्रातला संघ आणि केरळातला संघ याची तुलना केली तर महत्त्वाचा फरक मला जाणवतो. तो म्हणजे आमच्याकडे सुशिक्षित पांढरपेशा समाजातले लोक फार कमी येतात. आता या ओ. टी. सी.लासुद्धा जे सातशे स्वयंसेवक आले आहेत, त्यांच्यापैकी २०० लहान शेतकरी किंवा शेतमजूर आहेत, १०० स्वयंसेवक रोजगार करून जगणारे आहेत, ७० जण सुतार, गवंडी, विणकाम, न्हावी या थरातले आहेत. विद्यार्थी केवळ १५० आहेत आणि २०० इतर आहेत. तेव्हा ही उणीव भरून काढण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. केरळातले सुशिक्षित, बुद्धिवादी लोकही संघाकडे आकर्षित व्हावेत म्हणून प्रयत्न करत आहोत; पण सध्या या परिस्थितीचा आम्हाला फायदाही होतो. महाराष्ट्रातल्या संघावर जे जातीयतेचे किंवा पांढरपेशेपणाचे शिक्के बसतात, तसे शिक्के केरळातल्या संघावर कोणी मारूच शकत नाही. आणीबाणीच्या काळात आणि नंतरही हरिजनवस्त्यांमध्ये संघाचं काम जोमानं वाढत आहे. आमच्या महिला समितीमध्ये दोन हजार हरिजन मुली आहेत. आम्ही हरिजनवस्त्यांमध्ये शाखा सुरू केल्यावर जे हरिजन शाखेवर येऊ लागले त्यांची घरं मार्क्सवाद्यांनी जाळली. आम्ही ती बांधून दिली. मार्क्सवाद्यांनी या गरीब लोकांचं रेशन तोडलं, आम्ही संघामार्फत शिधावाटपाचं काम सुरू केलं. हरिजनवस्त्यांमधून जाहीर सभा घेतल्या. हरिजननेत्यांनीच संघाचा गौरव करणारी भाषणं या सभांमधून केली. त्याचा फार चांगला परिणाम झाला. सबंध वस्त्याच्या वस्त्याच संघाच्या झाल्या!

## वैचारिक विकास हवा

'पण एक गोष्ट कबूल केलीच पाहिजे. ती म्हणजे या सततच्या धकाधकीमुळे, संघर्षामुळे केरळातील संघाचा वैचारिक विकास मात्र फारसा होऊ शकलेला नाही. कारण इथे अस्तित्व राखण्यासाठीच फार धडपडावं लागतं. प्राणसुद्धा द्यावे लागतात! त्यामुळं विकासासाठी जी शांततेची आवश्यकता असते ती इथं मिळूच शकत नाही. याचमुळे सुशिक्षित माणसं केरळात शाखांमध्ये अजून येत नाहीत. कारण त्यांची या सगळ्या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी नसते. आम्ही मार्क्सिस्टांचे स्वागत करतो. तू मार्क्सवादी असलास तरी प्रथम तू हिंदू आहेस, असं सांगून त्याला आमच्यात सामावून घेण्याचा प्रयत्न करतो; पण त्यांचे नेते त्यांना शाखेवर यायला परवानगी देत नाहीत. तसं करू पाहणाऱ्यांना दमदाटी होते, मारहाण केली जाते, प्रसंगी खूनसुद्धा पडतात; पण त्यामुळे ते लोक जास्तच संघाकडे झुकतात. कारण हिंदूपरंपरा आणि मार्क्सवाद किंवा साम्यवाद या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत, हे इथल्या सामान्य माणसाला

कळतच नाही आणि त्याचा फायदा आम्हाला मिळतो. दीड-दोन महिन्यांपूर्वी अँटनी यांनी केरळात संघविरोधी पदयात्राच काढली. ' R. S. S. must be beaten like you beat mad dogs ' असं ते आपल्या भाषणांमधून सांगू लागले. आम्हीही याला प्रत्युत्तर म्हणून जागोजाग त्यांच्या पाठोपाठ सभा घेतल्या. संघाची बाजू समजावून देण्याचा प्रयत्न केला. कारण केरळ हे राज्य लहान असल्यामुळं इथं कोणत्याही गोष्टीचा फार झटकन् परिणाम होतो. शिवाय आणीबाणीमध्येही आम्हाला इतर राजकीय पक्षांच्या नेत्यांपासून दूर ठेवण्यात आलं. त्यामुळं इतर राज्यांमध्ये संघाबद्दलचे गैरसमज दूर करण्याची जी संधी संघाच्या वरिष्ठ नेत्यांना मिळाली ती आम्हाला मिळू शकली नाही. नाही तर आम्हीही बरेचसे गैरसमज दूर करू शकलो असतो. त्यातही काही राजकीय नेत्यांनी खाजगीत अशी कबुली दिली की, आम्ही संघाच्या कार्यकर्त्यांना भेटलो ही बातमी बाहेर आली तर आमच्या राजकीय प्रतिमेला धोका पोचेल. अर्थात ज्यांच्याशी आमचा संबंध आला त्यांची संघाबद्दलची मतं निश्चितचं बदलली. आता मल्लापुरम् हा मुसलमानांचा बालेकिल्ला. इथं एकूण वस्तीपैकी शेकडा ८० लोक मुसलमान आहेत; पण त्यांच्याशी आमची कधीही चकमक झाली नाही. त्यांचा संघाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला आहे. सध्या मल्लापुरम् जिल्ह्यात संघाच्या १३० शाखा आहेत; पण केरळातले राजकारणी लोक हे बाहेर येऊ देत नाहीत.

'आज केरळातल्या मार्क्सवाद्यांची परिस्थिती अशी आहे की, सुशिक्षितांचा त्यांच्याबद्दल पूर्ण भ्रमनिरास झाला आहे. सत्तेकरता हे लोक वाटेल त्याच्याबरोबर शय्यासोबत करतात हे बुद्धिवंतांना जाणवलं आहे आणि समाजातील खालचा स्तर ही जी त्यांची मक्तेदारी होती तिथं आम्ही शिरकाव केला आहे. त्यामुळं मार्क्सवादी दुखावले गेले आहेत. शिवाय इतके दिवस त्यांना कुणाचाच विरोध नव्हता. जो काही झाला होता तो त्यांनी दडपशाहीच्या जोरावर वेळप्रसंगी खून करूनही मोडून काढला होता. त्यामुळं त्यांचं तत्त्वज्ञान धुऊन काढायला आम्हाला दहा वर्षं लागतील; पण आम्ही ते करू, अशी भीती केरळातल्या मार्क्सवाद्यांना वाटू लागली आहे. म्हणून आज हे संघर्षाचं चित्र केरळात दिसत आहे.

'केरळच्या सांस्कृतिक, सामाजिक परिस्थितीचा जर विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल की, केरळी मनुष्य अतिशय भाविक आहे. इथले मार्क्सिस्टसुद्धा अय्यप्पा या जागृत देवस्थानाला जातात. अच्युत मेनन कन्याकुमारीला गेले होतेच, तर इ. एम. एस. स्वतः पत्नीबरोबर पळणीला पूजेला गेले. थोडक्यात, इथले कट्टर मार्क्सवादीसुद्धा ईश्वरवादामधून सुटलेले नाहीत, मग सामान्य मनुष्याची बातच सोडा! त्यामुळं संघाला पाय रोवायला अधिक संधी मिळाली. तसंच दक्षिणेत ख्रिश्चनांचं वर्चस्व आणि उत्तर केरळमध्ये मुसलमानांचं वर्चस्व. यामध्ये बिचारा हिंदू मनुष्य अगदी भरडला जात होता. त्यामुळं केरळात कुणी तरी पुढं येऊन हिंदूंचं संघटन करण्याचं काम करणं आवश्यक होतं. इथल्या सामाजिक परिस्थितीचीच ती गरज होती. त्यामुळं महाराष्ट्रात जसा या संघटनेला हिंदूंच्याच एका मोठ्या वर्गाकडून विरोध झाला आणि होतही आहे, तसं केरळात झालंच नाही. जातीपाती ढिल्या करण्यासाठी श्री. नारायणगुरूंच्या पाठोपाठ मार्क्सवाद्यांनी केलेल्या कामाचाही थोडाफार वाटा आहेच. इथं सर्व हिंदू जातपात विसरून एकत्र आले. अर्थात सुरुवातीला हा पाठिंबा घाबरत, लपत-छपत होता. १९७२ पर्यंत दक्षिण केरळात संघाच्या फक्त ६०-६५ शाखा होत्या. आता त्यांची संख्या ३५० च्या वर गेली आहे. लोक धीट झाले आहेत. संघाबद्दल विश्वास वाटू लागला आहे. सर्व हिंदूनेत्यांनी संघाला उघड पाठिंबा दिला आहे. केरळातील नायर सर्व्हिस सोसायटी या नायर समाजाच्या बलवान संघटनेने त्यांची शाळा-कॉलेजेस संघाच्या कार्यक्रमाला देण्याची तयारी आपणहून दाखवली. Hindu communalism is an absolute need in Kerala, at presenc.

## संघाचा राजकारणात प्रवेश

"जनता पक्षवाल्यांचंही मन वळवायचा प्रयत्न आम्ही करत आहोत. कारण इथल्या विधानसभेतील जनता पक्षात पूर्वाश्रमीच्या जनसंघाचा एकही सदस्य नाही; पण इथले भूतपूर्व समाजवादी समंजस आहेत. केरळच्या विधानसभेत जेव्हा संघविरोधी चर्चा झाली तेव्हा श्री. चंद्रशेखरन या पूर्वाश्रमीच्या समाजवादी पक्षाच्या नेत्यांनीच संघाची बाजू खंबीरपणे मांडली. केरळातले मुस्लीम व ख्रिश्चनही आतून कम्युनिस्टविरोधीच आहेत. त्यामुळे केरळातील पंचायतीच्या निवडणुका आम्ही सहज जिंकू शकू. त्यातूनच पुढे bargain करून आमची माणसं विधानसभेत पाठवता येतील. इथल्या जनता पक्षाला आत्मविश्वास देण्याचे कामही आम्ही करणार आहोत. कारण आता कितीही म्हटलं तरी राजकारणापासून अलग राहणं आणि तरीही आपलं कार्य वाढवणं हे केरळात तरी अशक्य आहे. (श्री. भास्कररावांनी हे उद्गार दि. १८ मे रोजी काढले आहेत.) शेवटी ही संघटना राष्ट्रीय आहे. धर्म निराळा असल्याने राष्ट्रीयत्व बदलत नाही, रक्त तर नाहीच नाही हा विचार इथल्या ख्रिश्चन–मुस्लिमांमध्येसुद्धा रुजवणं आज आवश्यक आहे. अर्थात आता पूर्वीपेक्षा चित्र निश्चितच पालटू लागलं आहे. एम्. थॉमस हा ख्रिश्चन लेक्चरर संघशिक्षक म्हणून काम पाहात आहे. इथल्या ख्रिश्चनांना स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता आहे. त्यामुळे राजकीयदृष्ट्या सोडता ते आम्हाला कोणताही विरोध करत नाहीत. केरळातील जातीयवाद मोडून काढण्याचं श्रेय कम्युनिस्टांना दिलंच पाहिजे; पण त्याचा फायदा आता आम्हाला मिळत आहे.'

हे सगळं बोलणं होत असतानाच दुपारचा चहा आला. केरळात संघ कसा निर्माण झाला आणि विविध राजकीय–सामाजिक घडामोडींना तोंड देत तो कसा वाढत आहे याचं उत्कृष्ट चित्र भास्कररावांनी उभं केलं होतं; पण एक प्रश्न अखिल भारतीय पातळीवरील संघाचाही विचार करताना अनेक वेळा मनात येतो. तो म्हणजे भारतामध्ये सांस्कृतिक, सामाजिक आणि काही प्रमाणात राजकीय क्षेत्रातही संघानं काम केलं आहे, आपला एक ठसा उमटवला आहे; परंतु आर्थिक आघाडीवर मात्र संघ एक अक्षरही बोलत नाही. या मुद्द्यावरही भास्कररावांनी अतिशय मोकळेपणाने उत्तरं दिलं. भास्करराव म्हणाले, 'तुमचा हा मुद्दा अतिशय बरोबर आहे. संघानं आजपर्यंत या क्षेत्राबद्दल उघडपणे काहीही सांगितलेलं नाही. पण

दिल्लीच्या पं. दीनदयाल रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये आता हा अभ्यास चालू झाला आहे. विविध सामाजिक प्रश्नांची उकल त्यामधून करावी लागेल. पण आज तरी हे चित्र आमच्यासमोर स्पष्ट नाही. आणखी दोन–तीन वर्षांत आम्ही या बाबतीतही काही तरी ठोस उत्तर देऊ शकू, असा आम्हाला विश्वास वाटतो. हिंदुत्वावर आधारित पण सद्यःस्थितीशी सुसंगत अशी काही तरी अर्थव्यवस्था देण्याचा आमचा प्रयत्न राहील. अर्थात हे करताना समाजातील काही भाग दुखावला जाईल याची आम्हाला जाणीव आहे. पण सामाजिक विषमता आणि भेदभाव दूर करताना तो धोका पत्करावाच लागेल. कारण आर्थिक केंद्रीकरणातूनच सत्तेच्या केंद्रीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होत असते. तेव्हा त्याला मुळातच पायबंद घातला पाहिजे. तसंच लहान शेतकरी आणि शेतमजूर यांच्यावरही आम्हाला आमचं लक्ष केंद्रित केलं पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने या बाबतीत जर काही ठोस कार्यक्रम दिला तरच त्याला भवितव्य आहे, असं मला वाटतं. विविध सामाजिक प्रश्नांची उकल संघाला करावीच लागेल. कामगार व शेतमजूर हेच उद्याचे भागधारक असणार आहेत, याची जाणीव ठेवून आम्हाला काम करायचं आहे. केरळच्या पातळीवर बोलायचं झालं तर संघर्ष हे आमचं धोरण नाही. कारण विकासाच्या काळात Antimarxist wave आम्हाला परवडणारी नाही. पण वेळ आली तर त्यासाठी माघारही घेऊ नये, असं आमचं धोरण आहे.'

## भास्करराव : एक विचारी संघप्रचारक

भास्कररावांच्या बोलण्यातून मोकळेपणा आणि आत्मविश्वास या दोन गोष्टी अतिशय प्रकर्षाने जाणवत होत्या. संघाला अजून जे मिळवता आलेलं नाही त्याबद्दल खेद होता, पण ते मिळवण्याची उमेदही जाणवत होती. अर्थव्यवस्थेवरील त्यांचे विचार तर संघाबद्दल विशिष्ट ढापणं लावून पहाणाऱ्या कोणाही व्यक्तीला क्रांतिकारकच वाटतील. पण संघातील नव्या विचारप्रक्रियेचे ते द्योतक आहेत, याची जाणीव कोणत्याही समंजस व्यक्तीला झाल्यावाचून राहणार नाही. शेतकरी, शेतमजूर, कामगार, श्रमिकवर्ग यांच्यासाठी संघ जर खरंच कार्य करू लागला तर आपण भारतात काय करायचं, हा प्रश्न डाव्या विचारसरणीच्या सर्वच लहान–थोर कार्यकर्त्यांपुढे पुढल्या दशकात निश्चितपणे उभा राहणार आहे आणि यातूनच खरा संघर्ष पेटणार आहे.

भास्करराव कळंबी यांची भेट मिळाली तो दिवस आमच्या केरळ दौऱ्यातला सर्वांत आनंददायक दिवस होता. दुसरा आनंददायक दिवस म्हणजे आम्ही कन्याकुमारीला शिलास्मारक, विवेकानंदकेंद्र आणि तीन महासागरांच्या सान्निध्यात घालवला तो ! आम्ही तोरावूरला बिचकतच गेलो होतो हे आधी सांगितलं आहेच. शिवाय त्याआधी ५–६ दिवस रात्रीची जागरणं, सततचा प्रवास, पुष्कळ पायी हिंडणं झाल्यामुळं जी विश्रांती आवश्यक होती, तीही मिळाली; परंतु प्रांतप्रचारक आपल्या प्रश्नांना सद्भावानं, मनापासून, उत्साहानं उत्तर देतो, ६–७ तास उलटतपासणी सहन करतो हा अनुभव अधिक सुखावणारा होता. त्याला श्री. भास्करराव यांचं व्यक्तिमत्त्व कारणीभूत झालं.

भास्करराव यांनी अद्याप साठी ओलांडलेली नाही. मात्र ५५ वर्षांच्यापुढं त्यांचं वय नक्की असेलच. ४६ साली जेव्हा त्यांना केरळात पाठवण्यात आलं तेव्हा ते अर्थशास्त्राचे आणि कायद्याचे पदवीधर होते व एम्. ए. चा अभ्यास करत होते. कदाचित अर्थशास्त्राचे पदवीधर असल्यामुळं आणि केरळमधला लढा मुख्यत: कम्युनिस्टांशी असल्यामुळेच त्यांना श्री. गुरुजींनी केरळात धाडायचं ठरवलं. मुळात मातृभाषा कोकणी, शिक्षण मराठी, इंग्रजीत झालेलं, बालपण गिरगावात गेलेलं आणि तिथेच ते मुंबईच्या अगदी पहिल्या स्वयंसेवकांपैकी एक झालेले ! ४६ मध्ये त्यांना मल्याळम् भाषेचा गंध नव्हता, त्या आधी ते केरळात गेलेले नव्हते. आज मात्र ते पूर्ण मल्याळी बनून गेले आहेत. उत्तम मल्याळी बोलतात, वाचतात. मात्र मराठी बोलणं उरलं असलं तरी लिहिण्याचा सराव पार नाहीसा झाला आहे. आमच्या आभाराच्या पत्राला त्यांचं उत्तर इंग्रजीतून आलं आहे– 'तुमच्यासारखं मराठी मला लिहिणं जमणारच नाही !' असा विनम्र सूर त्या पत्रात आहे.

मल्याळी मंडळींच्या गराड्यात मध्यम उंचीचे भास्करराव बरेच उजळ दिसतात. आहेत त्याहून ५–७ वर्षांनी तरी तरुण वाटावेत इतकी त्यांची शरीरयष्टी अजून लवचिक आहे. त्यांच्या हालचाली अत्यंत जलद असतात आणि बोलणंही तितकंच जलद असतं. विरळ होत चाललेले आणि रुपेरी पडत चाललेले केस व चष्मा सोडला, तर वयाची कोणतीही खूण त्यांच्या मुद्रेवर नसते. हास्यविनोद सतत चालू असतो. सर्व प्रचारकांवर बारीक लक्ष असते. रोजची वर्तमानपत्रं ते अत्यंत बारकाईनं वाचतात आणि राजकीय घडामोडींविषयी चर्चा आपल्या बैठकीमधून तर करतातच; परंतु बौद्धिक वर्गातूनही करतात. आम्ही तोरावूरला होतो तेव्हाच निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. 'संध्याकाळचे सहा वाजताच भास्करराव म्हणाले, 'अरे बातम्या लावा, तेलीचेरीला काय झालं ते कळलं पाहिजे ! मार्क्सवादी निवडून आल्याची बातमी कळल्यावर ते हताश झाले नाहीत– लगेच त्यांनी त्या अपयशाचं विवरण सुरू केलं, 'मुस्लिम व मार्क्सवादी आपल्याविरुद्ध एक झालेत, म्हणून मतांचा लीड वाढला आहे' व नंतर आम्हाला मराठीत म्हणाले, 'मला हे अपेक्षितच होतं; पण कार्यकर्त्यांचा उत्साहभंग होऊ नये म्हणून आधी बोललो नव्हतो.'

संघाबद्दल आपुलकी असणारांची टीका आम्ही ऐकून घेऊ आणि तिच्यावर विचार करू असं श्री. बाळासाहेब देवरस म्हणाले आहेत, भास्करराव तर अशा टीकेचं स्वागतच करतात. टीका, प्रश्नोत्तरे, चर्चा या बाबतीत त्यांच्या वयाचे महाराष्ट्रातले अनेक आजी–माजी संघकार्यकर्ते फार तुच्छ दृष्टी ठेवून असतात. ऐक्याला सुरुंग लावणाऱ्या या प्रक्रिया आहेत असं त्यांना वाटत असतं, त्यांनी याचं अनुकरण करण्याची फार गरज आहे. बुद्धिजीवी वर्ग केरळात संघाकडे आकृष्ट होत नाही, तो झाला पाहिजे म्हणून भास्करराव हळहळतात, धडपडतात आणि महाराष्ट्रात बुद्धिजीवी, विचारवंत, प्रतिभावंत यांना आज्ञांकित बनवण्यात किंवा त्यांची टिंगल करण्यात अनेक जण धन्यता मानतात, हे बदललं पाहिजे. नाही तर संघाचं तत्त्वज्ञान समृद्ध होणार नाही, वैचारिक गतिमानता येणार नाही, असं भास्कररावांचं स्पष्ट मत आहे. डॉ. हेडगेवार यांचा सहवास त्यांना फार लहानपणी म्हणजे बाल स्वयंसेवक असतानाच मिळाला.

डॉक्टरांच्याविषयी ते फार आत्मीयतेने बोलत होते. थोडेसे भावनोत्कट झालेले दिसत होते. ' डॉक्टर मुंबईला यायचे, अनेक आजारांनी ग्रस्त असायचे, संघाविषयीच्या काळज्या असायच्या, काम वाढत असलं तरी आर्थिक अडचणी सतत उभ्याच असायच्या ते आमच्यापैकी कुणाला तरी बरोबर घ्यायचे आणि मित्रांकडे पैसे गोळा करण्यासाठी बाहेर पडायचे. आमच्याशी वाटेत गप्पा चालायच्या—सगळीकडे आपला सरसंघचालक पायीच हिंडतो, पैशाची भयंकर काटकसर करतो, चंदनासारखा झिजतो हे तेव्हा जाणवलंच नाही. आम्हाला त्याच्याबद्दल खूप प्रेम, जिव्हाळा वाटायचा, सख्खं नातं असल्यासारखं वाटत होतं; पण हा माणूस किती मोठा होता ते आता कळतं आहे.' भास्कररावांच्या या आठवणीत डॉक्टरांचं यथार्थ वर्णन तर आहेच; पण डॉक्टरांच्या स्वभावातल्या, कार्यपद्धतीतल्या कोणत्या गोष्टी त्यांनी स्वीकारल्या आणि केरळात गेली ३३ वर्षं आचरणात आणल्या त्याचंही दिग्दर्शन झालं आहे.

### डॉक्टर–गुरुजी–देवरस

संघावर टीका करणारे व संघाविषयी आत्मीयता असून असमाधान असणारे असे दोन्ही गट सध्या एक विचार पुढे मांडत असतात. श्री. देवरस म्हणजे प्रति डॉ. हेडगेवार असं कै. गुरुजीच म्हणाले होते. त्याचा व इतर घडामोडींचा आधार घेऊन गुरुजींच्या काळात न झालेली; पण डॉक्टरांना अभिप्रेत असलेली राजकीय, सामाजिक कार्ये संघ पार पाडील असा विश्वास सर्वांना वाटतो. टीकाकारांना त्याचीच भीतीही वाटते. गुरुजींच्या नेतृत्वाचा कालखंड असा वेगळा काढायला भास्करराव फारसे अनुकूल दिसले नाहीत. गुरुजी मवाळ होते, अध्यात्मिक होते, राजकारणापासून पाठ फिरवणारे होते तरीही केरळात मात्र खून पडताच संघानं हा लढा आक्रमकतेनं लढला पाहिजे असं ते म्हणाले होते, हे श्री. भास्कररावांनी लगेच सांगितलं. त्यांना डॉक्टर–गुरुजी–देवरस यांच्या नेतृत्वात सुसूत्रता दिसते. मात्र शैलीची भिन्नताही ते अमान्य करीत नाहीत. श्री. देवरस यांच्या सहज, मनमोकळ्या स्पष्ट वक्तेपणाचं आणि निर्णय घेण्याच्या वेगाचं इतर कार्यकर्त्यांप्रमाणेच त्यांनाही फार कौतुक वाटतं. त्यांच्या नेतृत्वानं संघाचं काम फार लवकर गतिमान होईल असा विश्वास वाटतो.

भास्कररावांशी बोलताना 'हे तो प्रचीतीचे बोलणे' म्हणजे समर्थांना काय अभिप्रेत होतं ते कळत होतं. संघाच्या कामाचं स्वरूप तत्त्वतः समजावून घेतल्यानंतर केरळमधलं काम त्यांनी स्वतःच्या खास शैलीत वाढवलं आहे. उदारमतवाद आणि आक्रमकता ही संघात अभावानं दिसणारी दोन वैशिष्टचं त्यांच्या कामात दिसतात, बोलण्या-चालण्यात जाणवतात. आपण महाराष्ट्रात ज्या संघावर टीका करतो तो संघ केरळमध्ये अस्तित्वातच नाही. असं घडलं ते भास्करराव यांनी केरळचं समाजजीवन व राजकीय आर्थिक रचना बारकाईनं पाहून काम केल्यामुळंच. त्यांना सर्व प्रश्न विचारून संपले आणि थोडासा चावटपणा करण्याची लहर आली. आम्ही म्हटलं, ' भास्कररावजी फार, आनंद झाला, आमचं पूर्ण समाधान झालं. पण तुमच्या वयाची आणि अधिकाराची महाराष्ट्रातली एक–दोन नावं सांगता का, की ज्यांच्याशी अशीच मनमोकळी चर्चा करता येईल ?' भास्करराव समंजसपणाने हसले, म्हणाले, ' आपल्याकडे त्या त्या प्रांताचं काम ऑटॉनॉमस असतं. प्रांतप्रचारक–संघचालक मुख्यतः सरसंघचालकाला बांधील असतात. तेव्हा त्या त्या व्यक्तीच्या स्वभावाप्रमाणं ते ते काम वाढतं, विकसित होतं आणि त्याला एक ठराविक आकार प्राप्त होऊन जातो. त्यामुळं मी नावं कुणाची, कशी सांगणार ?' यावर आम्हीही हसलो.

तेलोचेरीमध्ये फिरून झाल्यानंतर मनात विचार आला होता की, या अशिक्षित अर्धशिक्षित तरुणांना आपण कशासाठी मेलो हे कळलं असेल का ? श्री. भास्कररावांशी बोलल्यावर आम्हाला मात्र ते कळलं. भास्करराव त्यांच्या मुलाबाळांची, कुटुंबियांची, पुनर्वसनाची काळजी तर घेतच आहेत; पण त्यांचं केरळच्या भूमीवर सांडलेलं रक्त वाया जाणार नाही, त्यातून तळागाळाच्या समाजाला सामावून घेणारा संघ उभा राहील आणि दलितांना हिंदूपणाचा विसर पडू न देता त्यांचा आर्थिक–राजकीय विकास व्हावा, त्यांना सामाजिक समतादेखील प्राप्त व्हावी यासाठी ते झटत आहेत. या कार्यासाठी निदान १० ते १५ वर्षं अजून लागतील असं त्यांना वाटतं. तेवढे कष्ट उपसण्यासाठी ते आणि त्यांचे कार्यकर्ते जिद्दीने उभे आहेत !

या सर्व लढ्याकडे अखिल भारतीय संदर्भात पाहून काही साधक-बाधक चर्चा आता पुढील लेखात करू.

(क्रमशः)

उद्योजक बनण्याची आपली महत्त्वाकांक्षा
आहे का ?
तर मग
' लघुउद्योग '
मासिक
आपण वाचलेच पाहिजे
औद्योगिक घडामोडींचा आढावा घेणारे
मराठीतील मासिक
(वार्षिक वर्गणी रु. १५)
: पत्ता :
महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ
मर्यादित
कृपानिधी, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८

पुस्तके

# धुरकटलेल्या क्षीण संदर्भांचेच
# जुने भग्न 'अवशेष'

तर हे 'अवशेष' तसे जुनाटच, त्यापाठी-मागचे संदर्भही बऱ्यापैकी शिळे ! आणि या सगळ्या उत्खननातून झालेलं ज्ञानही (अगदी 'दृष्टान्त पाठा'तील दोन कथांच्या तात्पर्यासह) अंतर्बाह्य ओळखीचं ! त्यामुळे,

'मला बुजवून टाकायचे होते
आतले झरे
का काढलास
बसवलेला दगड
का तुडंबवलीस परत बारव ?'
('लोट' पृ. ६०)

ही अगतिकताही फारशी आकर्षक वाटत नाही. किंबहुना फ. मुं. शिंद्यांच्या कवितेतूत अशी कोणतीच एखादी संवेदना तुम्हाला आतपर्यंत जाऊन, ढवळून टाकत नाही, वा खोलवर अस्वस्थही करीत नाही. मग ती डोळ्यांतल्या गूढ दरवेशांना अलगद जपणारी स्वप्नाळू 'फुलराणी' असो किंवा व्यक्तीचे स्वतःशी असणारे संवाद आटवून टाकणारं आणि आपल्या विराट गर्दीत तिला जिरवून टाकणारं 'नगर' असो. त्यातील अजस्र केविलवाणेपणाचे लोट अंगावर चाल करून येतच नाहीत किंवा 'नियती'च्या भयाण भेसूर अस्तित्वातून अंगावर चाल करून येणारे प्रश्नही आकाशभर पसरत नाहीत किंवा स्वतःच्या पोकळीतल्या अंधाराचा पोतही घट्ट विणत नाहीत. कदाचित 'आकार रचून पहाताना' द्यावी लागणारी किंमत इथं दिली गेली नसावी. ('न्यूड'सारख्या एखाद्या कवितेनंच हे मनाचं मोडलेपण जाणवतं तेव्हा मग खरोखरच दुःखाचे जास्वंद नुसते 'बिलगत' नाहीत, त्याच्या कळा खोल जातात.)

जखमेवर दुःख गुंडाळणाऱ्या या कवितेचं कूळ अगदी अलीकडचं आहे. मात्र जुळणारे दुवे आणि जन्मणारे दुरावे, सलणारी बोच, ठसठसणारं सुख, त्याच्या वेदना हे सगळं संचित सनातन आहे. या सनातनत्वाचे किती आकार इथं दिसतात? प्रातिनिधिकच म्हणता येईल, अशा आशयातून काही नवीन अर्थाकृती तयार झालेल्या आहेत किंवा नाहीत? (जशा त्या 'जुलूस'मध्ये आहेत.) अनेकविध गुंतागुंतीच्या संबंधविश्वातून कोणते सूर आपल्या शांत स्वस्थ सुरक्षिततेला कापीत जातात? कारण अखेर संवेदना सनातनच असतात, त्यांचा आविष्कार नूतन असतो, म्हणून मग बालकवी, मर्ढेकर आणि आता अरुण कोलटकरांचे प्रश्न व्यापक वेदनेला गवसणी घालतात. त्यांचा शोध मोठा होतो जरी गुहेतल्या अंधारातलं चाचपडणं–क्वचित चुकीच्याही वाटेनं होत असलं तरी ! कारण वाट चुकणं हेही अशा प्रवासात स्वाभाविक असतं किंबहुना तो एक अर्थपूर्ण टप्पा असतो. अर्थात दुःखाची ही पाऊलवाट (किंवा राजमार्गच !) शिंद्यांना मंजूर आहे किंवा नाही, ती का नाही हे संपूर्ण वेगळे प्रश्न आहेत हे मला इथं आवर्जून नमूद करायला हवं. यामुळे शिंद्यांचं दुःख स्वगताच्याच पातळीवर रहातं, तिथंही ते 'नित्य-नूतन' झालं आहे असा अनुभव येत नाही. कदाचित अनुभव प्रकट करण्याच्या अपार ओढीनं हे सगळे आकार आणि त्यांचा आशय (प्रतिमात्मकताही !) कैद झाला असावा.

शिंद्यांच्या सगळ्या 'अवशेषां'तील केंद्रवर्ती दुवा व्यथेचा, वेदनेचा आहे, 'विझलेपणा'चा आहे म्हणून 'प्रेयसी'शी होणाऱ्या जिवाभावाच्या गोष्टीही उमलत नाहीत. ते गर्भतहानले हळवे रंगही उत्तरोत्तर व्याकुळ होत जातात. (पृष्ठ १६, १७, २४) आणि मग,

'फुटून तरारलेला फोड
पसरतं पाणी
उतत
आपण होतो अंगभर
यातनांचा एक थर'

ती हळवी, उरापोटी जपलेली आर्तताही काळीठिक्कर पडत जाते. 'आपलं काहीच नसतं' हेही ज्ञातेपण येतं–तेव्हा स्वतःचेच कोमल[illegible]रपट पापुद्रे सोलले जातात मग फक्त 'आपुलाचि संवाद आपणाशी' जमवायचा जास्तीत जास्त प्रयत्न करणं एवढच उरतं–कालन्तराने तेही स्थिरावतं. कारण तोपर्यंत स्वतःचेही डोळे गाफील झालेले असतात. अशा वेळेस

'आपण
आपलं असावं किंवा नसावं
झालेलो इतरांकरता
किंवामध्ये जन्माचा अर्थ कोंबत
वर्षांना ढकलणं जमणं किंवा न...
'शहर बदललं तरी
शहर आहे तसंच आहे
आतलं (पृ. ४९)

अशा मुक्या बोलांनी स्वतःची आणि गर्दीतलीही पोकळी कशीबशी रिचवणं हेच अटळ असतं ! तेवढा समजूतदारपणा, शहाणपणा भिनतो म्हणून मग अखेरीस फक्त 'स्वगत' उरतं.

बधिरपणाच्या नानाविध कळा या कवितांत आहेत. 'कशासाठी हिंडत आहोत आपण ? असा प्रश्न आहे तसंच' सर्वत्र समुद्र उथळ आहेत. दुःखासारखे खोल आपण आहोत. 'अमंथनीय' हेही भान इथे आहे. मात्र हा बधिरपणा पुरेसा दळदार नाही हे मी प्रथमच म्हटलं आहे. तो बराचसा सैलावलेला. अस्ताव्यस्त पसरलेला आहे. शिंद्यांच्य, प्रतिमात्मकतेतून त्याचा ठळक पुरावा मिळतो ('चंद्र'ही या संग्रहातील अतिशय उत्कृष्ट प्रतिमात्मक कविता आहे. त्याचीही दखल घेतली पाहिजे.) तरीही हे 'अवशेष' न्याहाळावेत असे आहेत. कारण,

'माझा अंधार तसाच
असू दे
माझ्यावर पसरलेला'

अशा अंधाराची उपासना प्रामाणिकपणाने करणारा हा कवी आहे याची साक्ष हे अवशेष निश्चितच देतात आणि ही घटनाही कमी अर्थपूर्ण नव्हे !

–रेखा इनामदार

अवशेष
फ. मुं. शिंदे
मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे.
पृष्ठे ६४; किं. रु. सात

सध्याचे लोकप्रिय इंग्रजी लेखक

# सीडने शेल्डन–

कपडे कसे शिवलेले असावेत व कापड कोणते असावे त्याची अशी प्रत्येक काळात वेगवेगळी फॅशन असते, तशीच पुस्तके कोणती वाचावीत याची सुद्धा एक प्रकारची लाट येते. पूर्वीच्या काळात पेरी मॅसन, ( स्टॅनले गार्डनर ) सेंट, ( Leslie Charteris ) शेरलॉक होम्स ( डॉइल ), माईक शेन ( ब्रेट हॅलिडे ), सेक्सटन, ब्लॅक व टिंकर ही नावे सर्वांच्या तोंडी सहज येत; पण आता बऱ्याच लोकांना ही नावे माहीत सुद्धा नाहीत. आता पॅन्टचा बॉटम रुंद असला तरच तुम्ही फॅशनेबल समजला जाता. तसेच आता जर तुम्ही जुन्या लेखकांची पुस्तके वाचली तर तुम्ही ' आउट ऑफ ट्यून ' आहात असा समज होतो.

कपड्यांच्या बाबतीत हे असे होणे ठीक; पण पुस्तके वाचण्यात सुद्धा ' फॅशन ' असते हे मला वाचनालय चालवूनच कळले ! फॅशन गेल्यावर कपडे पडून रहातात तशीच काही पुस्तके पडून रहातात.

सध्याचे इंग्रजी लोकप्रिय लेखक म्हणजे सीडने शेल्डन, रॉबर्ट लुडलम्, आर्थर हेले, आर्यविंग वॉलेस, हेरॉल्ड रॉबीन्स, जेम्स हॅडले चेस वगैरे. हे लेखक इतके लोकप्रिय आहेत की त्यांची नावे चोरीला जातात ! म्हणजे या लेखकांच्या नावांखाली त्यांनी न लिहिलेली इतर पुस्तके छापली जातात. निव्वळ त्यांच्या नावामुळे ती खपतात ! मुंबईत पुस्तके खरेदी करायला गेलो की असे पुस्तकीय चाचेगिरीचे कैक नमुने दिसतात. काही पुस्तकवाले हे पुस्तक ' फेक आहे ' असे प्रामाणिकपणे सांगतात, तर काही पुस्तकवाले ' चाचेगिरी ' ची पुस्तके तत्त्व म्हणून विकत घेतच नाहीत !.

या लोकप्रिय लेखकांना हा प्रकार निश्चितच माहीत असेल. जर यदाकदाचित ते भारतात ताजमहाल हॉटेलमध्ये ( ते नेहमी पचतारका हॉटेलमध्ये उतरतात ) आले व मुंबईत त्यांना ही पुस्तके दिसली तर ही ' फेक ' पुस्तके पाहून त्यांचे बरेच मनोरंजन होईल !

सीडने शेल्डनने आतापर्यंत फक्त चार पुस्तके लिहिली. ' अदर साईड ऑफ मिडनाइट ' या पुस्तकाने त्याला अगदी डौलाने लोकप्रियतेच्या लाटेवर आणून सोडले.

सीडने शेल्डनला एक पुस्तक लिहायला दोन वर्षे लागतात. एक वर्ष लिहिण्यात व दुसरे वर्ष त्या पुस्तकात सुधारणा करण्यात. याआधी शेल्डन सिनेमासाठी स्क्रिप्टस् लिहीत होतेच. TV साठी सुद्धा त्याने २५० स्क्रिप्टस् लिहिल्या आहेत.

शेल्डन असे म्हणतात की, कादंबरीतील पात्राच्या भावविश्वात तुम्ही सहजपणे घुसू शकता. यालाच empathy म्हणतात. चित्रपटाच्या माध्यमात ही empathy तेवढी साधता येत नाही. पुस्तकाच्या माध्यमात संपूर्ण स्वातंत्र्य मिळते असे शेल्डन म्हणतात. आतापर्यंत मी empathy चे उत्कृष्ट उदाहरण पाहिले ते स्टीफन झ्वाइगच्या ' Beware of Pity ' या पुस्तकात. झ्वाइग या पुस्तकातील लंगड्या मुलीच्या भावविश्वात इतका घुसला होता की, त्या मुलीच्या पात्रामुळे ही कादंबरी नुसती throb होते.

कथा–कादंबऱ्या लिहिण्यासाठी ज्या लेखकांची empathy साधण्याची जितकी कुवत जास्त, तेवढेच कादंबरीचे यश जास्त. कमी-अधिक प्रमाणात सर्वच कथाकारांना व कादंबरीकारांना empathy असते.

शेल्डनचे पहिल्या पुस्तकाचे नाव The Naked Face. तो म्हणतो, या पुस्तकाच्या फक्त तीन प्रती खपल्या. एक त्याच्या बायकोने, एक त्याने स्वत: व एक त्याच्या आईने त्या विकत घेतल्या. त्याचे दुसरे पुस्तक 'अदर साईड ऑफ मिडनाइट ' च्या ७० लक्ष कॉपीज् खपल्या. या पुस्तकाच्या विक्रमी खपामुळे पहिल्या पुस्तकाच्या सुद्धा ३० लक्ष प्रती खपल्या !

शेल्डन हे सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत कादंबऱ्या त्याच्या सेक्रेटरीकडून टाइप करून घेतात. एकदा कादंबरी सुरू झाली की ते आठवड्यातून सुट्टी सुद्धा घेत नाहीत. पुस्तके लिहिण्यात त्यांना एकाकीपणा अजिबात वाटत नाही.

कादंबऱ्या लिहिताना त्यांना पुष्कळ संशोधन करावे लागते. त्यांची अगदी अलीकडची कादंबरी म्हणजे ' ब्लडलाइन '. त्यासाठी ते औषधकंपन्यांचे संशोधन करण्यासाठी तीन महिने युरोपमध्ये गेले. शेल्डन असे म्हणतात की, असल्या प्रकारचे संशोधन केल्याशिवाय पुस्तकात जिवंतपणा येऊ शकत नाही. तुम्ही वाचकाला फार वेळ फसवू शकत नाही. ' ब्लडलाइन ' मध्ये एलिझाबेथ नावाची बाई जीपमधून एक मोठा घाट उतरते. त्या वेळी जीपचे ब्रेक्स निकामी होतात व आपण मरणार याची तिला खात्री वाटते. हा अनुभव घ्यायला शेल्डन व त्याची पत्नी खरोखर जीपमध्ये बसून घाटावरून घरंगळत खाली आले. त्यांची पत्नी तर भीतीमुळे अगदी अर्धमेली झाली होती; पण या अनुभवानंतर शेल्डनला मात्र हा सीन लिहिणे फार सोपे गेले !

इयान फ्लेमिंग सुद्धा Casino Royal लिहिण्याच्या आधी सबंध रात्रभर कॅसीनो खेळला होता याची आठवण या प्रसंगावरून येते.

प्रतिकूल टीकेमुळे पुस्तकांच्या विक्रीवर परिणाम होतो का ? या बाबतीत शेल्डनना असे वाटते की, काही पुस्तकांच्या विक्रीवर टीकेचा परिणाम जरूर होत असेल; पण माझ्यासारख्या लोकप्रिय लेखकावर त्याचा अजिबात परिणाम होत नाही. लेखकाने एखादी विशिष्ट आर्थिक मजल गाठल्यानंतर त्याला टीकाकारांची पर्वा अजिबात रहात नाही. ज्या अर्थी त्यांची (शेल्डनची) पुस्तके इतकी खपतात त्या अर्थी वाचकांना ती निश्चितच मनोरंजक वाटत असतील असे शेल्डनचे म्हणणे आहे.

अगदी नं. १ च्या लोकप्रिय मराठी लेखकाला एका कादंबरीमागे ५ ते ७ हजार रुपये मिळत असतील. कॅलक्युलेटरने हिशोब काढला तर नं. १ च्या इंग्रजी लोकप्रिय लेखकाला एका ओळीत एवढे पैसे मिळत असतील. कादंबरीविषयीचे हक्क, नंतर टी. व्ही. साठी हक्क व चित्रपटांसाठी हक्क हे सर्व जमेस धरल्यास इंग्रजी लोकप्रिय लेखकाला अर्ध्या ओळीतच तेवढे पैसे मिळत असतील !

शेल्डन तर कादंबरी लिहिण्याखेरीज इतरही ३।४ धंदे करतो ! त्याची बायकोसुद्धा चित्रपटधंद्यात काम करते.

शेल्डन अगदी उघड उघड कबूल करतात की 'सेक्स'चा वापर ते त्यांच्या पुस्तकात भरपूर प्रमाणात करतात. या संदर्भात ॲलिस्टर मॅक्लिनची आठवण येते. लोकप्रिय पुस्तके लिहिण्यासाठी सेक्स लागतोच हे विधान चुकीचे आहे हे दाखविण्यासाठी मॅक्लिनचे उदाहरण डोळ्यांसमोर येते. या घटकेला असे म्हणावे लागेल की, मॅक्लिन हा एके काळी नं. १ चा लोकप्रिय लेखक होता. अजूनसुद्धा तो लोकप्रिय आहे; पण नं. ४ किंवा ५ चा. या लेखकाच्या कादंबऱ्या जवळजवळ स्त्रीपात्रविरहित आहेत. एकदा ॲलीस्टेअर मॅक्लीनची एक कादंबरी मी एका बैठकीत वाचून काढली. अगदी शेवटी शेवटी एका स्त्रीपात्राचे ओझरते दर्शन एका पॅरेग्राफमध्ये झाले, तेव्हा कुठे माझ्या लक्षात आले की, 'अरेच्या, या पुस्तकात स्त्रीपात्र नाही हे आपल्या आधी कसे लक्षात आले नाही? कादंबरीचा एवढा ब्रेक-नेक स्पीड? कादंबरीची एवढी पकड? ढिशांव! ढिशांव!"

शेवटी इथे एक गोष्ट सांगावीशी वाटते. माझ्याकडे अमेरिकन व इंग्रजी वाङ्मयाचे थोडे संदर्भग्रंथ आहेत. एकदा मला वाटले या लोकप्रिय लेखकाविषयी थोडी माहिती या संदर्भग्रंथात बघावी. वर सांगितलेल्या (शेल्डनसह) एकाही लोकप्रिय लेखकाचे नाव या पुस्तकात नाही!

म्हणजे एकीकडे पुस्तके लिहून या लोकांनी तारांकित आकड्यात डॉलर्स मिळवले आणि साहित्यक्षेत्रात काय मिळवले? तर भले मोठे शून्य!!

–जे. एन्. पोंडा
–फिनिक्स लायब्ररी

रंगभूमी । विनया खडपेकर

# शाळामास्तरीण

## प्रयोग उत्तम

फ्रॉइड वगैरे थोडेफार वाचून किंवा नुसतेच दुसऱ्याच्या तोंडून ऐकून आम्हाला थोडेफार मानसशास्त्र माहीत झाले आहे. स्वभावतः सत्प्रवृत्त माणसे एखादे भयानक दुष्कृत्य करून जातात, तर कधी सरळ साधी माणसे व्यक्तिगत दुःखाने जखमी होऊन समाजावरच सूड काढू लागतात, हे आम्हाला कळले आहे. वरवर समजू न शकणाऱ्या या कृतींची कारणे माणसांच्या सुप्त मनात दडलेली असतात वगैरे वगैरेही थोडेफार पाश्चात्य वाङ्मयाच्या संपर्काने आम्ही जाणू लागलो आहोत. अधिक खोलात न शिरता या तुटपुंज्या ज्ञानावर कथा, कादंबऱ्या, नाटके रचण्याचा धंदा आजकाल सुरू आहे. त्यातलेच 'शाळामास्तरीण' हे एक नाटक.

'समता' निर्मित या नाटकाचे लेखक आहेत श्री. नरेंद्र चाफेकर आणि दिग्दर्शक आहेत श्री. सदानंद दळवी. या नाटकाचा दुसरा प्रयोग दीनानाथ मंगेशकर, नाट्यगृहात सोमवार दि. ९ जुलैला झाला.

नीरा ही एक शाळामास्तरीण. सोलापूरला असताना मानलेल्या मामाकडून तिच्यावर बलात्कार होतो. गर्भवती नीराची डॉ. निरंजन सुटका करतो. डॉ. निरंजन आणि नीरा एकमेकांवर प्रेम करू लागतात. नीरा गरोदर राहते. डॉ. निरंजनच्या आईला अशी बलात्कारित सून नको असते म्हणून तो विवाह पुढे पुढे ढकलू लागतो. नीराला वाटते, तो आपली फसवणूक करतो आहे. शेवटी डॉ. निरंजनच्या मुलाला जन्म देऊन त्याची अनाथाश्रमात रवानगी करून नीरा मुंबईला येते. शोभाच्या ओळखीने परळच्या चाळीतून बाबासाहेबांच्या बंगल्यावर येते. मुळात स्वभावाने गोड असलेली ही मुलगी जगातील कटु अनुभवामुळे कडू होते. सर्व पुरुषांना नादावून ठेवून पुरुषजातीवर सूड काढू लागते. बाबासाहेबांचा मुलगा विनोद तिच्यावर खरेखुरे प्रेम करतो. त्यालाही ती लग्नाला नकार देते. तो घरातून जातो. डॉ. निरंजन मधूनमधून तिला भेटतो. तो विनोदने आत्महत्या केल्याची बातमी आणतो. बाबासाहेबांना त्याने विनोदचा खून केला असा संशय येतो; पण विनोद जिवंतच असतो. निरंजन–नीरा विवाह होतो. शेवट गोड होतो. असे हे ढोबळ कथानक.

नीराला शाळामास्तरीण का केले आहे ते समजू शकत नाही. ती एखाद्या ऑफिसात कारकून असती किंवा टेलिफोन–ऑपरेटर, टायपिस्ट असे काही असती तरी बिघडले नसते. तिच्या 'मास्तरीणपणाने' नाटकात कोणताच महत्त्वाचा प्रश्न निर्माण होत नाही. असा आदर्श विद्यार्थ्यांसमोर नको म्हणून जेव्हा तिची नोकरी सुटते तेव्हाच ती डॉ. निरंजनशी विवाहबद्ध होते. त्यामुळे प्रश्न उरतच नाही. नीरावर प्रेम करणारा डॉ. निरंजन नेहमी निरोप घेताना खलनायकी टाऽटा का करतो तेही कळत नाही. प्रेक्षकांना जरा गोंधळात टाकण्यासाठी, गुंतवण्यासाठी त्याच्या सगळ्या व्यक्तिमत्त्वालाच काही काल खलनायकी सूर दिला आहे. विनूभाऊ हे पात्र केवळ विनोदासाठी राबविले आहे. ते विनोद कंटाळवाणे वाटतात.

नाटकाचा प्रयोग मात्र चोख आहे. सर्व पात्रांची चेहरेपट्टी, शरीरयष्टी, वेषभूषा आपापल्या भूमिकेला अतिशय योग्य होती. छोटू सावंत (विनूभाऊ), अनंत मिराशी (अनंत), चंद्रकांत राणे (बापूमास्तर), शशिकांत (दामू पानवाला), सदानंद दळवी (विनोद), राजा चव्हाण (शाम), रविराज (डॉ. निरंजन), नयनतारा (नीरा) यांनी आपापल्या भूमिका चोख केल्या. श्री. रवी पटवर्धन (बाबासाहेब) यांच्या अभिनयाचा विशेष आवर्जून उल्लेख करणे योग्य होईल. वकिलाच्या भूमिकेचे भान त्यांनी अतिशय सुंदर ठेवले होते. पुत्राच्या मृत्यूमुळे येणारी शोकाकुलता आणि त्या शोकाकुलतेतच त्याच्या मृत्यूच्या रहस्याचा वेध घेणारी वकिली बुद्धी हे संमिश्र भाव व्यक्त करणे कठीण होते; परंतु ते आव्हान श्री. रवी पटवर्धन यांनी यशस्वीपणे पेलले. एका दिलदार स्वभावाच्या वकिलाचे सुसंस्कृत, संयमी व्यक्तिमत्त्व अतिशय सहजपणे त्यांनी रंगमंचावर साकार केले. के. भास्कर यांची प्रकाशयोजना आणि नंदलाल रेळे यांचे ध्वनिसंकलन प्रसंगानुरूप होते. सदानंद दळवी, प्रदीप रांगणेकर यांच्या नेपथ्याने वकिलाचे घर योग्य प्रकारे सजविले होते.

लेखनात ढोबळ, उथळ पण प्रयोगात चोख असे हे नाटक आहे.

□

# नाट्यदर्पण रजनी

## एक कौतुकसोहळा

प्रतिनिधी

'नाटयदर्पण रजनी'बद्दल ऐकलं पुष्कळच होतं, पाहण्याचा योग गेल्या आठवड्यात आला. 'नाटचदर्पण' हे नाटकाला–रंगभूमीला वाहिलेलं मराठी मासिक. मंगळवार दि. १० जुलै १९७९ रोजी त्याला सात वर्षं पूर्ण झाली, त्यानिमित्त त्या दिवशी मुंबईत आणि दि. ११ जुलै रोजी पुण्यात हा कार्यक्रम सादर करण्यात आला. गेली पाच वर्ष नाटचदर्पण तर्फे त्या त्या वर्षीच्या रंगभूमीवरील मानकऱ्यांना (फिल्मफेअर अॅवॉर्डस्च्या धर्तीवर ?) पारितोषिके दिली जातात. एक परीक्षणसमिती संपूर्ण वर्षात रंगभूमीवर आलेल्या नाटकांचा विचार करून नाटयकलेच्या विविध अंगांसाठी पारितोषिकपात्र व्यक्तींची शिफारस करते आणि मग दरवर्षी १० जुलैला होणाऱ्या नाटचदर्पण रजनीमध्ये समारंभपूर्वक ही पारितोषिके दिली जातात. गेली पाच वर्षे चालू असलेल्या या प्रथेत यंदा मोलाची भर पडली आणि मुंबईप्रमाणेच पुण्यातही 'नाटचदर्पण रजनी' सादर करण्यात आली. पारितोषिकवितरणाचा कार्यक्रम अर्थातच फक्त मुंबईकर प्रेक्षकांच्या वाटचाला आला. या रजनीनिमित्त खास बसविण्यात येणारे (काहीसे विविध गुणदर्शनात्मक) कार्यक्रम मात्र पुणेकरांना बरेचसे पहायला मिळाले.

नाटचक्षेत्रातल्या नामवंत व्यक्तींची उपस्थिती आणि, अथवा प्रत्यक्ष सहकार्य (थोडक्यात—नाटचगृहातील अथवा रंगमंचावरील त्यांची हजेरी) हे फिल्मफेअर अॅवॉर्डस् नाइटप्रमाणेच नाटचदर्पण रजनीचेही वैशिष्टच मानले गेले आहे. पारितोषिकवितरणाचा सोहळा मुंबईलाच होऊन गेल्याने पुणेकरांना अशा व्यक्तींच्या उपस्थितीचा लाभ मर्यादित प्रमाणातच मिळाला असणार. तरीही सर्वश्री दाजी भाटवडेकर, पुरुषोत्तम दारव्हेकर, बाळ कोल्हटकर, गणेश सोळंकी, सदानंद जोशी, जितेन्द्र अभिषेकी वगैरे आणि श्रीमती रजनी जोशी, लता कर्नाटकी, मधुवंती दांडेकर, आशा खाडिलकर, मनोरमा वागळे, शोभा प्रधान, विद्या पटवर्धन वगैरे कलावंतांनी 'रजनी'तील विविध कार्यक्रम संपन्न केले. यशवंत दत्त यांनी (नाव जाहीर करून व) अनुपस्थित राहून आपली 'झलक' पेश केली.

कार्यक्रमाच्या 'हायलाइट्स्' बद्दल बोलायचं तर थेट 'रजनी'च्या शेवटाशी पोचायला पाहिजे :– 'मत्स्यगंधा ते महानंदा' हा पं. जितेन्द्र अभिषेकी यांनी संकल्पिलेला एक संगीतमय नाटचप्रवास. या गुणसंपन्न–यशसंपन्न कलावंताने नाटचसंगीतनियोजक म्हणून आजवर जी कारकीर्द गाजविली, तिच्यातील काही प्रमुख टप्पे प्रसिद्ध नाटचगीतांच्या स्वरुपात या कार्यक्रमात सादर करण्यात आले. आशा खाडिलकर, राजा काळे, आरती अंकलीकर, अरुण आपटे आणि स्वतः पंडितजी यांनी यात सुरेल सहभाग घेतला, तर सुधीर गाडगीळ यांनी निवेदन केलं. अपेक्षेपलीकडे समाधान करणाऱ्या त्या कार्यक्रमाचं वैशिष्टच म्हणजे सर्वच कलाकारांनी त्याची रंगत सारख्याच तयारीनं आणि दर्जानं सांभाळली. आरती अंकलीकरच्या दोन गाण्यांचा तर खास उल्लेख करायला हवा, तिचं वय अनुभव लक्षात घेता. नाटचसंगीताच्या चाहत्यांना पंडितजींनी त्यांच्या आवडत्या गाण्यांची ही मेजवानीच दिली, आणि मध्यरात्र उलटून पहाटेकडे झुकणाऱ्या या 'रजनी'तला हा शेवटचा कार्यक्रम वेळेअभावी काहीशा घाईनं आवरता घ्यावा लागला, याची मोठीच रुखरुख सर्वांना लागल्यावाचून राहिली नाही. हा नाटचप्रवास त्याच्या संपूर्ण स्वरूपात स्वतंत्र कार्यक्रम म्हणून सादर होणे अगत्याचे वाटते.

'नाटचरजनी'ची सुरुवात कार्यक्रमपत्रिकेनुसार शाहीर साबळे यांच्या 'गणा'ने होणे अपेक्षित होते, तथापि त्याऐवजी एक नांदी सादर करण्यात आली आणि त्यानंतर पुण्यातल्या नाटचक्षेत्रीय मान्यवरांचा सत्कार या ऐसपैस पसरलेल्या कार्यक्रमाने बराच वेळ घेतला. (एकंदरीतच, पं. अभिषेकींचा कार्यक्रम वगळता, रजनीतील उरलेल्या सर्वच कार्यक्रमात हा ऐसपैसपणा सुखाने वास्तव्य करून होता, असं दिसलं.) या प्रकारचे सत्कारसमारंभ हे किती औपचारिक असतात, होतात हे सर्वांनाच माहीत आहे, तरीही ते असे लांबविले जातात हे विशेष. दाजी भाटवडेकरांनी या सत्काराचे सूत्रसंचालन करण्याच्या निमित्ताने चारपाच छोटीमोठी भाषणे केली. (त्यातल्या बाकीच्या बऱ्यावाईट गोष्टी सोडल्या तरी एक गंमत म्हणजे बोलता बोलता त्यांनी पुणे हे जवळजवळ मुंबईचे एक उपनगर बनले आहे, अशा तऱ्हेचं एक विधान केलं. दाजींच्या नाटचक्षेत्रातल्या कर्तृत्वाबद्दल नितांत आदर बाळगूनही, त्यांच्या या धाडसी निष्कर्षाचा एक अस्सल पुणेकर या नात्याने आम्ही तीव्र निषेध करीत आहोत! दाजींचे विधान नाटचगृहाच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे!) सत्काराला उत्तर देताना प्रा. भालबा केळकर यांनी आपण भाविक रंगभूमीचे पाईक असून (व असल्याने) आजवरच्या सन्मानास अजिबात लायक नसल्याचे ठासून सांगितले.

उरलेल्या कार्यक्रमांपैकी 'चंद्रधनुष्य' या संगीतनृत्यप्रधान बालनाटचाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी (पूर्वीच) लिहिलेली व दिग्दर्शिलेली ही बालनाटिका संथगतीने सादर झाली असली तरी सुमारे डझन भर बालकलाकारांनी ती ज्या तयारीने सादर केली, त्याबद्दल त्यांची करावी तेवढी प्रशंसा रास्तच ठरेल. स्वच्छ, खणखणीत आणि सुरेल आवाजाबरोबरच यथायोग्य व सहज अभिनय, उत्तम टीमवर्क आणि आत्मविश्वास यांचे सुखद दर्शन या नाटिकेत घडले. 'प्रतिभाराणी'च्या भूमिकेतील कलाकाराचा खास उल्लेख आवश्यक. या नाटिकेखेरीज 'चुकून स्वर्गवासी' (लेखक—बाळ कोल्हटकर, दिग्दर्शकः— पुरुषोत्तम दारव्हेकर) आणि 'एक नाटचदडपण' (लेखक—डॉ. रमेश रांगणेकर, दिग्दर्शक—कमलाकर नाडकर्णी) ह्या दोन एकांकिकाही रजनी'त सादर केल्या गेल्या व त्या चढत्या श्रेणीने रटाळ होत्या. 'चुकून स्वर्गवासी'ची कल्पना तरी चमकदार होती. नाटचदडपण मात्र सर्वस्वी असह्य. बहुधा ही एकांकिका प्रेक्षकांच्या प्रतिकूल प्रतिसादामुळे अर्ध्यातच संपविली असावी. 'संगीत रंगभूमीचे नवे अंकुर' हा नवोदितांच्या गाण्यांचा कार्यक्रमही सामान्य होता. एकंदरीतच रजनीतील कार्यक्रमांमध्ये संगीताचा प्रादुर्भाव फार मोठ्या प्रमाणावर होता आणि त्यामुळे कार्यक्रमांचा समतोल बिघडल्यावाचून राहिला नाही; हे नमूद केलेच पाहिजे.

अपेक्षेइतके समाधान ही रजनी देऊ शकली नसती, तरी ती इथे आणण्याचा दुर्घट खटाटोप केल्याबद्दल श्री. सुधीर दामले (संपादक नाटचदर्पण) यांना व सहकाऱ्यांना कलाकारांना धन्यवाद देणे अगत्याचे. हा उपक्रम अधिक इंटरेस्टिंग व्हावा, (सुधारणांसह) पुढे चालू रहावा. □

इंग्रजी चित्रपट । सदानंद बोरसे

# Star Wars

लहान मुलांची मस्त करमणूक करू शकेल, असा विचार मनात घोळवत मी ' Star Wars ' पाहून परतत होतो. रात्री बाराचा सुमार. अचानकरीत्या जादूगार मँड्रेकच्या पुस्तकात असते, तसे एक थेंबासारखे यान माझ्यासमोर अवतरले. त्यातून एक प्रकाशमय कृष्णवस्त्र किंवा अंधारमय श्वेतवस्त्र असे काही तरी अंगावर घातलेली एक व्यक्ती बाहेर आली. त्या व्यक्तीने माझ्याकडे एक छोटे खोके फेकले आणि ती पुन्हा त्या थेंबात विरघळली. थेंब अदृश्य झाला.

घरी येऊन मी उत्सुकतेने खोके उघडले. आत असलेले यंत्र आपोआप सुरू झाले आणि त्याच्या छोटयाशा पडद्यावर काही अक्षरे, आकृती आणि चिन्हे उमटू लागली.

'Z णु !! X (त्यानंतर काही वेळ तांबडे, हिरवे प्रकाशाचे पट्टे) P डो OOO लिआ–Luke –ङ ञ ' (याबरोबरच मागून 'ब्योक ट्र्र्र् पीप ' असे आवाजही येत होते. )

' एव्हाना मी पुरेसा भंजाळून आपल्याला समजणारे काही दिसेल का असा विचार करायला लागला होतो. त्या यंत्राने बहुधा टेलिपथीने माझा विचार ओळखला; कारण त्याच्यावर लगेच मजकूर उमटला, – ' सगळयांना एकमेकांशी संपर्क साधणे सोपे जावे म्हणून आम्ही ही विश्वभाषा आणि विश्वलिपी बनवली; पण तुला अजूनही ती निरर्थकच वाटते ना ? माणूस कुठला ! ठीक आहे, आता माझी स्वत:ची पातळी थोडीशी खाली आणून तुला समजेल अशा भाषेत बोलतो.

काय रे माणसा, ' A long time ago a galaxy far far away ' एवढे सुरुवातीला दाखवून टाकले की, वाटेल ते खपविण्याचा आपल्या हाती राजरोस परवाना मिळालाय अशी तुमची समजूत आहे की काय ? खुशाल तुमच्या ' एक गुराख्याचा पोर होता. त्याला भेटला एक देवदूत. मग त्या देवदूताने दिलेल्या जादूच्या तलवारीच्या मदतीने त्या पोराने काळचा सैतानाच्या तावडीतून राजकन्येची सुटका केली. ' या साच्याच्या बडबडकथा तुम्ही आम्हा रिबेलिअनांच्या संघर्षाचा इतिहास म्हणून दाखवता.

बरं, सगळेच्या सगळे काल्पनिकच असे आपण गृहीत धरले, तर त्या कल्पनानामक प्रकाराची उंची अन् भरारी तरी भव्य असावी की नाही ? पण छे, तेथेही बोंबच. रंग उडालेल्या एखाद्या भिंतीच्या पार्श्वभूमीवरून तांबडया रंगाचे पट्टे धावणे, किंवा एखाद्या हॉटेलात पशूच गिन्हाइके असणे हीच का तुमची कल्पनाशक्ती ? ते पशूसुद्धा सगळे पृथ्वीवरचे. केवळ आपले कधी तरी क्षितिजावर दोन-दोन सूर्य दाखवले आणि अंगात कायम रेनकोट घालणारी माणसे दाखवली म्हणजे लगेच तुमच्या कल्पनेत तुम्ही दुसऱ्या आकाशगंगेत गेल्याचे चित्र तयार होते का ? पुन्हा या सगळया प्रकारात तुमचा देवपार्टीविरुद्ध राक्षस पार्टी आणि अखेर येन केन प्रकारेण देवपार्टीचा विजय असो हा आवडता फॉर्म्युला तुम्ही सोडायला तयार नाहीतच. '

आतापर्यंत त्या यंत्राची पुष्कळच बडबड ऐकून, नाही पाहून घेतली असल्यामुळे त्याला थांबवत मी म्हणालो, ' नाही, तू म्हणतोस ते बरेचसे बरोबर असले तरी या चित्रपटाची निर्मितिमूल्यं तरी भलतीच उच्च आहेत की नाहीत ? म्हणजे ती निरनिराळी चमत्कारिक यानं, त्यांचे पाठलाग, युद्धं वगैरे ... '

' हि: हि: हि: ' असे जोरदार कुत्सित हसणे ऐकू आले आणि मी पडद्यावर वाचायला लागलो, ' कसली डोंबलाची निर्मितिमूल्यं ? त्यात दाखवलेल्या तथाकथित विलक्षण काल्पनिक दृश्यांबद्दल मी मघाशी सांगितलंच. राहता राहिली भव्य वगैरे दृश्यं. असली भव्यता, अशा बॉसच्या केबिन्स, अशी कडेने नुसतेच दरवाजे असलेली मोठमोठी दालने अन् बोगदे हे असले प्रकार कुठल्याही जेम्स बाँड टाइप चित्रपटात असतात. Star Wars या नावात आणि कल्पनेत अभिप्रेत असलेला अफाटपणा, अचाटपणा हे काही न उरता हा चित्रपट म्हणजे केवळ सिक्रेट एजंट ल्यूकने एका चिल्लर गँगशी दिलेला सामना बनला आहे ! '

' बरं, पण लोकांनी कामं बरी केली आहेत की नाही ? ' त्याचा एकूण नूर पाहून मी आता फारच सावध विधाने करायला सुरुवात केली.

' हां, तो भाग मात्र ठीक आहे. राजकन्या लिआ, ल्युक इत्यादी सगळयांचीच कामे छान झाली आहेत. खास करून लक्षात राहतो तो अॅलेक गिनिस आणि यंत्रांची जोडगोळी. '

' तुला कदाचित माहीत नसेल; पण या चित्रपटाला उदंड लोकप्रियता लाभली आहे आणि त्याच्याच पावलावर पाऊल टाकून या विषयावर आणखीही चित्रपट येताहेत. '

' हं ऽऽऽ ' असा एक दीर्घ सुस्कारा.

' बघू या, त्यात तरी काय दिवे लावले आहेत- आणि समजा काही दिवे पाजळले असलेच तरी आम्ही काय करू शकणार म्हणा ? तुमच्याच भाषेत सांगायचे तर– तुका म्हणे उगे रहावे, जे जे दिसेल ते ते पाहावे । ' ☐

# चित्रपटाबाहेर....

फिल्मी दुनियेत पडद्यावर जे काही चालतं त्यापेक्षा बऱ्याच गोष्टी पडद्यामागंही चालत असतात. पडद्यावर अयशस्वी ठरलेल्या जोडया पडद्यामागं यशस्वी ठरत असतात, तर पडद्यावरचं यश कित्येकांना पडद्यामागंही टिकवता येतंच असं नाही. सध्या फिल्मी दुनियेत शत्रुघ्न सिन्हा आणि रिना रॉय यांच्यामध्ये काही तरी ' गुफ्तगु ' चालू असल्याच्या बऱ्याच बातम्या येतायत. रिना तर या प्रकारानं अगदी वैतागून गेलीय. म्हणूनच परवा ' आशा ' या तिच्या नव्या सिनेमाच्या सेटवर ती कुणाला तरी सांगत होती.

' माझं तर सोडाच, पण या साऱ्या बातम्या आता माझ्या आईपर्यंत पोचल्या आहेत आणि त्यामुळं ती बिचारी फारच अपसेट होते. ती मला हल्ली नेहमी सांगत असते की, ' मुलींबद्दल बाहेर असं बोललं जाणं चांगलं नाही. तू आपली ही

फिल्मलाइन सोड आणि लग्न करून टाक.' तिची समजूत घालता घालता मला अगदी नाकी नऊ येतात. माझे भाऊ-बहीणही या गोष्टीवरून मला चिडवण्याची एकही संधी वाया जाऊ देत नाहीत. कित्येकदा त्यांनी माझ्याशी प्रेमानं आपुलकीनं वागावं अशी मीच याचना करते. कारण मला असं वाटतं की, मी कितीही यश मिळवलं तरी माझं घर आणि माझं मित्रमंडळ यांच्यासाठी मी काही पडद्यावरची हिरॉइन नाही. मी आहे फक्त–रुपा राय !

'शत्रुबरोबरचं माझं 'मिलाप' हे पहिलं पिक्चर फ्लॉप गेलं; पण 'कालिचरण' नं सिल्व्हर ज्युबिली केली. त्याबरोबर लगेच लोकांनी वावड्या उडवायला सुरुवात केली. कारण कोणत्याही जोडीनं पडद्यावर सिल्व्हर किंवा गोल्डन केलं की ही लोकं प्रत्यक्ष लाइफमध्येही तीच 'पेअर' कायम करून टाकतात. आता हे धरम आणि हेमाचंच पहा ना–कवळ इतरांच्या कल्पनाविलासावर ते प्रकरण कुठं जाऊन पोचलंय !

रिना थोडीशी 'इरिटेट' झालेली स्पष्ट-पणे दिसत होती; पण तरी तिला शांतही बसवत नव्हतं. पुन्हा काही तरी शत्रुघ्न सिन्हांचा विषय निघाला आणि रिनानं जाहीर करून टाकलं – 'आता किमान माझ्यापुरता तरी हे शत्रुघ्न–रिना प्रकरण संपलेलं आहे. (म्हणजे पूर्वी होतं एवढं तरी मला दिसतंय ! कधी बोलताना घसरायचं कधी चालताना - पण त्यामुळं आमच्या हिरोला मात्र सतत 'अॅलर्ट'च राहावं लागतं त्याचं काय ! )

'शत्रुघ्न आणि संजय यांच्यात सध्या जे शीतयुद्ध चालू आहे ते म्हणे मी निर्माण केलं, मी शत्रूला संजयविरुद्ध भडकवलं. या पत्र-कार मंडळींना वाटलं की, असं काही तरी लिहिलं की आपण एकदम 'स्टार' बनून जाऊ–पण मला हे समजत नाही की, मी या सगळ्यांशी इतकी चांगली वागत असताना ते माझ्याबद्दल असं काही तरी का लिहि-तात !'

इतक्यात कुणी तरी येतं आणि रिनाला शत्रूबद्दलच काही तरी विचारतं. रिना सांगते, 'वो अपनी मर्जीसे शूटिंगपे जाते हैं और दूसरोंकी मर्जीपे आते हैं।'

'लोक आम्हाला देवता मानतात. आमच्यावर जान उधळायला तयार होतात. या अशाच काही तरी ग्लॅमरमुळे मी फिल्म-लाइनीत आले.' रिना पुन्हा सांगायला लागते. 'मला खूप खूप प्रसिद्धी मिळवायची होती. प्रत्येकाच्या तोंडी माझं नाव जावं अशी माझी इच्छा होती; पण या फिल्मलाइनीत तुम्ही 'निष्पाप'पणे राहूच शकत नाही !' ( जाऊ द्या हो रिनादेवी, पाप–निष्पाप या सगळ्या दैवाधीन गोष्टी. आता तुम्ही निष्पापपणे राहूच शकत नाही, याला कोण काय करणार ? पण मनात पाप निर्माण होणं ही गोष्ट मात्र काही बरी नव्हे हं. लवकरच एखादा 'पुण्यवान आत्मा' शोध-लेला बरा ! )

रिनाचा असा प्लॅन आहे की, आणखी तीन–चार वर्षांनी ही फिल्मलाइन कायमची सोडून द्यायची आणि मुमुसारखं संसारात पार अदृश्य होऊन जायचं. 'पण ते तरी कसं जमणार ? आत्ताच माझ्या हातात इतकी पिक्चर्स आहेत की तूर्त तरी हे अशक्यच दिसतंय. बघू कसं काय जमतं ते !'

रिनाचा दैवावर फार विश्वास आहे. कदाचित ते दैवच उद्या शत्रूच्या रूपानं उभं राहील आणि या रुपा रायची सारी स्वप्नं पुरी करील !

□

## परराष्ट्रीय घडामोडी : पृष्ठ ४ वरून

हरकत नाही; पण जेव्हा अमेरिका आणि रशिया या बड्या शक्तींमध्ये तो करार होतो, तेव्हा त्याचे परिणाम दूरगामी अस-तात. अमेरिकाच मदतीला धावून आली, तरच रशियाच्या तावडीतून आपण वाचू शकू अशी संपूर्ण पश्चिम युरपची भावना आहे. वॉर्सा करारान्वये पूर्वजर्मनी, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, बल्गेरिया, हंगेरी वगैरे राष्ट्रे रशियाच्या वर्चस्वाखाली आहे-तच. रशियाची शस्त्रास्त्रांची ताकद आज एवढी आहे की, जर्मनीतील राइन नदीचा तीर गाठायला त्यांना ४८ तासांहूनही कमी अवधी लागेल. त्यामुळे पश्चिम युरप या कराराकडे डोळे लावून होता.

S–२२ या प्रकारच्या क्षेपणास्त्रांवर या करारान्वये बंदी घालण्यात आलेली नाही. तसेच आंतरखंडीय पल्ल्याची क्षेपणास्त्रेही यातून वगळण्यात आलेली आहेत हे पश्चिम युरोपच्या दृष्टीने फारच धोक्याचे आहे. रशिया या गोष्टींना कबूल होत नाही.

NATO ( नॉर्थ अॅटलांटिक ट्रीटि ऑर्ग-नायझेशन ) ही युरोपीय राष्ट्रांची शस्त्र-करार केलेली संघटना. ही वार्सा कराराला उत्तर म्हणून अस्तित्वात आहे. NATO च्या सभासद राष्ट्रांना पूर्ण विश्वासात घेऊनच SALT–2 च्या अटी तयार करण्यात आल्या असाही दावा करण्यात येतो. प्रत्यक्षात काय घडले ?

NATO च्या संयुक्त सेनेचा सरसेनापती जनरल हेग हा नुकताच निवृत्त झाला. त्याच्या ताज्या मुलाखतीनुसार पुढच्या दहा वर्षांत पश्चिम युरोपची संरक्षणव्यवस्था संपूर्णतया निकालात निघेल. इतकेच नव्हे तर पुढच्याच एक–दोन वर्षांत शस्त्रस्पर्धेतून युरोप पूर्णतया मागे पडल्याने दुसऱ्या महा-युद्धानंतर प्रथमच अत्यंत बिकट व तणावाची राजकीय परिस्थिती युरोपमध्ये निर्माण होईल.

या विधानांवरून युरोपातील लोकशाही-वादी राष्ट्रे SALT विषयी हळूहळू कशी हवालदिल होत चाललेली आहेत हे लक्षात येईल.

रशियाची परिस्थिती परत निराळीच आहे. रशियाचा क्रमांक एकचा शत्रू चीन आहे आणि चीनची इतकी भीती रशियाला आहे की, अमेरिका काहीही आश्वासने देऊ इच्छित असली, तरी रशिया अधिकाधिक संहारक शस्त्रे उत्पादन करण्याचे काही थांबणार नाही !

याची पहिली चुणूक लगेचच दिसली आहे. व्हिएतनाम-चीन युद्धानंतर दोन देशांत बोलणी सुरू झालेली आहेत. चीनने 'धडा शिकवण्या'साठी व्हिएतनामवर चढाई केलेली होती. आता बोलण्याच्या वेळी चीनकडून दडपण येऊ नये म्हणून रशियाने दक्षिण चीन समुद्रामध्ये Minsk ही आपली युद्धनौका धाडलेली आहे. अद्ययावत शस्त्रा-स्त्रांनी ही नौका तिथे नेमक्या वाटाघाटींच्या वेळीच धाडण्याचे कारण उघड आहे. हिंदी महासागरात भारत-बांगला युद्धाच्या वेळी

अमेरिकेने पाचवे आरमार पाठवून शक्ति-प्रदर्शन केले होते, तसाच हा प्रकार आहे. १८ जुलैला SALT वर व्हिएन्नामध्ये सह्या होताच ह्या मिस्कची हालचाल वाढावी हा योगायोग खासच नव्हे. उलट SALT मुळे एका आघाडीवर जरा सामसूम केली, आता चीनकडे वळू असाच विचार रशियाने केलेला दिसतो. यानंतरच्या महत्त्वाच्या घडामोडींची दखलही या संदर्भात घ्यायला हवी. रशियाने सीमाप्रश्नावर चर्चा करण्यासाठी आपली तयारी आहे अशा आशयाचे पत्र चीनला पाठवले. त्यावरचे चीनचे उत्तर अजून अपेक्षित आहे. एकीकडे मिस्क दक्षिण चिनीसमुद्रात तरंगत ठेवायचे, वो ग्युएन गिआप या व्हिएतनामी सेनापतीला चीनला प्रक्षोभक होतील अशी भाषणे करायला लावायचे आणि दुसरीकडे जमल्यास वाटाघाटींचे गुऱ्हाळ चालू ठेवायचे ही स्वस्थता रशियाला SALT-2 मुळे लाभलेली आहे

एकूण विचार करता, त्यामुळेच अमेरिकेला काय मिळाले हा संदिग्ध प्रश्न आहे. 'SALT-2 हे अंतिम उद्दिष्ट नव्हे, SALT-2 ही SALT-3 ची सुरुवातच आहे' (आणि तदनंतर SALT-3 ही SALT-4 ची सुरुवातच आहे, असे सतत!) हे अमेरिकेचे धोरण आहे. नि:शस्त्रीकरणाला हळूहळू सुरुवात झाली आहे. जसजसे अमेरिका व रशिया एकमेकांच्या अधिक जवळ येतील, तसतशी नि:शस्त्रीकरणाची एकूण range वाढेल असा आशावाद व्हान्सनी प्रकट केला आहे; पण मुळातच रशियाने आपल्या शस्त्रनिर्मितीवर अमेरिकन निरीक्षण कमी राहील अशी काळजी घेतली आहे. एका विशिष्ट प्रकारची (दहा वॉरहेड्स् असणारी) क्षेपणास्त्रे रशियाकडे आहेत, ती अमेरिकेकडे अस्तित्वातच नाहीत. या व अशा प्रकारात, फक्त त्या विशिष्ट क्षेपणास्त्रांपासून आपला बचाव करू शकणारी; पण बऱ्याच कमी ताकदीची क्षेपणास्त्रे अमेरिकेकडे त्या क्षेपणास्त्रांना उत्तर म्हणून आहेत आणि SALT-2 अन्वये रशियाच्या त्या क्षेपणास्त्रांवरही बंदी घालता येत नाही. कारण अमेरिकेला ही स्वसंरक्षणात्मक अशी क्षेपणास्त्रे नष्ट करायची नाहीत.

आजवरची धोकादायक अस्त्रे ठराविक मर्यादेपलीकडे नष्ट करायची असेही SALT अन्वये ठरले; पण यावरही निश्चित उपाययोजना व वस्तुस्थिती पडताळून पाहणारी यंत्रणा नाही.

या सर्व गोष्टींचा अंदाज असल्याने अनेक अमेरिकन सिनेटर्सना हा करार अपमानास्पद वाटतो त्यात पुढची अध्यक्षीय निवडणूक वर्षावर आल्याने पडद्यामागच्या हालचाली अतिशय वेगाने सुरू आहेत. कार्टरला परत निवडणुकीसाठी पक्षातर्फे विचारात घेतले जाण्याची शक्यता फारच कमी दिसते. अशा परिस्थितीत त्याची जेवढी जास्तीत जास्त मानहानी होईल, तेवढे त्याच्या विरोधकांचे फावणार. कारण शेवटी राजकारण हे इकडे काय वा तिकडे काय, तितकेच गचाळ आहे. त्यामुळे दोनतृतीयांश मतदानाने हा करार कार्टरने जसा सही केली, तसा मंजूर होणे अंमळ कठीणच दिसते.


# तख्त भंगले !

भालदार गेले, चोपदार गेले.
सैन्य निघाले, सरदार पळू लागले.
दिल्लीचे लोकशाही तख्त कधी नव्हे ते हादरून गेले.
तख्ताचे स्वामी अखेर निघाले. नव्हे त्यांना जावेच लागले.
या राजकीय भूकंपात पक्ष, सरकार, सारा देशच हादरून गेला.
या भंगलेल्या तख्ताचे टणत्कार दिशा दिशा भेदीत गेले.
हे कसे घडले ?
क्षणाक्षणाला बदलणाऱ्या नाटकाचा हा धगधगता आलेख
जितका रोचक, तितकाच विचारी मनाला सुन्न करणारा.

## राजकीय झंझावातात सापडलेली दिल्ली

भेटी, मुलाखतींवर आधारित खास वृत्तांत

## माणूस : पुढील अंकी

विक्रेत्यांनी वाढती मागणी आगाऊ नोंदवावी.